**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

महापालिका सचिव कार्यालय.
दिनांक १८/०६/२०१०.

**ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**
**सभा क्रमांक २ दिनांक १८/०६/२०१०**
**सभा सूचना क्रमांक २ दिनांक ०८/०६/२०१०**
**सभा क्रमांक १ दिनांक १८/०६/२०१०**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १८/०६/२०१० रोजी सभा सूचना क्रमांक २ दिनांक ०८/०६/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.अशोक बारकू वैती उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे

१) श्री. अशोक बारकू वैती- मा.महापौर .
२) श्री. मनोज विठ्ठल लासे- मा. उप महापौर

३.श्री.संजय रामचंद्र तांडेल
४.श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक
५. श्री मधुकर रामचंद्र पावशे
६. श्रीमती पाटील कविता सुरेश
७. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर
८.श्री.आनंदा तुकाराम केसरे
९. श्री.रामचंद्र लहू फडतरे
१०.सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र
११. सौ.ताई मारुती भोंडवे
१२. श्री.दिनेश मनोर पाथरे
१३. श्रीमती अनिता अशोक सावंत
१४. श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदीश
१५. श्री.नागसेन (भैय्यासाहेब)गंगाराम इंदिसे
१६. श्री.सुधाकर वामन चव्हाण
१७. श्री. सुरेश दाजी भोईर
१८. सौ.वनिता गंगाराम इंदिसे
१९. श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील
२०. सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील
२१. श्री.भोईर देवराम लक्ष्मण
२२. श्री.भोईर संजय देवराम
२३. श्रीमती तरे महेश्वरी संजय
२४. श्री.रविंद्र माणिक पाटील
२५. श्री.एगडे राम हरी
२६. श्रीमती शारदा दादू पाटील
२७. श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत
२८. श्रीमती छाया मनोहर राव
२९. श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह
३०. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे

३१. सौ.एकता एकनाथ भोईर
३२. श्रीमती यादव केवळादेवी रामनयन
३३. श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव
३४. श्री.कांबळे सुरेश चंदू
३५. श्री. संतोष वसंत वडवले
३६. श्री.दशरथ बाबुराव पालांडे
३७. श्री.राऊळ अशोक राजाराम
३८. कु.योगिता रमेश वैती
३९. श्री.साळवी संतोष गजानन
४०. श्री.सोनार संजय प्रभाकर
४१. श्रीमती मुल्ला फातिमा अंजूम मुहम्मद असिफ
४२. श्री.कोकाटे सुधीर विष्णू
४३. श्री.पाटणकर मिलिंद माधव
४४. श्री.मुल्ला नजीब सुलेमान
४५. सौ.गौरी अनिता सुनिल
४६. श्रीमती कदम रुपाली रमेश
४७. सौ.साळवी अपर्णा मिलींद
४८. श्री.पाटील उमेश काशिनाथ
४९. श्री. अशोक नारायण भोईर
५०. श्री.कांबळे दिनेश दाजी
५१. सौ.प्रमिला मुकूंद केणी
५२.श्रीमती खातू सुरेखा सुरेश
५३. श्रीमती सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
५४. श्री.मिलिंद भारत पाटील
५५. श्री.सामंत विलास शिवराम
५६. सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
५७. श्रीमती पाटील सुजाता भास्कर
५८. श्री.नारायण शंकर पवार
५९.श्रीमती देशमुख स्मिता मधुकर
६०.श्री.वाघुले संजय संतू
६१.श्री.वैती हरीश काशिनाथ
६२.श्रीमती अनिता हिराकांत फर्डे
६३.श्री.राम पांडुरंग रेपाळे
६४.श्री.जनार्दन कृष्णा खेतले
६५.श्री.शैलेश तुकाराम शिंदे
६६.श्री.होडावडेकर मधुकर विठठल
६७.श्री.मनोज तुकाराम शिंदे
६८.श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत
६९.श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम
७०.सौ.घाग संगीता चंद्रगुप्त
७१.श्री.मोरे संजय भाऊराव
७२. श्री.कणसे घनश्याम शिवाजी
७३. श्री.सावंत शैलेश तुकाराम
७४. श्री.फाटक रविंद्र सदानंद
७५. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
७६. सौ.संगिता मिलिंद बनकर
७७. श्री.लक्ष्मण (लच्छू)चंदुमल टिकमाणी
७८. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
७९. श्री.राऊत प्रकाश हरिश्चंद्र
८०. श्री.सचिन जयराज म्हात्रे
८१. श्री.खारकर सुभाष आत्माराम
८२. श्री. गणेश यशवंत साळवी
८३. सौ.मनिषा महेश साळवी
८४. श्रीमती काकडे अनिता बालाजी
८५. श्री.साप्ते राजेंद्र रमेश
८६. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहेब
८७. श्री.कुरेशी यासीन अय्युब
८८. श्री.मढवी रमाकांत दशरथ
८९. श्री.शिवदास नाना भगत
९०. सौ. अनिता राजन किणे
९१. श्री.राजन नारायण किणे.
९२. सौ.कोमुर्लेकर स्वाती महेंद्र
९३. श्री.भगत सुधिर रामचंद्र
९४. श्रीमती नाईक हफीजा नसरुददीन
९५. श्री. महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर
९६. श्रीमती खान शगुफता नसीर
९७. श्री. म्हात्रे दिलीप रतन
९८. श्रीमती अन्सारी इमतियाजबानू उर्फ (बेबी आपा)
९९. श्री. सन्नी वर्गीस थॉमस
१००. श्री. नरेश गणपत म्हस्के
१०१. श्री. अन्सारी असलम सलीम
१०२. सौ. राऊत आशरीन ईब्राहिम
१०३. श्री. डांगरे सिराज अहमंद अली
१०४. श्री. अनिल गजानन सावे
१०५. श्री. पवन काशिनाथ कदम
१०६ श्री. मिलींद मनाहेर साळवी.

<u>रजा सदस्य :-</u>

| | |
|---|---|
| १.श्री.खारकर राजेश आत्माराम | २.श्री. सुभाष गणू भोईर |

<u>गैरहजर सदस्य :-</u>

| | |
|---|---|
| १. श्री.सारंग राजेश नामदेव | २.श्री. राजेश रामचंद्र ठाकूर |
| ३.श्री.जगदाळे हणमंत ज्ञानू | ४.सौ. परिषा प्रताप सरनाईक |
| ५.श्री.कांबळे पद्माकर संभाजी | ६.श्री.विचारे राजन बाबूराव |
| ७.श्रीमती शांता शामजी सोलंकी | ८.श्री.बिष्ट महदिप उर्फ मुन्ना |
| ९.सौ.पाटील प्रभावती माणिक | १०.डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ |
| ११.श्रीमती कदम निता मदन | १२.श्रीमती शेख रजिया इकबाल |

राष्ट्रगीताने सुरुवात होऊन सचिव सभेला सुरुवात करतात.
सन्मा.सदस्य श्री. सुभाष भोईर व सन्मा.सदस्य श्री. राजेश खारकर यांचा रजेचा अर्ज आहे.

श्री.नारायण पवार :

महापौर महोदय, सभागृहात नविन अधिकारी आलेले आहेत त्यांची ओळख करुन देण्यात यावी.

मा.सचिव :

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मुख्य लेखा परिक्षक म्हणून श्री.उबाळे हे प्रतिनियुक्तीने हजर झालेले आहेत. सभागृहात ते आपली ओळख करुन देतील.

मा.मुख्य लेखा परिक्षक :

महापौर महोदय,सन्मा.सदस्य यांना अभिवादन.मी.श्री.उबाळे सत्यवान किशनराव. महाराष्ट्र शासनाच्या उपसंचालक संवर्गातील वित्त विभागाचा अधिकारी आहे.

श्री.नरेश म्हस्के :

महापौर महोदय,हे चुकीचे नांव सांगत आहेत. कारण मागच्या महासभेमध्ये ऑडीटर या पदाकरीता श्री.नाकाडी यांची मान्यता घेण्यांत आलेली आहे. व त्यास मागच्याच महासभेमध्ये मान्यता घेण्यांत आली होती. याबाबत महापालिकेने जाहिरात काढली होती व यासाठी महापालिकेने जाहिरातीसाठी खर्च सुध्दा केला होता.

श्री.नारायण पवार :

महापौर महोदय,याबाबत जाहिरात देण्यांत आली होती व मुलाखती सुध्दा झाल्या होत्या.

मा.उपआयुक्त -मुख्यालय :

महापौर महोदय, प्रशाासनातर्फे राज्य शासनातील अधिकारी ऑडीटर म्हणून दयावा याबाबत विनंती करण्यात आली होती परंतू शासनाने ती विनंती मान्य केली नाही. मी स्वत: सचिवांना भेटलो होतो त्यावेळी त्यांनी सांगितले की,तुमच्या स्तरावर तुम्ही भरती करा आमच्याकडे अधिकारी नाहीत,त्यामुळे देता येणार नाही,त्यामुळे भरतीची प्रक्रिया सुरु केली होती, त्यानंतर मुलाखती झाल्या त्यानंतर दोन वेळा मोड ऑफ कंडक्टमुळे त्याचे निकाल जाहिर करण्यांत आले नव्हते.त्यानंतर निकाल जाहिर करुन त्यास मा.महासभेची मान्यता घेण्यांत आली होती आणि त्या कालावधीतच ही प्रक्रिया पुर्ण होण्यापुर्वी शासनाने अधिकारी नियुक्त केल्यामुळे ती महापालिकेने केलेली जी प्रक्रिया ती पुर्ण होऊ शकली नाही.

श्री.नरेश म्हस्के :

महापौर महोदय,याबाबत यादी तयार करण्यांत आली होती व वेटींग लिस्ट सुध्दा तयार करण्यांत आली होती.

मा.उपआयुक्त मुख्यालय :

महापौर महोदय, हा शासनाचा निर्णय आहे त्यामुळे मला कांही बोलता येणार नाही.

श्री.नरेश म्हस्के :

तुम्ही म्हणता शासनाचा निर्णय आहे,मग जाहिरातवर जो खर्च केलेला आहे,निवड प्रक्रियेवर जो खर्च केलेला आहे त्यास जबाबदार कोण?प्रकरण महासभेला मंजुरीसाठी आणता,आणि नंतर दुसराच कोणीतरी माणुस येतो. मला वाटले त्यांचे नांव बदलले आहे किंवा कांय.

मा.उपआयुक्त मुख्यालय :

महापौर महोदय, हा मा.आयुक्तांनी घेतलेला निर्णय आहे आणि तो शासनाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने घेतलेला आहे.

श्री.नरेश म्हस्के :

शासनाने पाठविलेले सगळे अधिकारी घेतले पाहिजेच असे नियमांत कोठे आहे कां?

श्री.भैय्यासाहेब इंदिसे :

महापौर महोदय,आपण जी जाहिरात काढली होती त्यामध्ये कोणाची निवड केली वेटींगमध्ये त्यांची निवड केली की ज्याची निवड करायची होती त्याची केली याबाबतची सर्व माहिती फायनांस डिपार्टमेंटला आपल्याकडून लेखी स्वरुपात तसे पाठविले आहे कां?

मा.उपआयुक्त मुख्यालय :

मी आत्ताच म्हटल्याप्रमाणे ही प्रक्रिया पुर्ण होण्यापुर्वीच शासनाने आपल्याकडे अधिकारी पाठविलेला आहे.

श्री.नरेश म्हस्के :

याबाबत महासभेची मान्यता घेण्यांत आली होती,यादी प्रसिध्द करण्यांत आली होती,तुम्ही शासनाला कळविले आहे का की आम्ही ही पोस्ट भरलेली आहे,मुलाखत घेऊन हे पद भरण्यांत आलेले आहे.ज्याची निवड करण्यांत आली होती तो माणुस आला नाही कां,किंवा कोणाला भेटला नाही कां?तुम्ही लगेचच शासनाचा अधिकारी येथे आणला आहे.

मा.उपआयुक्त मुख्यालय :

आपण जी रिक्रुटमेट केली होती त्याचे निकाल अधिकृतरित्या जाहिर करण्यात आलेले नाहीत.

श्री.नरेश म्हस्के :

तुम्ही महासभेला आणले होते,याचा अर्थ महासभा अधिकृत नाही कां?तुम्ही वेटींग लिस्टसहीत यादी महासभेपुढे आणली होती.महासभेला काही किंमत नाही कां?महासभेपेक्षा आणखी कोण मोठे आहे?

महापौर महोदय, श्री.उबाळे या व्यक्तींना आमचा विरोध नाही.परंतू ही जी प्रक्रिया चालली आहे की,महासभेला अंधारात ठेऊन किंवा महासभेला महत्व न देता प्रशासन जो निर्णय घेत आहे त्याला आमचा विरोध आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,आपण जेव्हा कोणताही अधिकारी नेमतो तेव्हा त्यांच्या मंजूरीसाठी ती नांवे शासनाकडे पाठवितो का याबाबतचा सुध्दा याठिकाणी खुलासा देण्यांत यावा.

मा.कार्मिक अधिकारी :

महापौर महोदय,बीपीएमसी ॲक्ट ४५ च्या अंतर्गत ज्या स्ट्रटयुचरी पोस्ट आहेत की ज्यामध्ये चीफ ऑडीटरची पोस्ट आहे ही जर सरळसेवेने किंवा पदोन्नतीने भरली तर आपल्याला शासनाला कळवायला लागते,परंतू आता शासनाने प्रतिनियुक्तीने पाठविले असल्यामुळे यामध्ये कळविण्याचा प्रश्न येत नाही.

श्री.नरेश म्हस्के:

मग तुम्ही जाहिरात कां काढली,आमचे असे म्हणणे आहे की,तुम्ही सगळी प्रोसिजर केली,महासभेच्या मान्यतेला आणली तेव्हा तुमच्या लक्षांत आले नाही कां?ही गोष्ट चुकीची घडली आहे की नाही हे तुम्ही सांगावे. तुम्ही शासनाला कळवू शकत नाही की आम्ही ही पोस्ट निवडलेली आहे.

श्री.मिलिंद पाटणकर :

महापौर महोदय, कुठल्याही अधिका-याची आपण डायरेक्ट सेवेतून जरी नियुक्ती केली तरी त्याचे नाव शासनाकडे रेकमेंडेशनसाठी पाठवावेच लागते की आम्ही यांची नियुक्ती केली आहे व त्यास शासनाची मान्यता असावी. आपण जे कांही सिलेक्ट केलेले नांव आहे ते पाठवून त्याची मान्यता होईपर्यंततरी आपल्याला चीफ ऑडीटर लागणार आहे आणि त्याप्रमाणे यांची नियुक्ती केली आहे असे तुम्ही जाहिर करा म्हणजे विषय संपेल,मग शासनाची जेव्हा मान्यता येईल ती येईल तोपर्यंत आपण बघू काय करायचे .

श्री.नरेश म्हस्के :

आम्हाला उत्तर देण्यांत यावे व यापूढे असे करु नका.

मा.आयुक्त :

महापौर महोदय, सदर प्रकरणामध्ये शासनाचे अधिकारी मान्य झाल्याने मा.आयुक्तांनी त्यांस हजर करुन घेतले आहे.मात्र याबाबत महासभेचा जो ठराव झालेला होता त्या ठरावाबाबतची माहिती त्यानी महासभेकडे ठेवली पाहिजे होती व ती सादर करण्यात येईल. आता शासनाकडून जे अधिकारी पाठविण्यांत आलेले आहेत त्यांना हजर करुन घेण्यास विनंती आहे.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदय, सन्मा.सदस्य श्री.नरेश म्हस्के यांनी जो प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेला आहे,परंतू त्यास उत्तर देताना प्रशासनातीलअधिकारी एवढी अडचण निर्माण होत आहे. आपण याबाबत जाहिरात दिली व त्याप्रमाणे यापदाकरीता एका उमेदवाराचीनिवड सुध्दा करण्यांत आलेली आहे असे असताना शासनाकडून प्रतिनियुक्तीने अधिकारी घ्यायचा होता तर ,ही जी संपूर्ण प्रक्रिया केली ती करण्याची आवश्यकता नव्हती. आपण याबाबत मा.आयुक्तांना सांगायला पाहिजे होते की, या पदासाठी महासभेने मंजुरी दिली असुन एका उमेदवाराची निवड करण्यांत आलेली आहे.

श्री.अनिल सावे :

महापौर महोदय,आता नव्याने जी नियुक्ती झालेली आहे तो सुध्दा विषय विषयपत्रिकेवर आला पाहिजे.आणि महासभेची त्याला मंजुरी पाहिजे.तुम्ही आता त्यांना उपस्थित केलेले आहे आणि कार्योत्तर मंजुरीच्यावेळी महासभेने समजा जर हे प्रकरण नाकारले तर कांय करणार?हा तांत्रिक मुद्दा होतो. दुसरी बाब अशी आहे की,तुम्ही महासभेचा ठराव हा एप्रिलमध्ये करुन घेतलेला आहे,तो ठराव तुम्हाला विखंडीत करावा लागेल.तुम्हाला दोन्ही गोष्टी एकाचवेळेला करता येणार नाही.तो ठराव विखंडीत करुन तो बाजुला ठेऊन त्याप्रमाणे महासभेला कळवावे लागेल,हया सगळया तांत्रिक बाबी आहेत याच्या आम्ही खोलात जात नाही. इतर वेळेला प्रशासन फार आग्रही असते की,ही तांत्रिक बाब आहे आम्हाला नियमानुसार करायचे आहे,आणि ते व्हावे अशी आमचीसुध्दा अपेक्षा आहे,श्री.दुबाळे यांचेबाबत आमच्या मनांत शंका नाही परंतू जर तुम्ही या बाबी केल्या नाहीत आणि उदया जर कोणी यासंदर्भात न्यायालयांत गेले तर प्रशासनाबरोबर महापालिका आणि महासभा दोन्ही अडचणीमध्ये येतील म्हणून आम्ही याठिकाणी स्पष्ट करतो.

श्री.मनोज शिंदे :

आयुक्त साहेब सर्वप्रथम आपले याठिकाणी हार्दीक अभिनंदन. संपूर्ण सभागृहाच्यावतीने आपले अभिनंदन.

श्री.अनिल सावे :

महापौर महोदय,मा.आर.ए.राजीव साहेब यांचे आज सभागृहात प्रथमच आगमन होत आहे.त्यांची पहिलीच महासभा आहे. आणि आम्हा सर्वांच्या वतीने स्वागत करीत असताना त्यांची कारकीर्द यशस्वी,उज्ज्वल आणि ठाणेकरांना दिलासा देणारी होवो,आणि त्यांच्या या कारकीर्दीचे त्यांच्या भावी आयुष्यात त्यांची पदोन्नती त्यांची प्रगती अगदी थेट महाराष्ट्र राज्याच्या चीफ सेक्रेटरीपर्यंत होवो अशाप्रकारची आम्ही सदिच्छा व्यक्त करतो आणि ईशीचरणी प्रार्थना करतोआणि त्यांचे याठिकाणी मन:पुर्वक स्वागत करतो.

मा.महापौर :

सन्मा.सदस्य श्री.नरेश म्हस्के यांनी आपला मुद्दा पुन्हा याठिकाणी मांडावा.

श्री.नरेश म्हस्के :

महापौर महोदय,याठिकाणी चीफ ऑडीटर म्हणून ओळख करुन दिलेली श्री.उबाळे हयांच्याबाबत मला प्रथम वाटले की ते आपले खोटं नांव सांगत आहेत. कारण रितसर त्या पदासाठी जाहिरात काढली होती त्यामध्ये वेटींग लिस्ट बनविण्यांत आली व त्यामध्ये श्री.नाकाडी यांची नियुक्तीच्या मान्यतेकरीता महासभेमध्ये हा ठराव आला होता,आम्ही सर्वांनी त्यास मान्यता दिली परंतू या महासभेत पाहिले तर कोणीतरी नविनच उबाळे हे अधिकारी आले आहेत. माझे एवढेच म्हणणे आहे की, ज्या महासभेला आपण ठराव मंजूर करता,जर आमचा ठराव मंजूर झाला होता,आयुक्तांकडे तो गेला असेल तर तो ठराव तुम्ही विखंडीत केला कां? हा ठराव प्रशासनाकडूनच आणलेला होता,आम्ही तो ठराव मांडलेला नव्हता. या पदासाठी आपण रितसर जाहिरात काढली व त्यावर आपण खर्च केला,जर तुम्हाला शासनाचेच अधिकारी घ्यायचे होते तर तुम्ही ही सगळी प्रोसिजर कशासाठी केली? हा पैशाचा अपव्यय कशासाठी ? हा मुद्दा मी याठिकाणी उपस्थित केला आहे.

श्री.अनिल सावे :

महापौर महोदय,दुसरा मुद्दा म्हणजे श्री.उबाळे यांना लेखा परिक्षक म्हणून याठिकाणी प्रतिनियुक्तीवर घेत असताना त्यास महासभेची मंजुरी पाहिजे नाहीतर ती कार्योत्तर मंजुरी होते,तसेच सदर प्रस्ताव महासभेने नाकारला तर एक तांत्रिक मुद्दा उपस्थित होतो की,तुम्ही त्यांना हजर करुन घेतलेले आहे. आणि मग कांय करायचे, तरी हा सुध्दा मुद्दा लक्षांत घ्यावा,अशी मी आपल्याला विनंती करतो.

मा.आयुक्त :

महापौर महोदय,सर्वात प्रथम मी माझ्याबाबत जी शुभकामना व्यक्त करण्यांत आलेली आहे त्याबद्दल मी सर्व सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांना धन्यवाद देतो. आणि आपल्यासोबत काम करण्याची ग्वाही देतो की नियमाप्रमाणे जे खरे असेल आणि शहराचे विकासासाठी माझे सहकार्य नेहमी राहील.

आता मा.सदस्यांनी मुख्य लेखा परिक्षक श्री.उबाळे यांचेबाबत जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याबाबत प्रशासनातील अधिका-यांनी अशी माहिती दिली की,महासभेचा ठराव होण्याआधी किंवा याठिकाणी जी प्रोसेस सुरु झाली होती त्याआधी शासनाकडे सुध्दा प्रशासनाचे वतीने ऑडीटरच्या नेमणुकीकरीता एक पत्र गेले होते.शासनाकडून याबाबत उशिर झाला की उशिर होत होता म्हणून

याठिकाणी आणखी एक प्रोसेस सुरु करुन जाहिरात देऊन अपॉईंटमेंट सुध्दा करण्यांत आली आणि ठराव सुध्दा मंजूर झाला अशी परिस्थिती आहे.तरी याबाबत मला असे वाटते की,आधी जर शासनाकडे पत्र पाठवून ऑडीटरसाठी विनंती करण्यात आली होती ,जेव्हा येथे प्रोसेस सुरु झाली तेव्हा शासनाकडे पत्र पाठवून तो आम्ही आपल्याकडून घेणार नाही आणि आपला प्रस्ताव येथे सुरु केलेला आहे अशाप्रकारचे पत्र त्यावेळी पाठवायला पाहिजे होते,तो पाठविण्यांत न आल्याने राज्य शासनाकडून जे ऑडीटर आलेले आहेत त्यांना येथे नेमणुक देणे प्रशासनाचे कर्तव्य असल्याने त्याप्रमाणे त्यांना नेमणुक देण्यांत आलेली आहे आणि कार्योत्तर मंजूरीसाठी महासभेपुढे त्वरीत प्रस्ताव आम्ही सादर करु. यापुढे अशी घटना पुन्हा घडणार नाही आणि अशाप्रकारचा खर्चाचा अपव्यय टाळण्यासाठी प्रशासन पुर्ण काळजी घेईल,धन्यवाद.

मा.सचिव :

महापालिकेच्या सहाय्यक संचालक नगररचना पदावर श्री.सुनिल हजारे हे हजर झालेले आहेत ते सभागृहात आपली ओळख करुन देतील.

मा.सहा.संचालक नगररचना :

महापौर महोदय,मा.आयुक्त,उपस्थित सर्व मा.नगरसेवक,माझे संपूर्ण नांव श्री.सुनिल चरणदासजी हजारे असे आहे. मी सहाय्यक संचालक नगररचना,ठाणे महापालिका या पदावर मी महिन्यापुर्वी रुजू झालेलो आहे व माझी ही पहिलीच सर्वसाधारण सभा असल्यामुळे मी याठिकाणी माझा परिचय देत आहे. माझी सहा.संचालक नगररचना या पदावर जवळपास चौदा वर्ष पुर्ण झालेली आहेत. आणि चौदा वर्षांपैकी महापालिकेचा बारा वर्षाचा अनुभव माझ्यासोबत आहे. मला खात्री आहे की,आपले सर्व सभासद आणि महापालिकेचे सर्व पदाधिकारी व प्रशासनासोबत काम करताना शहराच्या विकासाच्यादृष्टीने माझ्याकडून नियमाप्रमाणे जे कांही योगदान देता येणार ते योगदान देण्याचा मी प्रयत्न करेन.जयहिंद.

श्री.मनोज शिंदे :

सहा.संचालक नगररचना पदी नव्याने नेमुणक करण्यांत आलेले श्री.हजारे साहेब आपले याठिकाणी अभिनंदन. ठाणे शहर हे डेव्हलपमेंटकडे जाणारे शहर आहे. आणि या शहराचा एक जबाबदार अधिकारी म्हणून आपण याठिकाणी आलात व आपण ही जबाबदारी चांगल्याप्रकारे सांभाळाल,अशी मी सभागृहाच्यावतीने आशा व्यक्त करतो,आणि आपल्याला शुभेच्छा देतो.

श्री.अनिल सावे :

सहा.संचालक नगररचना या पदावर श्री.हजारे साहेब आपण याठिकाणी आला आहात. आमच्या सर्वांचे वतीने आपले स्वागत करीत असताना आपल्या कार्यांचा ठसा आपण या शहरावर उमटवाल आणि ख-या अर्थाने शहर विकास खातं हे आपण सिध्द कराल अशाप्रकारची आशा व्यक्त करतो. धन्यवाद.

श्री.मनोज शिंदे :

चीफ ऑडीटर म्हणून श्री.उबाळे यांचे सुध्दा याठिकाणी अभिनंदन करीत आहे.

श्री.सुरेश कांबळे :

ठाणे महानगरपालिकेत आयुक्त पदावर आलेले मा.श्री.राजीव साहेब यांचा मी माझ्या बहुजन समाज पक्षाचा नगरसेवक या नात्याने मी आपले हार्दीक अभिनंदन करीत आहे. आज प्रत्येक आयुक्तांनी ठाणे शहरात चांगले काम केलेले आहे.मी सुध्दा माझ्या वॉर्डाच्यावतीने तसेच रायलादेवी प्रभाग समितीच्यावतीने मी आपणास कांही उपेक्षित वॉर्डाबाबत अपेक्षा व्यक्त करेन कारण कांही संस्था किंवा नगरसेवक आपल्याला फक्त ठाणे शहराबाबतच सांगतील व अचानक नितिन येथील ब्रिजवर घेऊन जातील. तरी आपले आमच्या वॉर्डात सुध्दा आगमन व्हावे,ही विनंती.तसेच पुन्हा एकदा आपले स्वागत करतो.

मा.सचिव :

ठाणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष मा.जितेंद्र आव्हाड साहेब यांचे दि. ७ जून २०१० चे पत्रानुसार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने श्री.नजिब सुलेमान मुल्ला यांची सोमवार दिनांक ७ जून २०१० पासून ठाणे महापालिकेच्या विरोधी पक्ष नेते पदी नेमणुक करण्यांत येत आहे.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय,विरोधी पक्ष नेते श्री.नजिब मुल्ला यांचे सभागृहातर्फे हार्दीक अभिनंदन. आणि ठाणे महापालिकेची धुरा व्यवस्थित सांभाळतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.नरेश म्हस्के :

महापौर महोदय, याठिकाणी माझे मित्र नजिब मुल्ला ब-याच अवधीनंतर विरोधी पक्ष नेते या पदावर बसलेले आहेत. महापालिकेच्या हितासाठी व विकासाच्यादृष्टीने ते कामकाज याठिकाणी चालवतील याबद्दल कोणत्याही प्रकारची शंका नाही. तरी शिवसेना,भाजपा आणि मित्र पक्षातर्फे त्यांच्या कारकिर्दीला आमच्या हार्दीक शुभेच्छा.

मा.सचिव :

प्रश्नोत्तरे घेण्यांत येत असुन पहिला प्रश्न आहे सन्मा.जनार्दन कृष्णा खेतले यांचा आहे व त्यास कार्यकारी अभियंता मलनि:स्सारण व परिवहन व्यवस्थापक परिवहन सेवा यांचेकडून उत्तरे देण्यांत आलेली आहेत.

मा.महापौर :

प्रश्नोत्तरासाठी एक तास देण्यांत आलेला आहे.

श्री.जनार्दन खेतले :

महापौर महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नावर उत्तर मिळाले आहेकी,भुयारी गटार योजनेअंतर्गत ठाणे शहरात तसेच इतर भागात महावीर कंस्ट्रक्शनला ती जागा देण्यांत आलेली आहे. सन्मा.महापौर महोदय, आपल्या महापालिकेमध्ये अनेक ठेकेदार आहेत आणि या ठेकेदारामार्फत अनेक कामे केली जातात,आपण प्रत्येक ठेकेदाराला मोठमोठया जागा विनामुल्य देणार आहोत कां,कारण २००७ पासून ते २०११ पर्यंत त्यांना एवढी मोठी मोक्याची जागा विनामुल्य देणार आहोत, हे योग्य व कायदयाला धरुन आहे कां, याचे उत्तर मिळावे. आज अनेक ठेकेदार आहेत व प्रत्येकाला विनामुल्य दयायचे ठरविले तर आपण देऊ शकतो कां?

मा.नगर अभियंता :

महापौर महोदय,कॉन्ट्रॅक्ट कॉल करताना जे आपण टेंडर कॉल करीत आहोत त्यामध्ये आपण अट टाकीत आहोत की कॉन्ट्रक्टरला मटेरियल ठेवण्यासाठी लागणारी जागा देणार आहोत ,तसेच कॉन्ट्रक्ट करताना व मंजूरी करताना जे प्रोसेस आहे त्या प्रोसेसकरीता आयुक्तांची परवानगी तसेच स्टँडींग कमिटीची मंजुरी घेऊन त्यानंतर त्यांना वर्कऑर्डर देतो,म्हणजे कॉन्ट्रक्टमध्ये ती अट टाकत आहोत.तसेच इतर जे काम करतात त्यांना ऑलरेडी आपण जागा दिलेली आहे. जे ठेकदार काम घेतात त्यांना काम करण्यासाठी मटेरियल ठेवण्यासाठी जागा दयावी लागते व ती जागा जर आपण नाही दिली तर ती प्राईस आपल्याला जस्टीफाय करावी लागते,ते होऊ नये म्हणून आपल्याकडे जी जागा ताब्यात असते ती मटेरियल ठेवण्यासाठी दयावी लागते.

श्री.जनार्दन खेतले :

महापौर महोदय, आपण ४३० चौ.फुटाचे ऑफीस बांधण्यासाठी दिलेले आहे. तरी ते बांधकाम अधिकृत आहे कां? आज रस्त्यावर हातगाडी असेल तर आपण त्यांचेकडून सुध्दा २० ते २५ रुपये वसुल करतो ,आणि एवढी मोठी जागा आपण त्यांना दिलेली आहे, तरी त्यास आपण कांहीतरी भाडे लावायला पाहिजे. तसेच याकरीता त्यांनी परवानगी घेतलेली आहे कां?

मा.नगर अभियंता :

महापौर महोदय,ही जागा आपण त्यांना दिलेली आहे व त्या जागेवर त्याने जे कांही बांधकाम केलेले आहे ते तात्पुरत्या स्वरुपातील आहे. व यास आपल्या कार्यालयाने ऑलरेडी परवानगी दिलेली आहे.जोपर्यंत हे प्रोजेक्ट चालणार तेथपर्यंत ते त्यांच्या ताब्यामध्ये राहणार आहे. जेव्हा आपण कॉन्ट्रक्टमध्ये अट टाकतो की विनाभाडे तुम्हाला जागा देणार तर त्यांना ती दयावी लागणार. नाहीतर दुसरा पर्याय भाडेआकारणी करुन त्याला भाडे दया.

श्री.जनार्दन खेतले :

समजा हे प्रोजेक्ट २०११ पर्यंत पुर्ण झाले नाही तर पूढे कांय करणार? तसेच त्याठिकाणी पाणी सुध्दा मोफत वापरत आहेत. पाच ते सहा वर्ष आपण त्यांना मोफत पाणी देणार आहोत कां?

मा.नगर अभियंता :

महापौर महोदय,मी ज्याप्रमाणे सांगितले की जेव्हा प्रोजेक्ट चालू असते त्यावेळी आपल्याला हे दयावे लागते.एखादया भूखंडावर जेव्हा कांही सुविधा दयायची असेल त्या केस मध्ये जर शिफ्टींग लागली तर डेफीनेटली आपल्यातर्फे ते शिफ्टींग करुन देऊ शकतो परंतू ज्याप्रमाणे मी सांगितले की,कॉन्ट्रॅक्टमध्ये ती अट आहे तरी त्याप्रमाणे त्याला कुठेतरी जागा दयावी लागणार आहे. या प्रोजेक्टबाबत बोलायचे तर सिव्हरेज प्रोजेक्ट हे संपूर्ण शहरामध्ये आहे म्हणून आपण त्यांना जी जागा होती ती त्याना देण्यांत आली. जॉन्सनच्या भूखंडावर जर आणखीन कांही प्रकल्प बांधायचे असेल तर त्यांना दुसरीकडे जागा देण्यांत येईल. तसेच पाण्याच्या बिलाबाबत मी माहिती काढतो व कॉन्ट्रॅक्टमध्ये कांय प्रोव्हीजन आहे कारण आता माझ्याकडे माहिती नाही,तरी याबाबत मी आपल्याला सेपरेट उत्तर देईन.

श्री.जनार्दन खेतले :

महापौर महोदय, माझ्या प्रश्न क्रमांक २ ला उत्तर देण्यांत आलेले आहे की, सदर प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे त्यामुळे आता आम्ही उत्तर देऊ शकत नाही. महापौर महोदय मी हे प्रश्न जवळजवळ तीन महिन्यापुर्वी विचारले होते,आज प्रत्यक प्रभाग समितीवाईज आपले प्रभाग अधिकारी आहेत,सहा.आयुक्त आहेत. आज तेथे जर अनधिकृत बांधकाम चालू असेल तर त्या सहा.आयुक्त,तसेच प्रभाग अधिकारी यांना त्याची माहिती असायला हवी,तशी माहिती त्यांचेकडे असते आणि ती प्रभाग समितीवाईज माहिती मिळायला तीन महिने लागतात कां? त्याचनुषंगाने माझा तिसरा प्रश्न होता त्याबाबत सुध्दा अशाचप्रकारचे उत्तर देण्यांत आलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे खरोखर याची व्याप्ती मोठी आहे कारण ही वेळ मागवून घेण्याचे कारण असे आहे की,कांही ठिकाणी सात ते आठ मजल्याच्या इमारती होत आहेत तेथे माणसे भरण्यासाठी त्या बिल्डरला वेळ देण्याची गरज आहे आपल्याला,अधिका-या माहितीप्रमाणे. व त्याचसाठी हे एक महिना उत्तर मला उशिरा मिळणार आहे. तरी माझा सरळ आरोप आहे की,सात-सात-आठ-आठ विनापरवानगीचे जे टॉवर उभे राहत आहेत त्या टॉवरमधील कांही ठेकेदारांनी

अधिका-यांना विनंती केली असेल की,माझे एवढे काम बाकी आहे ते पुर्ण होऊ दे,मला त्यामध्ये माणसे घुसवूदे त्यानंतर तुम्ही उत्तर दया,व यामुळे एक महिना हा उशिर होत आहे. प्रत्येक प्रभाग समितीवाईज अनधिकृत बांधकामाची माहिती आहे, त्यासाठी आपले अधिकारी नेमलेले आहे. त्याचबरोबर काँग्रेसच्या श्रीमती वैशाली यांना पुर्णपणे माहिती दिली आहे व त्यायाबाबत कोर्टात गेलेल्या आहेत त्यांना जर माहिती मिळत असेल तर नगरसेवकांनी सभागृहात प्रश्न विचारले तर कां माहिती मिळू शकत नाही?

मा.उपआयुक्त अतिक्रमण :

महापौर महोदय, मा.सदस्यांनी मार्चमध्ये प्रश्न विचारला होता,प्रत्यक्षात जून महिन्यामध्ये विभागाला मिळालेला आहे आणि आपण जी सविस्तर माहिती मागितलेली आहे ती सगळया प्रभागाकडून संकलित करायला निश्चितच वेळ लागेल,पंधरा दिवसात आपल्याला ती सादर केली जाईल.

श्री.जनार्दन खेतले :

महापौर महोदय, माझ्या उपप्रश्नाचे उत्तर मिळावे की संबंधित किती ठेकेदारांवर एमआरटीपीखाली त्यांचेवर गुन्हयाची नोंद केलेली आहे? कारण आपले कर्तबगार अधिकारी कधीकधी एवढी कर्तबगारी दाखवितात की,झोपडपट्टीतील एखादयाचे घर तुटायला असेल व तो थोडसे वाढवत असेल,डागडुजी करीत असेल तर त्याचेवर एमआरटीपी लावतात,आणि सात ते आठ मजल्याचे टॉवर होत आहेत,तिकडे दुर्लक्ष होत आहे,गरीबाला एक कायदा व पैसेवाल्याला एक कायदा असे आहे कां? आता पावसाळा आलेला आहे,बाजुच्याचे जर रुम उंच झालेले असतील आणि त्यांच्या घरात पाणी येणार असेल म्हणून त्यांनी जर डागडुजी केली म्हणून एमआरटीपी लावली जाते एवढा मोठा तो गुन्हा होऊ शकतो कां? मग टॉवरकडे कां कानाडोळा होत आहे? तरी याबाबतची संपूर्ण माहिती मला पूढील महासभेमध्ये मिळायला पाहिजे.व ही माहिती मला सभागृहातच मिळायला पाहिजे कारण त्याचे उत्तर मी सभागृहातच विचारणार आहे.

मा.महापौर :

याबाबतची संपूर्ण माहिती पंधरा दिवसांत देण्यांत येईल.

श्री.जनार्दन खेतले :

महापौर महोदय,माझ्या चौथ्या प्रश्नावर उत्तर देण्यांत आले ते जेथे त्यांना उत्पन्न मिळणार अशाच ठिकाणचे थांबे पुर्ण झालेले आहेत आणि इतर ज्याठिकाणी उत्पन्न मिळणार नाही त्याठिकाणी जुनेपुराणे स्टील वापरुन नुसते सांगाडे उभे केले आहेत. तरी याबाबत चौकशी करुन पूढील महासभेमध्ये याचे पुर्ण उत्तर देण्यांत यावे.नाहीतर पुराव्यासहीत मी पुढील महासभेत ते सादर करेन.

मा.महापौर :

परिवहनबाबत मागच्यावेळी सुध्दा लक्षवेधी मांडण्यांत आलेली होती आणि एका महिन्यात त्याचा अहवाल सभागृहापुढे देणार होते त्याची माहिती गुप्ता साहेबांकडून मिळणार आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,नियमातील तरतुदीप्रमाणे स्थायी समितीतील पाच सदस्यांनी याबाबत विशेष महासभा परिवहनसाठी लावावी अशी विनंती केली होती ,मार्च महिन्यात अर्थसंकल्पाची महासभा असल्यामुळे आपण एप्रिलमध्ये लावणार होतो परंतू त्यानंतर इलेक्शनचे कोड ऑफ कंडक्ट आले असल्यामुळे तेव्हा लावता आली नाही तरी ही सभा केव्हा लावणार आहात कारण कायदयाप्रमाणे त्याबाबत निर्णय घेणे आपल्यावर बंधनकारक आहे,तरी ही महासभा आपण केव्हा लावणार हे सुध्दा सांगण्यांत यावे.

मा.आयुक्त :

महापौर महोदय,सदर प्रकरण मागच्या महासभेमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दोन महिन्यात चौकशी पुर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत.त्या चौकशीची मी सुरुवात केलेली आहे व याकरीता मी कॅफो यांची सुध्दा मदत घेत आहे, ती चौकशी निश्चित लवकर पुर्ण करण्यांत येईल.

मा.महापौर :

याबाबत सोमवारी बैठक घेऊन कोणत्या तारखेला ही सभा बोलावावी, याबाबत निर्णय घेण्यांत येईल.

मा.सचिव :

प्रश्न क्रमांक सन्मा.सुरेश कांबळे यांचे आहेत,व त्यांना कार्मिक अधिकारी यांचेकडून उत्तर देण्यांत आलेले आहेत.

श्री.सुरेश कांबळे :

महापौर महोदय,माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर ठिक आहे ,माझा दुसरा प्रश्न पदोन्नतीबाबत आहे. श्री.संजय देशमुख हे ठाणे महापालिकेत १९९१ साली रुजु झाले त्यानंतर त्यांना २००० अशी पदोन्नती मिळाली, २००३ मध्ये त्यांना प्रभारी कार्यकारी उपअभियंता अशी पदोन्नती मिळाली,त्यानंतर २००५ मध्ये प्रभारी कार्यकारी अभियंता शहर विकास नियोजन अधिकारी म्हणून आले,आणि २०१० साली त्यांना कायमस्वरुपी पदोन्नती देण्यांत आली . महापालिकेच्या नियमानुसार कायमस्वरुपी जी पदोन्नती देण्यांत येते त्याला आस्थापनाची शिफारस असते किंवा नाही,की डायरेक्ट शहरविकास एखादी व्यक्ती मागवून घेते की आम्हाला हीच व्यक्ती हवी आहे म्हणून. एकाच व्यक्तीला एवढया पदोन्नती तुम्ही कशाच्या आधारावर देण्यांत आल्या आहेत?

मा.उपआयुक्त मुख्यालय :

महापौर महोदय, आता सन्मा.सदस्यांनी जी माहिती सांगितली की,११.२.२०१० अन्वये,शहरविकास विभागाकडून त्यांना माहिती देण्यांत आलेली आहे. तद्नंतर मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली आणि त्यांना नियमित पदोन्नती ही मा.आयुक्तांच्या मान्यतेने देण्यात आलेली आहे.

श्री.सुरेश कांबळे :

महापौर महोदय,एखादया उप अभियंत्यांना जेव्हा तुम्ही पदोन्नती देता तेव्हा कांही उप अभियंता यांनी कांही हरकत घेतली असेल तर अशी कांही कोणत्या उप अभियंता यांची याबाबत हरकत आली होती कां?

मा.उपआयुक्त मुख्यालय :

महापौर महोदय, याबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही.

श्री.सुरेश कांबळे :

महापौर महोदय,दि.२.६.२००९ रोजी श्री.रविंद्र शिंदे उप अभियंता यांनी हरकतीचा मुद्दा घेतलेला असुन त्याबाबत त्यांनी पत्रव्यवहार सुध्दा केला आहे. तुम्ही जर अशाप्रकारे पदोन्नती देत असाल तर इतर कांही अभियंता यांचेवर अन्याय होत आहे किंवा नाही? तसेच इतर जे मागासवर्गीय अभियंते आहेत त्यांचेवर अन्याय होत आहे असे वाटत नाही कां? आज श्री.संजय देशमुख या पदावर आहेत त्याचा निकष काय आहे याची माहिती देण्यांत यावी.

मा.उपआयुक्त मुख्यालय :

महापौर महोदय, सन्मा.सदस्यांनी जे निकष विचारले आहेत ते आता माझ्याकडे नाहीत. तरी याबाबतची माहिती मी त्यांना लेखी स्वरुपामध्ये देतो कारण अगोदरच्या प्रश्नामध्ये याचा कोठे उल्लेख नाही.

श्री.सुरेश कांबळे :

महापौर महोदय, माझ्या तिसरा व चौथा जो प्रश्न आहे त्याबाबत याठिकाणी उत्तर देण्यांत यावे.

मा.उपआयुक्त मुख्यालय :

प्रभारी कार्यभार देण्याचे अधिकार मा.आयुक्तांचे आहेत. महापौर महोदय सन्मा.सदस्यांच्या चौथ्या प्रश्नाचे उत्तर आहे की, शासनाच्या दि.२३ मे २००६ शासननिर्णयाप्रमाणे जास्तीत जास्त दोन वर्ष अतिरिक्त कार्यभार देण्यांत येतो .

श्री.सुरेश कांबळे :

महापौर महोदय, दि.११.२.२००९ रोजी हा प्रभारी कार्यभार संपला होता, त्याच्या सहा दिवसानंतर लगेचच म्हणजे दि.१७.२.२००९ रोजी ती जी लिस्ट होती त्यांनाच मान्यता देण्यांत आलेली आहे.याचा अर्थ इतर जे उपअभियंता आहेत ते ही कामे करु शकत नाहीत कां? इतर जे अभियंते आहेत त्यांची सुध्दा बरीच वर्ष या महापालिकेत सेवा झालेली आहे त्यांना सुध्दा वाटत असेल की आपले सुध्दा प्रमोशन व्हावे, परंतू श्री.संजय देशमुख हयाच अधिका-यांना तुम्ही पदोन्नती देत आहात. तरी ही गोष्ट चुकीची होत नाही कां?

मा.महापौर :

सन्मा.सदस्य श्री.सुरेश कांबळे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. कर्मचा-यांच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे.

श्री.सुरेश कांबळे :

महापौर महोदय,सेवाजेष्ठता यादीसोबत अंतिम यादीसुध्दा जोडावी लागते.दि.३.२.२००९ रोजी प्रारुप यादी देण्यांत आली होती परंतू अंतिम यादीचा त्यामध्ये समावेश नाही.तरी अशाप्रकारे एकाच व्यक्तीला एवढया पदोन्नती देता. म्हणजेच यामध्ये कांहीतरी गोंधळ असण्याची शक्यता आहे.म्हणजेच इतर जे अधिकारी आहेत ते काम करण्यास लायक नाही असा त्याचा निकष होतो कां?

मा.आयुक्त :

महापौर महोदय,मा.सदस्यांची भावना लक्षांत घेता,या पुर्ण प्रकरणामध्ये फेरतपासणी करुन निर्णय घेतला जाईल कोणावरही अन्याय होणार नाही हे पाहिले जाईल.

मा.सचिव :

प्रश्न क्रमांक ३ -सन्मा.श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांचा आहे.

श्री.प्रकाश राऊत :

महापौर महोदय, आम्ही सन २००७ रोजी निवडून आलो व निवडून आल्यानंतर ठाणे पुर्वमधील ठाणेकरवाडीजवळ भुयारी गटार योजनेचा भूमिपुजन समारंभ झाला. त्या दिवसापासून आजपर्यंत एकसुध्दा इंच काम झालेले नाही. जे काम सुरु आहे ते ठाणे वेस्टकडून येणा-या अंडरग्राऊंड ड्रेनेजचे डबल

स्पीडने चालू आहे,आमचे म्हणणे असे होते की,एकावेळी जी खेदाई चालली आहे,त्या एकाच खोदाईमध्ये दोन्ही बाजुचे काम होऊ शकते. ठाणे ईस्टला जो एक भाग आहे जो नाखवा या बाजुला जाणारा संपूर्ण रस्ता मोकळा पडलेला आहे,त्यामध्ये व्हावे.परंतू माझी तक्रार आहे की,लाला साहेब थोडे सुस्त झाले आहेत ते प्रत्येक गोष्टीला चर्चा करा,मिटींगच्यावेळी शब्द देतात,प्रत्यक्षात तेथे पेपर गेला की,चर्चा व व्हिजिट यामध्ये टाईमपास होतो,ज्या गोष्टी युध्दपातळीवर व्हायला पाहिजे त्या होत नाही आणि मग पावसाळयांत पाणी साचले की,धावाधाव करायची आणि मग सांगायचे की हे असे कां नाही केले.तसेच या अंडरग्राऊंड ड्रेनेजच्याबाबतीमध्ये कोळीवाडा प्रभाग क्र.९०,माझा प्रभाग क्र.९१,सन्मा.भरत चव्हाण यांचा प्रभाग क्र.८८,टिकवानी यांचा वॉर्ड ८९ या चारही वॉर्डला गेले तीन वर्ष आम्ही चारही नगरसेवकांना रोज आम्हाला जेटींग बोलवावे लागते,आमच्याकडे सुसुत्रता नाही.सार्व.बांधकाम खाते हे आरोग्य खात्याकडे बोट दाखविते,ते सार्व.बांधकाम खात्याकडे बोट दाखविणार. तरी याबाबत हे काम कोणाच्या अंडर आहे. जर आम्ही आग्रह धरतो की,अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम आता आमची तीन वर्ष होऊन गेली आहेत आमची पाच वर्षे पुर्ण व्हायच्याआत ते काम पुर्ण व्हायला पाहिजे.तुम्ही उदया वेस्टचे काम पुर्ण करुन ती टाकी चालू कराल आणि ते पाणी जर येथे शिरले तर येथे राहणे मुश्किल होईल.ज्यापमाणे लिपबायर कंपनीने घनकच-याचा कारखाना सुरु केल्यानंतर जी परिस्थिती निर्माणझाली. आज त्याठिकाणी तरण तलाव आहे त्याच्या बाजुला सिव्हरेजचा वास येतो,याचे कारण यंत्रणा बरोबर चालत नाही,ज्यावेळी यंत्रणा बरोबर चालते त्यावेळी वास येत नाही.म्हणजे याठिकाणी बेशिस्त कारभार कोणाचा आहे?तसेच हे काम केव्हा चालू होणार आहे,नाहीतर ठाणे पुर्वमधील जनता नि:पक्षपाती आंदोलन छेडेल.मग त्याठिकाणी कोणतेही तुमची कामे होऊ देणार नाहीत.तरी आमच्या येथील पाईपलाईन केव्हा टाकल्या जाणार याबाबत प्रथम उत्तर देण्यांत यावे.

श्री.गिते : कार्यकारी अभियंता

महापौर महोदय,ठाणे ईस्टमध्ये भुयारी गटार योजनेअंतर्गत एक मलशुध्दीकरण केंद्र एक पंपींग स्टेशन आणि ११ कि.मीटर अंडरग्राऊंड ड्रेनेजची पाईपलाईन असे कामाचे स्वरुप आहे. यातील ११ कि.मी.पैकी दिड कि.मी.चे काम झालेले आहे आणि उर्वरित काम हे पावसाळयामुळे थांबविण्यांत आलेले आहे, पावसाळयानंतर लगेच हाती घेण्यांत येईल. तेथे एक एसटीपी आहे व त्याचे काम पन्नास टक्के पुर्ण करण्यांत आलेले आहे. डिसेंबर अखेर ते सुध्दा पुर्ण होईल. पंपींग स्टेशनचे साठ टक्के काम पुर्ण झालेल आहे आणि ऑक्टोबर पर्यंत पंपिंगस्टेशनचे काम पुर्ण होईल.

श्री.प्रकाश राऊत :

महापौर महोदय,हे मेनलाईनबाबत सांगत आहेत परंतू त्याला जोडण-या ठाणे ईस्टसाठी ज्या लाईन टाकायच्या आहेत त्या टाकल्याच नाहीत,तो पंप चालू करुन उपयोग काहीच नाही. तुम्ही याबाबत लेव्हल घेतलेली आहे कां,बेजबाबदारपणे उत्तरे देऊ नका,सभागृहाची दिशाभूल करु नका.

श्री.गिते :कार्यकारी अभियंता

महापौर महोदय, हा प्रकल्प तयार करताना त्याचे सर्व्हेक्षण करुन त्याचे लेवल घेऊनच डिझाईन तयार करण्यांत आले आहे,व त्याप्रमाणेच काम सुरु आहे आणि यातील अकरा कि.मी.पैकी दिड कि.मी.काम झालेले आहे.उर्वरित काम हे पावसाळयानंतर पुर्ण करण्यांत येईल.

श्री.प्रकाश राऊत :

महापौर महोदय,पावसाळा असल्यामुळे काम बंद आहे ही अशाप्रकारची उत्तरे सभागृहात देऊ नका,तेथे जे अर्धवट रोड बनविण्यांत आलेले आहे ते तशाच अवस्थेत आहेत त्यामुळे स्थानिक

नागरीकांना त्याचा त्रास होत आहे.तेथे जी माती पडली आहे त्याची धूळ उडत आहे व त्यामुळे लोकांना आजार झालेले आहेत.तेथील माती साफ करण्यांत आलेली नाही. जे रोड मोकळे आहेत तेथील काम चालू करण्यांत यावेत. आज तेथे चोकअप झालेले आहे त्यामुळे सोसायटीतील रहिवाशी त्रस्त झालेले आहेत. महापौर महोदय,आपण आयुक्तांना संकेत दयावेत हे जे अधिकारी आहेत त्यांची चौकशी चालू करावी ते याठिकाणी कां लक्ष घालत नाहीत. आम्हाला सावत्रपणाची वागणुक देण्यांत येते.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,राऊत साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की, आज किती ठिकाणी सिव्हरेजचे काम झालेले आहे याबाबतची टक्केवारी सांगावी. जेथे डिझाईनप्रमाणे टाकण्यांत आलेले आहे ती तुम्ही टेंडरमध्ये घेतलेली आहे,सातत्याने प्रत्येक नगरसेवक कार्यकारी अभियंता यांच्यामागे असतील की आमच्या एरियामध्ये सर्व्हेक्षण करा,कधी लाईन टाकणार आहे ते सांगा परंतू मला वाटत नाही की ते मधी त्यांचेबरोबर फिरले असतील किंवा कंसलटंटच्या नावावर बिल फाडले असेल.पुर्णपणे या योजनेवर दुर्लक्ष झालेले आहे तरी तांतडीने या सभागृहात निर्णय घ्यावा व त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याबाबत त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले पाहिजे,आणि लोकांची कामे व्हायला पाहिजे असेच आमचे मत आहे.

श्री.पांडुरंग पाटील :

महापौर महोदय,सन्मा.सदस्य श्री.प्रकाश राऊत यांनी जो प्रश्न विचारलेला आहे की कोपरीचे पंपिंग स्टेशन हे मलनि:स्सारण योजनेचे शेवटचे टोक आहे. वागळे पासून आणि स्टेडियमपासून शहराच्या मुख्यालयापासून संपूर्ण दोन वाहिन्या कोपरीमध्ये येत आहेत. ८० एमएलडीची योजना आपण जवळजवळ १२० एमएलडीवर नेऊन ठेवीत आहोत.ही ठेवत असताना ज्यावेळी विद्युत पुरवठा खंडीत होतो त्यावेळी या मलवाहिन्या चोकअप झाल्यावर कोपरीतील रहिवाशांना त्याचा भयंकर त्रास होतो ही वस्तुस्थिती आहे. या जोडणा-या ज्या वाहिन्या आहेत त्या जवळजवळ सहा मीटर खोल आहेत,तरी कोपरीच्या मलवाहिन्या हया डिप नसाव्यात. हा त्यावेळी कंसलटंटला केलेला आम्ही प्रश्न होता,त्यावेळी कंसलटंटने सांगितले की तुमचे म्हणणे बरोबर आहे,कोपरीच्या ज्या मलवाहिन्या वाहून नेणार आहेत त्याकरीता स्वतंत्र पंपींग स्टेशन आपण निर्माण करणार आहोत.त्यामुळे त्या डिप जाणे अपेक्षित नाही,परंतू त्यावर कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आलेली नाही,म्हणणे मान्य केले परंतू कृतीमध्ये ते आणण्यात आले नाही,त्यामुळे आज जो कोपरीकरांना त्रास होत आहे भविष्यात त्या त्रासाला पुन्हा सामोरे जावे लागणार आहे. लोडशेडींगचा विषय तर गहन होत चाललेला आहे. लोडशेडींग झाल्यानंतर ते पंपींग बंद झाल्यानंतर सक्शन केले जात नाही.याबाबत सदस्यांची वारंवार प्रभाग समितीमध्ये आणि महासभेमध्ये मागणी आहे की याबाबत मल:निस्सारण खाते किंवा या योजनेमध्ये त्याचा विचार होणार आहे किंवा नाही. वागळेची मलनि:स्सारण वाहिनी आपण सुरु केलेली आहे परंतू स्टेडियमवरुन जी वाहिनी येते त्या कामाला आपण सुरुवात केलेली नाही.रामभाऊ म्हाळगी पथावर जेथे प्रकाश राऊत नेतृत्व करीत आहेत त्या भागामध्ये प्रत्येक आठवडयामध्ये हा प्रश्न उदभवतो. १९७४ साली जी मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात आली त्याला पोलिस स्टेशनजवळ काम सुरु केले आणि साडेसात फुटाचा फरक आहे. त्यामुळे पोलिस स्टेशनपासुन रामभाऊ म्हाळगी मार्गापर्यंत त्या प्रत्येक चेंबरमध्ये साडेसात फुट पाणी हे सतत भरलेले असते. रस्तारुदीकरण मोहिम ज्यावेळी राबविण्यांत आली त्यावेळी ब-याचशा सोसायटया खाली गेल्या आणि रस्ते उंच झाले,त्यामुळे मलवाहिनीचे पाणी हे सोसायटीमध्ये जाते.यावर कंसलटंटने ओके म्हटले परंतू त्यावर कोठल्याही प्रकारची सूचना किंवा

सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला नाही.या दोन मुख्य मलवाहिन्या टाकत असताना कोपरीतील लाईन जॉईंट करीत असताना स्वतंत्र लाईन जर टाकली गेली तर हा जो वर्षानुवर्ष कोपरीकरांना त्रास आहे ,त्यातून त्यांची सुटका होऊ शकेल.तरी याबाबत काय करणार आहात याबाबतचा खुलासा होणे अपेक्षित आहे.

मा.नगर अभियंता :

महापौर महोदय,प्रथम सन्मा.सदस्य श्री.राऊत साहेबांचा जो मुद्दा होता की,आपण अदयाप ते काम पुर्ण करु शकलो नाही,आणि कोठेतरी आपले दुर्लक्ष होत आहे असे आपले म्हणणे आहे. मी आपल्याला याबाबत सांगू इच्छितो पुर्ण शहरामध्ये मलनि:स्सारणाची योजना जी आपण १९६६ साली पहिली कार्यान्वित केली त्यानंतर आपण कांही ॲडीशन केले फक्त १७ टक्के कव्हरेज होते आणि २९ टक्के लोकसंख्येकरीता ती होती.याबाबत आपण १८ वर्षापुर्वी त्यांची अंमलबजावणी करायला हवी होती,परंतू ती आपल्याला करता आली नाही त्याची काही कारणे असतील. परंतू आता जी डिझाईन केलेली स्किम आहे यामध्ये २५० एमएलडीची एसटीपीस आणि त्यामध्ये २७ पंपींग स्टेशन आणि ३०० कि.मी.ची पाईपलाईनची योजना आपण अंमलात आणत आहोत. आणि हे करीत असताना शहरामध्ये ज्या एक्झीस्टिंग लाईन्स आहेत त्याची जी क्षमता आहे ती क्षमताच नाही आपण कोपरीचा जो सखल भाग आहे लास्ट डिस्पोजल एन्ड आहे तेथे ओव्हरफ्लो होत आहे, आपल्या सर्वांना आठवत असेल की यावर्षी आपण एजन्सी नेमली व त्यामध्ये एक एक वॉर्डवाईज सक्शन मशिन ,ड्रेजर याकरीता एजन्सी अपॉईन करुन त्यांना स्पेशली काम देण्यांत आलेले आहे.आपल्याला माहित होते की,आपली जी कॅपॅसिटी एक्झस्टींग सिस्टीम बरोबर नाही म्हणून आपण ते करुन घेतले व ते काम करुन घेत आहेत,ज्या ज्याठिकाणच्या तक्रारी जास्त येतात,कोपरीमध्ये जास्त प्रॉब्लेम आहे,तेथे २५ इमारती असुन तेथे ड्रेनेज सिस्टीम बरोबर नाही. तसेच तात्पुरत्या स्वरुपात आपण हे सक्शन मशिनने काम करीत आहोत व हे जे प्रोजेक्ट आहे,पहिले आपल्याला वरुन लोड आणावा लागत आहे.कंस्ट्रक्शनची कंस्पेट काय असते की,पंपिंगस्टेशनवाईज आपण काम केले पाहिजे.आपण येथे असे केले की प्रथम वरुन सिव्हर लाईन टाकून आपण खाली येत आहोत.महावीरचे जे प्रथम कॉन्ट्रॅक्ट होते ते जून २००७ मध्ये आपण टेंडर काढून त्याला ३६ महिन्याचा पिरियड होता या जून २००७ मध्ये पुर्ण ५० कि.मी.चे काम संपले पाहिजे होते परंतू प्रत्यक्षात २५ कि.मी.चे काम झालेले आहे.सिव्हरेज सिस्टीममध्ये असे असते की,एजन्सीची जर तयारी असेल तर एकावेळी पूर्ण शहरामध्ये आपण करु शकतो परंतू करु शकत नाही कारण ट्रॅफिकचा मुद्दा आहे.नागरीकांना त्रास होत आहे त्यामुळे एकाचवेळी सगळीकडे आपण काम करु शकत नाही. १२ कि.मी.काम हे कोपरीमध्ये आहे याबाबत सन्मा.सभागृह नेते यांना याची माहिती आहे की,एकाचवेळी १२ कि.मी.चे काम जर चालू केले तर संपूर्ण रस्ते आपल्याला बंद करावे लागतील,परंतू तसे आपण करु शकत नाही,व आपले ओपन कट आहे.ट्रेंचलेसबाबत आपण बरेच प्रयत्न केले,यामध्ये सुध्दा एक लिमिटेशन आहेत,तसेच त्याची जी कॉस्ट आहे ती कॉस्ट आपण बेअर करु शकतो कां,आजच्या तारखेमध्ये या कॉस्टवर आपल्याला किती बोजा पडलेला आहे,याची आपल्या सर्वांना कल्पना आहे.कारण सेंट्रल गर्व्हमेंटकडून जो आपल्याकडे निधी उपलब्ध झालेला आहे ते ५० टक्के कॉंट्रीब्युशन आहे.आणि बाकी बोजा आपल्याला सहन करावा लागतो,दिल्लीमध्ये जेव्हा आपण ट्रॅसलेटबाबत सीपीएच्या बरोबर चर्चा करत होतो त्यांनी त्यावर आपल्याला प्रतिसाद दिला नाही ओपन कटच आपण केले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. आज सुध्दा शहरामध्ये २५ कि.मी.लाईन आपण आयडेंटीफाय केलेली आहे,जेथे ट्रेसलेट पाहिजे परंतू त्याचा खर्च जास्त आहे,कोपरी हे शेवटचे टोक आहे व तेथे काम करताना आतापर्यंत दिडकिलोमीटर काम केले आहे,महावीरबरोबर

दिवसरात्र आपले भांडण होत आहे. मी आयुक्त साहेबांना सुध्दा सांगितले आहे की,या शहा इंडस्ट्रजनी यांनी सांगितले आहे की कामच करायचे नाही कारण सिव्हीलमध्ये प्रोगेस होत नाही,सगळा रस्ता एकाच वेळेस खणता येत नाही.

त्याचप्रमाणे आत्ताच मा.सभागृह नेते यांनी सांगितले की,आपण ते लिप्ट का करु शकत नाही,ज्यावेळी आपण ही स्किम डिझाईन केली त्यावेळी आपल्यासमोर नव्हते की,लिप्ट स्टेशन वगैरे टाकुया आणि हयाला रेस्ट करुया.गेल्याचवर्षी आपल्यासमोर कांही अमेरिकन एजन्सी आपल्यासमोर आली त्याने प्रेझेंटेशन दिले.त्यावेळच्या आयुक्तांसमोर याबाबत प्रेझेंटेशनसुध्दा झाले होते. कोपरीबाबत आपण जे बोलला की,तेथे सुध्दा डेप्ट जास्त आहे ते जर कोठे कमी करता आले तर नक्कीच त्याबाबत कंसलटंटबरोबर बसून पुन्हा त्याची शहानिशा करुन ११ कि.मी.पैकी ४ कि.मी.ते करता येईल आणि त्याला गती देण्यासाठी आता बाकी राहिलेले जे काम आहे त्याबाबत पुन्हा एकदा सर्व्हे करुन दोन दिवसामध्ये....,

श्री.प्रकाश राऊत :

दोन दिवसानंतर नाही,उदया तुम्ही,गितेसुध्दा आले पाहिजेत. तसेच तुम्ही वेस्टसाठी लाईन टाकली ,त्या दोन्ही लाईन एकाच रोडला पडल्या असता,आज तुम्ही तो खोदून ती टाकुन झाली पुन्हा बुजविली आणि आता पुन्हा तेथेच खोदणार. ११६ पैकी ६ वॉर्ड फक्त ठाणे ईस्टला आहेत,त्याचे क्षेत्रफळ अगदी कमी आहे.उदया तुम्ही बजेट सगळीकडे वापरणार व संपणार मग तुम्ही पुन्हा हेच सांगणार की आता केंद्राकडून बजेट नाही म्हणून. ज्योत्सना सोसायटीमध्ये आता चला,ते लोक त्या घाणीतून जात आहेत आणि ती घाण साईनाथनगरमध्ये गेल्या ५० वर्षापासुन चाळी असलेल्या एका बाजुला पावसाचे पाणी जमते तर दुस-या बाजुला ही घाण त्यांच्या घरात शिरते, त्यामुळे ते राहू शकत नाहीत. तरी याबाबत आम्ही तिव्र आंदोलन सुरु करु.

मा.महापौर :

उदया सकाळी ११ वाजता,मी,सभागृह नेते,विरोधी पक्ष नेते एकत्र आम्ही तुमच्या प्रभागात पाहणी करु.

मा.सचिव :

चौथा प्रश्न सन्मा.सदस्य सुधीर बर्गे यांचा आहे.

श्री.सुधीर बर्गे :

महापौर महोदय,प्रथम आपले नवनिर्वाचित आयुक्त श्री.आर.ए.राजीव यांचे हार्दीक अभिनंदन. माझ्या प्रश्न क्रमांक १ वर उत्तर मिळाले आहे . या डी.पी.रस्त्यामध्ये ही फक्त इमारत असुन या इमारतीकरीता आजूबाजुच्या कमीत कमी ४० ते ५० हजार लोकांचे आजुबाजुला जी रहदारी होणार आहे ती रहदारी थांबलेली आहे, नविन आयुक्तांना मी विनंती करेन की, या सर्व लोकांचा विचार करता,आपल्याला कोणाला बेघर करायचे नाही परंतू नियमाने ज्या आपल्या कायदयामध्ये तरतुद असतील त्या आपण लवकरात लवकर तपासून हा रस्ता लोकांसाठी खुला करावा कारण त्या विभागामध्ये चर्चा सुरु आहे की,आम्ही लाखो करोडो रुपये टॅक्स भरतो परंतू आम्हाला हा रस्ता उपलब्ध करुन देत नाहीत.कारण जर एखादा दक्ष नागरीक या इमारतीच्या विरोधात जनयाचिक दाखल केली किंवा उच्च न्यायालयात गेला की,महापालिकेची परंपरा आहे मग लगेच कारवाई होते. तरी आपण या गोष्टीची वाट न पाहता त्वरीत हा रस्ता लोकांसाठी खुला करावा अशी मी आपल्याकडे अपेक्षा व्यक्त करतो .

महापौर महोदय,माझ्या दुस-या प्रश्नाबाबत बोलायचे आहे की,शहरविकास विभागाने हा जो नकाशा मंजूर केलेला आहे,याठिकाणी मी आपणास सांगू इच्छितो की,हा पुर्णत:चुकीच्या पध्दतीने विकास प्रस्ताव मंजूर केलेला आहे.कारण या इमारतीच्या तीन फुटावर नाला असुन कमीतकमी दहा ते पंधरा मीटर तरी अंतर नाल्याचे त्या इमारतीपासून असावे असा नियम आहे, तसेच या इमारतीमध्ये जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची अँबुलन्स किंवा फायरब्रिगेड अशाप्रकारची अत्यावश्यक सेवा जाऊ शकत नाही,व असे या उत्तरामध्ये सविस्तर दिलेले आहे. तरी याबाबत सुध्दा आपण लक्ष घालावे जेणेकरुन या इमारतीमध्ये जे नागरीक घर घेतील त्यांची फसवणुक होणार नाही ,तसेच त्यांना अत्यावश्यक सेवेपासून वंचित रहावे लागणार नाही.

महापौर महोदय,प्रश्न क्रमांक ३ मध्ये बरेच प्रश्न होते व त्याची जी उत्तरे देण्यांत आलेली ती सर्व उत्तरे खोटी आहेत असे जाहिर करतो,दिशाभूल केलेली उत्तरे आहेत, तरी याबाबतची खरी उत्तरे पूढील महासभेत दिली तर बरे होईल, याबाबतीत जर खरी उत्तरे हवी असतील तर मी सुध्दा तुम्हाला उत्तरे देऊ शकतो,कारण ही इमारत माझ्या प्रभागात असुन तेथील लोकांची मला वारंवार तक्रार येते.सार्वजनिक वहिवाट या विकासकाने बंद केलेली आहे,तरी या गोष्टीकडे आपण जातीने लक्ष दयावे.

मा.महापौर :

सन्मा.सदस्यांना ही उत्तरे चुकीची वाटत असतील तर याबाबत या सभागृहात उत्तर मिळतील परंतू प्रश्न राखून ठेऊ नका.

मा.सहा.संचालक नगररचना :

महापौर महोदय,प्रश्न क्रमांक दावा क्रमांक जो आहे त्याबाबत विधी विभागाकडून माहिती घेण्यांत आलेली आहे.परंतू तो विकास प्रस्तावाशी संबंधिंत नसल्याने या विभागाशी निगडीत नाही असे आम्ही उत्तर दिलेले आहे.

श्री.सुधीर बर्गे :

तुम्हाला उत्तरे वेगळी मिळाली आहेत मला उत्तरे वेगळी मिळाली आहेत.दावा क्र.म्हणजे विधी विभागाशी आहे तुमच्या मते विकास प्रस्ताव क्रमांक परंतू तो दावा क्रमांक आहे. तुम्हाला जी उत्तरे मिळाली आहेत ती ४५९ ची आहेत.

<u>श्री.मंगल शिंदे -सहा.आयुक्त:</u>

महापौर महोदय,दावा क्र.४५० या इमारतीच्या विकासकाचे नांव कांय?- आमच्या दप्तरी दिनेश वाघेला असे नाव आहे आणि त्याला २.६.२००९ रोजी नोटीस बजाविण्यांत आलेली आहे. त्यानंतर स्थगिती आदेश होते कांय ? तर स्थगिती आदेश होते.याचा संदर्भ विधी विभागाच्या पत्रासंदर्भात सुध्दा मी दिलेला आहे,त्यामुळे ही माहिती खरी आहे. त्या जागेवर इमारत बांधण्यापुर्वी कोणत्याप्रकारचे स्ट्रक्चर होते ? याबाबत माहिती देण्यांत आली आहे की,हरिश्चंद्र वाळवे यांचे तळ + एक मजल्याचे लोड बेअरींगचे बांधकाम होते,व ही माहिती कळवा विभागाकडून घेण्यात आलेली आहे, व त्या माहितीमध्ये त्यांची नांवे सुध्दा देण्यांत आलेली आहेत.

श्री.सुधीर बर्गे :

दुस-या प्रश्नामध्ये आहे वाळवे यांचे घर होते,पहिल्या प्रश्नामध्ये दिले आहे की,साईनाथ अपार्टमेंट नावाची इमारत होती.

श्री.पांडुरंग पाटील :

महापौर महोदय,सन्मा.सदस्य श्री.सुधीर बर्गे यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत. त्या प्रश्नामध्ये त्यांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तरामध्ये बरीच विसंगती आहे,कारण त्यांना माहितीच्या आधारामध्ये वेगळी उत्तरे दिलेली आहेत.आणि प्रत्यक्ष सभागृहात त्यांना वेगळी उत्तरे देण्यांत आलेली आहे. तरी त्यांना आपल्या दालनात बोलावून घेण्यांत यावे.

मा.महापौर :

तुम्हाला सविस्तर माहिती देण्यांत येईल व याव्यतिरिक्त तुम्हाला चर्चा करावयाची असेल तर ती पूढील महासभेत करण्यांत यावी.

श्री.सुधीर बर्गे :

महापौर महोदय, माझ्या चौथ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये देण्यांत आले आहे की,नऊ प्रभाग समितीनिहाय माहिती संकलित करुन पूढील सभेत देण्यांत येतील.आपण प्रत्येक प्रभाग समितीनिहाय आपले जे वृत्तपत्र असतात त्यातून लोकांना आवाहन केले होते,तरी त्याच्या नऊ कॉपीज मला मिळाल्या असत्या तरी चालल्या असत्या.

मा.महापौर :

तुमचे सुधारीत तुम्हाला जर मिळाले नसतील तर पूढील सभेत पुन्हा याबाबतची पुर्ण माहिती देण्यांत येईल.

त्याचप्रमाणे प्रश्नोत्तराचा एक तास संपलेला आहे लक्षवेधीला सुरुवात करण्यास कांही हरकत नाही.

श्री.सुधीर बर्गे:

ठिक आहे,पुढील महासभेत उत्तरे देण्यांत यावीत.

मा.सचिव :

सभागृहापुढे दोन लक्षवेधी आलेल्या आहेत.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,नियमाप्रमाणे सभा तहकूबी अगोदर वाचायला हवी.अगोदर दोन सभा तहकूबी वाचा मग लक्षवेधी वाचा व त्यानंतर तुम्ही निर्णय दयावा.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदय, या सभागृहामध्ये दोन दिवसापुर्वी ज्ञानेश्वरनगर येथे जी दुर्घटना झाली,व त्या दुर्घटनेमध्ये आठ जणांचा मृत्यु झालेला आहे,मला वाटले याठिकाणी दुखवटा ठराव होईल परंतू दुर्देवाने या सभागृहात कोठल्याही प्रकारचा अशा शब्द निघाला नाही,म्हणून मला वाईट वाटते. आज त्या बिल्डरच्या चुकीमुळे त्या निष्पाप आठ जणांचा मृत्यु झालेला आहे,त्याचा उच्चारसुध्दा या महासभेमध्ये होत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

मा.सचिव :

सभागृहापुढे दोन सभा तहकूबी आलेल्या आहेत,सदर दोन्ही सभा तहकूबी मी वाचून दाखविते. प्रथम विरोधी पक्षनेता श्री.नजिब सुलेमान मुल्ला यांची सभा तहकूबी वाचून दाखविते.

प्रति,

मा.महापौर सो,

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

यांसी,

स.न.वि.वि.

विषय : सभा तहकूबीची सूचना.

महोदय,

वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालयाजवळ दोस्ती समुहातर्फे विकासकाने नाल्याची सहा-सात फुटाची भिंत तशीच ठेऊन त्यावरच १४ फुटापर्यंत बांधकाम केले आणि मातीचा भराव टाकला. त्यामुळेच भिंतीवर दाब आला आणि आठ जणांचा प्राण ती भिंत घेऊन गेली.

बुधवारी पहाटे साडेचारच्या सुमारास ज्ञानेश्वरनगर येथील दोस्ती विहार संकुलाची संरक्षक भिंत शेजारील घरांवर कोसळुन झोपेत असलेल्या आठ जणांचे प्राण गेले. दोस्ती समुहांतर्फे याठिकाणी उत्तुंग इमारती बांधण्यांत येत आहेत. या इमारतीसाठी पोडियम पार्कींगसाठी स्लॅब बांधण्यासाठी नाल्याच्या भिंतीवरच दगडांचा थर साचून भिंतीची उंची वाढवण्यांत आली. पोडियम पार्कींगसाठी दोन मजल्यापर्यंत स्लॅब टाकण्यांत येणार आहे. त्यासाठी तळमजल्यावर विकासकाने दगड टाकून त्यावर मातीचा भराव टाकला. हा भराव पहिल्या पावसात पाण्याखाली गेला आणि त्याचा दबाव संरक्षक भिंतीवर पडला आणि भिंतीला लागून असलेल्या चाळींवर १४-१५ फुटी भिंत कोसळली. त्यामध्ये शिवाकांत जयमुरत गिरी ४५, इंद्रावती इंदर सिंह ४०, मीरा विश्वनाथ ठाकुर ४०, विश्वनाथ लिलाधर ठाकूर ४५, सविता शिवशंकर भगत २५,संगिता शिवशंकर भगत २६, पिंकी रघुनाथ भगत १५, सुनयना दुधनाथ भगत १६, हे मयत झाले असुन, सनी विश्वनाथ ठाकूर ८, सीमा भगत ३५, दुधनाथ भगत ३०, रोहित भगत १०, गुडान सिंग अशी जखमी व्यक्तींची नांवे आहेत.

सदरची घटना पहाटेच्या वेळी घडल्यामुळे घरात असलेले सर्व लोक झोपेत होते. अचानक भिंत कोसळून मातीचा भराव अनेकांचा घरात गेला,त्या भरावाखाली भगत, ठाकुर कुटुंबियांवर काळासने घाला घातला.

तरी या प्रकरणाचा निषेध म्हणून आजची सभा तहकूब करण्यांत यावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी ही विनंती.

सूचक : श्री.नजिब मुल्ला. अनुमोदक : श्री.नारायण पवार.

---------

मा.महापौर सो,
ठाणे महानगरपालिका.
यांसी,
स.न.वि.वि.

विषय : सभा तहकूबीची सूचना.

महोदय,

ठाणे महानगरपालिकेमार्फत मागिल ब-याच वर्षापासून ठाणे महापौर मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीरित्या राबविण्यांत येते. ही स्पर्धा अतिशय नामांकित असुन, या स्पर्धेमध्ये देश व विदेशातील स्पर्धक व जिल्हयातील आदिवासी गरीब मुलेही या स्पर्धेत सहभागी होत असतात. त्यामुळे पर्यायाने ठाणे महानगरपालिकेचा नावलौकिक वाढत आहे. हा नावलौकिक वाढविण्यासाठी तत्कालीन महापौर मा.श्री. राजन विचारे साहेब हे अथक परिश्रम घेत असताना या संस्थेनेच त्यांना अनंत अडचणी निर्माण केल्या होत्या. त्य सर्व अडचणींवर मात करुन ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र मॅरेथॉन ट्रस्टकडून ही स्पर्धा भरविण्यासाठी मान्यता घेऊन ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीरित्या राबविलेली आहे.

परंतू यावर्षी ठाणे महापालिका आणि ठाणे मॅरेथॉन ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन या स्पर्धेची घोषणा करण्यांत आली आहे. ही ठाणे महानगरपालिकेच्या दृष्टीने भूषणावह बाब नाही. तसेच ही स्पर्धा ठाणे महानगरपालिका स्वतंत्रपणे राबवित असताना व ही स्पर्धा दूस-या कोणत्याही संस्थेबरोबर राबविणेबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय झालेला नसताना ही स्पर्धा ठाणे मॅरेथॉन ट्रस्ट यांच्य संयुक्त विद्यमाने राबविण्याचा पायंडा घातला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाव्दारे महापौर ही स्पर्धा राबविण्यामध्ये सक्षम नाही असा चुकीचा संदेश ठाणेकर जनतेमध्ये व जनमाणसांमध्ये जात आहे व असे घडू नये व ठाणे महानगरपालिकेची प्रतिमा मलीन होऊ नये म्हणून या गंभीर बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधीत आहे. तसेच या स्पर्धेसाठी ठाणे मॅरेथॉन ट्रस्ट हे स्पर्धकांकडून रु.२५०/- इतकी फी घेणार असल्याबाबत नमूद करण्यांत आले आहे. ठाणे महानगरपालिकेमार्फत ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेकरीता अनुदान देण्यांत येते. तरी देखिल ठाणे मॅरेथॉयन ट्रस्ट हे स्पर्धकांकडून २५० रुपये फी घेणार आहेत.

ठाणे महानगरपालिका ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉयन आजपर्यंत मागिल तीन वर्ष यशस्वीरित्या राबवित असताना मग यावर्षी ठाणे मॅरेथॉन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्याची आवश्यकता ठाणे महापालिकेला का भासावी ?

मागील तीन वर्षाप्रमाणेच ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन आयोजित करण्यांत यावी. जर ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन ही स्पर्धा ठाणे मॅरेथॉन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने होणार असेल आणि स्पर्धकांकडून जर २५० रु. फी आकारली जाणार असेल तर त्यास आमच्या लोकशाही आघाडी गटाच्या नगरसेवकांची हरकत आहे.

तरी या प्रकरणाचा निषेध म्हणून आजची सभा तहकूब करण्यांत यावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी ही विनंती.

सूचक : श्री.नजिब मुल्ला. अनुमोदक : श्री.नारायण पवार.

मा.सचिव :

सभागृहापुढे दोन लक्षवेधी सूचना आलेल्या आहेत त्या दोन्ही लक्षवेधी सूचना मी वाचून दाखविण्यांत येत आहे. प्रथम सन्मा.श्री.अशोक राऊळ यांची लक्षवेधी सूचना वाचून दाखवित आहे.

प्रति,
मा.महापौर सो,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

यांसी,
स.न.वि.वि.

विषय : लक्षवेधी सूचना.

आगामी मा.सर्वसाधारण सभेमध्ये नाले सफाईच्या विषयावर चर्चा करणेसाठी लक्षवेधी सूचना सादर करीत असुन कृपया ती या महासभेत घेण्यात यावी ही विनंती.

आमची लक्षवेधी सूचना अशी आहे की, ठाणे महापालिका हद्दीत सुमारे ८१८ किमी लांबीचे नाले असुन त्यांची सफाई पावसाळयापुर्वी होणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने गटारांची साफसफाई /दुरुस्ती,रस्त्यावरील खड्डे आदी कामांची सुरुवात करण्यांत आलेली नाही. त्यामुळे यंदाच्या पावसाळयांत शहरात पुन्हा पुरपरिस्थिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नाले सफाई न झाल्यामुळे नाल्याचे दुषित पाणी लोकांच्या घरात शिरुन जीवनावश्यक वस्तुंचे नुकसान आणि रोगराई पसरते. ठाणे शहरातील सखल भागामध्ये देखिल पाणी साचून नाले तुंबल्यामुळे नागरीकांचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ठाणे शहरातील नाल्यांची साफसफाई न झाल्यामुळे नाल्याची अवस्था अतिशय बिकट असुन, नाल्यातून चालता येईल अशी अवस्था निर्माण झालेली दिसून आली. नाल्यातील कचरा रस्त्यावर अस्ताव्यस्त पसरलेला असुन त्यामुळे प्रभागातील नागरीक त्रस्त झाले असुन, मोठया प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून आले आहे.

प्रशासनाने नाले सफाईचे काम ८०/- पुर्ण झाल्याचा जो दावा केलेला आहे तो पुर्णपणे चुकीचा असुन, प्रशासन पदाधिका-यांची व नागरीकांची दिशाभूल करीत असल्याची आमची पुर्णपणे धारणा झालेली आहे आणि या नाले सफाईच्या कामामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे असा स्पष्ट आरोप आहे. नाले सफाईच्या या उडालेल्या बोजवा-यामुळे शहरातील सखल भागात दरवर्षीप्रमाणे यंदाही पाणी तुंबण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे पावसाच्या पाण्यामुळे संबंधित परिसरांत पाणी तुंबून नागरीकांची जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे पावसाळयापुर्वी नाले सफाई होणे आवश्यक असल्यामुळे सदर प्रकरणी प्रशासनाकडून अदयापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे वरीलप्रमाणे विषयावर या महासभेमध्ये सविस्तर चर्चा होणे गरजेचे आहे.

कृपया सदरची लक्षवेधी या महासभेत चर्चेसाठी घेऊन त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यास विनंती आहे.

सूचक : श्री.अशोक राऊळ . अनुमोदक : श्री.नारायण पवार.

-------

मा.सचिव:

सदरची लक्षवेधी सन्मा.सदस्य श्री.सुधीर रामचंद्र भगत यांची आहे.

प्रति,

मा.महापौर महोदय,

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

यांसी,

स.न.वि.वि.

विषय : लक्षवेधी सूचना.

महोदय,

आगामी मा.सर्वसाधारण सभेमध्ये मागासवर्गीय निधीच्या विषयावर चर्चा करणेसाठी लक्षवेधी सूचना सादर करीत असुन कृपया ती या महासभेत घेण्यांत यावी ही विनंती.

महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी मागासवर्गीय निधी उपलब्ध करुन देण्यांत येते व निधीचा वापर प्रत्येक विभागातील मागासलेल्या भागाकरीता करण्यंात येतो. य निधीतून फार मोठया प्रमाणात मागासलेल्या भागातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला जातो, परंतू या लक्षवेधीव्दारे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, सन २००९-१० या आर्थिक वर्षातील मागासवर्गीय निधीचा वापर सन २०१०-११ मधील सहा महिने लोटून गेले तरी देखिल करण्यंात आलेला नाही व सन २०१०-११ या वर्षातील मागासवर्गीय निधीचे वाटप देखिल करण्यंात आलेले नाही.

मागासवर्गीय निधीसंदर्भात घाईने वाटप केल्यानंतर त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो हे आपल्या यापुर्वीसुध्दा निदर्शनास आलेले आहे व त्यामुळे कांही मागासवर्गीय भागातील नगरसेवकांना त्यांच्या भागामध्ये नागरी सुविधा पुरविण्यामध्ये गैरसोय निर्माण होते. त्यामुळे या मागासवर्गीय निधीच्या वापटपासंदर्भात ठोस नियोजन करुन ठराविक कालमर्यादेंत मागासवर्गीय निधीचे वाटप करण्यंात यावे अशी सर्व नगरसेवकांची मागणी आहे.

या प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे मागासवर्गीयय विभागातील जनतेला नागरी सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे ही अतिशय खेदाची बाब आहे.

सन २००९-२०१० मधील मागासवर्गीय निधीचे वाटप न झाल्यामुळे व नविन सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील मागासवर्गीय निधीचे वाटप न झाल्यामुळे मी सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी ही लक्षवेधी सूचना मांडत आहे.

कृपया सदरची लक्षवेधी या महासभेत चर्चेसाठी घेऊन त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यास विनंती आहे.

सूचक : श्री.सुधीर भगत. अनुमोदक : श्री.महेंद्र कोमुर्लेकर.

मा.महापौर :

याठिकाणी दोन सभा तहकूबी आलेल्या आहेत त्याच्यापैकी आपण वर्तकनगर कार्यालयासमोर जे दोस्ती संकुल आहे ती तहकूबी घेत आहोत.तत्पुर्वी दुसरी जी सभा तहकुबी मांडलेली आहे त्याबाबत थोडसे माहिती मी आपल्याला देत आहे की,ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन याच नावाने होणार आहे,जसे तुम्ही म्हटलेले आहे,यामध्ये कोणत्याही प्रकारचे शुल्क आपण आकारणार नाही. गेले चार वर्ष आपण ज्या पध्दतीने ही मॅरेथॉन घेत आहोत त्याचपध्दतीने हयावर्षी सुध्दा होणार आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,यामध्ये आम्ही प्रामुख्याने एक विषय मांडला होता की,ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन जे होणार आहे ते कोणत्या संयुक्त विदयमाने होता कामा नये.मागिल तीन वर्षाचा याठिकाणी खुलासा व्हावा की,ठाणे ॲथलेटिक्समधून घेतले आहे की,महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशनच्या

मान्यतेनुसार घेतले आहे,याबाबत खुलासा दयावा,तरी त्यारितीनेच व्हायला पाहिजे.व त्याठिकाणीच व्हायला पाहिजे.

मा.महापौर :

ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन या नावानेच होणार आहे.आणि हे महापालिकाच करणार आहे.ज्यापध्दतीने गेले तीन ते चार वर्षे करीत आहेत त्याचपध्दतीने होणार आहे.

श्री.नजिब मुल्ला :

आपण मागणी कबुल केली त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय,हा प्रश्न निर्माण होण्याचे कारण त्या पत्रकार परिषदेमध्ये ठाणे महापालिकेचे कांही अधिकारी व पदाधिकारी गेले होते व त्यावेळी अशाप्रकारचे अनाऊंस झाले होते.

मा.महापौर :

जरी अधिकारी वगैरे गेले असतील तर महापौर या नात्याने माझ्याकडे तो अधिकार आहे ,अशा प्रकारची कोणतीही घोषणा आपण केलेली नाही.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,आज सकाळी या विषयावर प्रशासनामार्फत एक खुलासा मिळालेला आहे,त्यामध्ये ठाणे महापालिका उपआयुक्त श्री.निंबर्गी साहेब आहेत.त्यांच्या सहीने हा खुलासा आहे व त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले की,आम्ही कोठेही अधिकृत घोषणा केलेली नाही,किंवा प्रेस कॉंफरसमध्ये गेलो नाही. परंतू जेथे घोषणा झाली त्या फोटोमध्ये तर अधिकारी आहेत,तरी अशाप्रकारची खोटी उत्तरे त्यांनी आम्हाला देऊ नयेत.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय,संबंधित नेते उदया राष्ट्रवादीमध्ये गेले किंवा कॉंग्रेसमध्ये गेले तरी ही आपली ठाणे महापालिकेची मॅरेथॉन व्हावी.

मा.सचिव :

मा.महापौर साहेब यांच्या आदेशानुसार श्री.नजिब मुल्ला विरोधी पक्ष नेता यांच्या दि.१८.६.२०१०ची जी सभा तहकूबी मांडलेली आहे,वर्तकनगर प्रभाग समितीतील घटनेसंदर्भात ती चर्चेला घेण्यांत येत आहे.

श्री.नजिब मुल्ला :

महापौर महोदय,दोस्ती विहार या गृहसंकुलाजवळ जी भिंत कोसळून आठ लोकं जे मृत्यु पावले आहेत त्यांना आधी श्रध्दांजली वाहून त्यांच्या कुटुंबाला देवाने सहनशक्ती व सहनशिलता देऊन त्या पुर्ण कुटुंबावर जे दुखवटयाचे वादळ त्यांचेवर आलेले आहे आणि आज या पुर्ण शहरी भागात नव्याने विकसित होणारे परिसर आहेत त्यांच्या हलगर्जीपणामुळे हया लोकांचा जीव घेण्यांत आलेला आहे. या विषयावर लक्ष वेधीत करुन मी आणि माझे सहकारी यांनी सभा तहकूबीची सूचना मांडली आहे. काल पहाटे जेव्हा हे प्रकार घडला आणि बरेचसे पदाधिकारी,नगरसेवक या सर्वांनी स्थळ पाहणी करण्यांत आली. प्रशासनामार्फत विशेष म्हणजे शहरविकासमार्फत जेव्हा कोणत्याही विकास कामांना आपण मंजुरी कोणत्या पध्दतीने देता फक्त डीसीरुलची प्रोव्हीजन बघता आपण फक्त पुस्तकांनी दिलेले अटी शर्ती यानुसार स्थळ पाहणीवर कोठल्या पध्दतीचे काम होत नाही याचे कोणत्याही प्रकारे लक्ष दिले जात नाही. महापौर महोदय, सभा तहकूबी हा विषय आपल्यासाठी जास्त गांभिर्य आहे परंतू आमची विनंती आहे की,शहरविकास विभागाने हे बिल्डर लोकांना पाठीशी घालून अशाप्रकारे आणखी जिवितहानी होऊ नये याबाबत लक्ष घातले पाहिजे.ज्या पध्दतीने तेथे बांधकाम चालू आहे जेव्हा विकासकांना फक्त छळायचे असेल तर भराव केला किंवा नाही,एमआरटीपी कायदा वेगवेगळे डिसी रुल याची तरतुद आहे किंवा नाही,त्यांनी परवानगी घेतली किंवा नाही अशाप्रकारे नोटीस बजावितात. परंतू ज्यांना मदत करायची अशा कोणत्याही पध्दतीची किंवा अशाकोणत्याही नियमाखाली भराव केल्याची आपण परवानगी आहे किंवा नाही याबाबत कोठे लक्ष घातले गेले नाही. पुर्णपणे तेथे १५ फुट उंच भिंत बांधली गेली व त्या भिंतीला बाजुला पुर्णपणे मातीचा भराव करण्यांत आला.वास्तविक भिंतीची परवानगी घ्यायला हवी होती,आपण प्लान मंजूर करत असताना आपल्या कायदयामध्ये भिंत उंच करीत असताना त्याचे टेक्निकल स्पेसिफिकेशन कोठल्या पध्दतीचे असावे असा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. याबाबतीत बिल्डींग इन्स्पेक्टर असो किवां कार्यकारी अभियंता असो त्यांनी कोठल्याही प्रकारे लक्ष घातलेले नाही. नाल्याजवळचा असलेले ते काँक्रिटमध्ये किंवा विटेच्या बांधकामाची असावी याबाबतीत कोठले लक्ष केंद्रीत केले नाही. आपण साईटवर कायदेशीर कामे होत आहेत किंवा नाही याबाबतीत कोठलीही जबाबदारीने शहरविकास विभागाने वागणुक केलेली नाही. फक्त प्लॅन मंजूर झाला की,हे ग्राहय धरायचे की तो विकासक कायदेशीर पध्दतीने काम करत आहे आणि आम्ही किंवा नागरीकांनी त्याबाबतीत बेकायदेशीर कामे होत असल्याबाबत तक्रार केली की त्या तक्रारची अनुषंगाने साईटवर जायचे आणि पाहणी करायची व पहायचे की कोठे बेकायदेशीर कामे केलेली आहेत. खरे म्हणजे प्लॅन मंजूर केल्यानंतर तेथील कामे नियमाप्रमाणे होत आहेत किंवा नाही,ही सर्व जबाबदारी त्या कार्यकारी व बिल्डींग इन्सपेक्टरची आहे.आज ते त्यांच्या नैतिक जबाबदारीचा विसर पडल्यामुळे आज ही दुर्घटना घडलेली आहे व त्यामध्ये लोकांचा जीव गेलेला आहे. आज ते जबाबदारीने वागत असते तर ही दुर्घटना घडली नसती. प्लॅन मंजूर केल्यानंतर इलेव्हेटेड पोडियम तयार केले जातात,वॉटर टेबलचे कोणत्याही प्रकारे लक्ष घातले जात नाही.सिव्हरेज डिपार्टमेंटची एनओसी देण्यांत येत नाही.मातीचा भराव करुन आजूबाजुचा परिसरामध्ये राहणारे लोकं ही किती खोल भागात आहेत किंवा त्यांच्यावर त्याचा परिणाम होईल याबाबत शहरविकास विभाग व प्लॅनिंग ॲथॅरिटी कोणत्याही प्रकारे लक्ष देत नाही. आज या दुर्लक्षतेमुळे ही दुर्घटना घडलेली आहे. आपण जागेवर पाहणी केल्यावर त्याचे ग्राऊंड झिरो भराव केल्यानंतर ती होती त्याच्या छतापेक्षा जास्त आपण उंचीवर उभे होतो. जूनी भिंत पाहिली ती इंडियन स्मेलटींगची कंपनी होती तिच्या पेक्षा १५ फुट उंच भराव करण्यांत आला होता. म्हणजे त्या भरावाची भिंत जेव्हा उंच करण्यांत

आली होती त्याबाबत शहरविकास विभागाने त्या इमारतीचे काम करीत असताना जागेवर पाहणी करुन लक्ष घालण्याची गरज नव्हती कां? कायदयाची तरतुद पाहून आपली जबाबदारी किती आहे व या जबाबदारीतून आपण कसे मुक्त होऊ हे पुस्तकात शोधण्याचे काम आज शहरविकास विभागामार्फत चालू आहे. आम्ही आज मागणी करीत आहोत की,याबाबत चौकशी करायला पाहीजे.या चौकशीसाठी आपण अधिकारी नेमा,महापालिकेव्यतिरिक्त बाहेरचा कोणतातरी तज्ञ माणुस नेमा व याबाबतीत चौकशी व्हायला पाहिजे. विकासकामार्फत प्लॅटचे रेट कसे वाढविता येतील,जास्त एफएसआय व फायदा कसा घेता येईल याकडे ते लक्ष देतात.अधिकारीसुध्दा किती बाल्कनी काढली किंवा प्लॉअरबेट त्यांनी काढले व त्याचे त्यांनी बाल्कनीमध्ये रुपांतर केले याबाबतीतच लक्ष घालून त्यांचेबर ाेबर निगोसिएशन करण्याचे काम करतात.पण अवतीभवती त्या गृहसंकुलामध्ये बाकीच्या कामांबाबत कोणत्याही प्रकारे लक्ष घातले गेले नाही,किंवा जात आहे. आज ठाण्याच्या दुप्पटीने आज एमएमआरडीएच्या रेटींगप्रमाणे ६० टक्के नागरीकांची वाढ होत आहे.म्हणजे त्याच्यापेक्षा जास्त वाढ गृहसंकुल उभारण्याची,नविन नविन योजना या ठाणे शहराममध्ये व अशाप्रकारे हे शहरविकास विभाग प्लॅनिंगबरोबर नियंत्रण सुध्दा करण्याची त्यांची जबाबदारी आहे,त्याबाबतीत फक्त प्लॅनिंग व ॲथॉरिटीने प्लॅन सँशन करण्याची जबाबदारी पार पाडत आहेत,परंतू त्या गोष्टीचे नियंत्रण करण्याची जबाबदारी कोणत्याही प्रकारे पार पडत नसल्यावर ही दुर्घटना आणखी होऊ शकते हे गांभिर्य आज या सभागृहाकडे लक्ष वेधीत करायचे आहे.आज त्या गृहसंकुलात गेलो तर दोषींबाबत ते स्पष्टपणे फर्स्टहँड रिपोर्ट आम्हाला प्रशासनामार्फत या सभागृहापुढे प्रत्येक सदस्यांपुढे उपस्थित झाला पाहिजे की ही दुर्घटना घडली होती त्यावेळी आपली कांय जबाबदारी असायला हवी होती व आपण कोठे लक्ष घातलेले नाही. कारण त्या भिंतीवर खरोखर शहरविकास विभागाने फिलिंगची परवानगी दिली नसती तसेच तेव्हाच त्यांनी कारवाई केली असती तर आज ही दुर्घटना टळली असती. आपण कोणत्याही प्रकारे तिकडे लक्ष घातले नाही. आज त्या एका कुटुंबातील चार माणसे मृत्युमुखी पडले आहेत. एका घरातील एक आठ वर्षाच्या मुलाचे आईवडील त्यामध्ये मृत्युमुखी पडले,केवळ तो आठ वर्षाचा मुलगा व त्याची बहिण जिवंत आहे. अशावेळी आपल्याला कीव यायला पाहिजे की आपली जबाबदारी कोठेतरी कमी पडली व त्याचा भुर्दंड या लोकांना भोगावा लागला.आज आपण कोठेतरी कमी पडलो ते नियमावलीमध्ये नियंत्रण ठेवण्यासाठी. आज विकासकांनी आपल्यावतीने कांहीतरी रकमा जाहिर करतील,परंतू ही रक्कम देऊन त्या मुलाचे आईवडील पुन्हा मिळणार नाहीत.आज जो दु:खाचा डोंगर त्यांच्या कोसळला आहे तो त्याने धुवुन जाणार नाही. शहरविकास विभागाबाबत सुध्दा एक विशेष महासभा आयोजित करण्यांत आली पाहिजे.हा विभाग चौथ्या मजल्यावर असल्यामुळे ते पुर्णपणे हवेतच आहेत. ठाणे शहर हे ऐतिहासिक शहर आहे.प्रत्येक दोन ते पांच कि.मी.च्या अंतरावर जुनी मुळ गांवे आहेत,जुनी लोकवस्ती आहे,गावठाण परिसर आहे,आजूबाजुला मोकळया जागेवर जेथे पुर्वी शेती होती तेथे गृहसंकुल उभारणी होत असेल तेथे पुर्ण बेशिस्तपणे भराव केला जाईल आणि भरावामध्ये जुने राहणारे गोरगरीबांना व गावक-यांना तेथे त्रास होत असेल तर याची पुर्णपणे जबाबदारी या प्रशासनाने घेतली पाहिजे.या बेशिस्त कारभाराची जबाबदारी शहरविकास विभागाने घेतली पाहिजे. आज आपण पाहिले तर वॉटर टेबल मेंटेन केलेले नाही,आज कोणत्याही विकासकाला प्लिंथची हाईट वाढवायची, कोठल्या पध्दतीने भराव करायचा आहे,बाजुला नाला असो किंवा गावे असो,पुर्णपणे रिटेनिंग वॉल तयार करायचा ,भराव करायचा आपली कामे चालू करायची आणि विकुन पाच वर्षांत ठाणे शहर सोडून जायचे व नंतर कांय होईल त्याबाबत महापालिका बसली आहे तेथील लोकप्रतिनिधी बसले आहेत,त्यांचे कांही जात नाही.आज नाले हे पुर्णपणे विकासकांना पाठीशी

घालण्यासाठी वळविले गेले आहेत.ब-याचशा नाल्यांची कामे आपण पाहिली तर दगडाची जुनी जी भिंत होती ती तशीच आहे परंतू जेथे जेथे विटांची भिंतीच्यावर माती गेलेली होती ती डायरेक्ट लोकांच्या घरावर पडलेली आहे,अशावेळी आपला जो इन्सपेक्टर होता किंवा कार्यकारी अभियंता होता त्यांचेवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. महापौर महोदय, आज हा एवढा मोठा दुःखाचा प्रसंग आपल्या प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ठाणे शहराच्यासमोर आलेला आहे. तरी महापौर महोदय,याबाबतीत आपण ही सभा त्यांच्या दुखवटयासाठी आपण सभा तहकूब करावी ,अशी मी सूचना करीत आहे.

श्री.नारायण पवार :

महापौर महोदय,सन्मा.विरोधी पक्ष नेते श्री.नजिब मुल्ला यांनी मांडलेल्या सभा तहकुबीला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.परवा झालेली घटना ही दोस्ती ग्रुपच्या विकासकाने तेथे जुन्या तीस ते चाळीस वर्षापुर्वीच्या संरक्षक भिंतीच्यावर चौदा ते पंधरा फुट उंचीची संरक्षण भिंत बांधल्याकारणाने आणि त्यादिवशी भरपूर पाऊस पडत असल्याकारणाने त्याठिकाणी भराव टाकण्याचे काम चालू होते वभराव टाकण्याचे काम चालू असताना ती भिंत कोसळली गेली.आणि तेथे आठ माणसे मृत्युमुखी पडली.त्यापैकी एकाच कुटुंबातील चारजणांचा मृत्यु झालेला आहे.तसेच एकाच कुटुंबातील दोन जणांचा मृत्यु झालेला आहे.तसेच चार ते पांचजण हे जखमी असुन ते हॉस्पीटलमध्ये आहेत.त्यापैकी सनी विश्वनाथ ठाकूर हा कौशल्या हॉस्पीटलमध्ये उपचार घेत आहे,त्याला माहित नाही की त्याचे आईवडील कोठे आहेत ते,त्याचे आईवडील त्या दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेले आहेत. महापौर महोदय,ज्यावेळी आपण त्या विकासकाचे प्लान मंजूर केला,त्याने अनधिकृत भिंतीचे काम चालू केले होते,असे असताना महापालिकेने हात कां वर केले आहेत,त्याचेवर एमआरटीपीखाली गुन्हा कां दाखल केला गेला नाही? प्रथम त्या बिल्डरवर महापालिकेने एमआरटीपीखाली गुन्हा दाखल करावा.त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. आज त्या विकासकोच आर्कीटेक्ट आपल्याकडे येतात,परमिट घेतात,सी.सी.,प्लिंथ सर्टीफिकेट घेतात,व येथे फाईली मंजूर करुन घेण्याचे काम करतात,परंतू आपल्या शहरविकास अधिका-यांना तेथे जाण्याची आवश्यकता भासली नाही कां की कोठे काम चालू आहे,त्याठिकाणी नाला डायव्हर्ट करण्यांत आलेला आहे त्याची पाहणी कोणी केली नाही कां?आयुक्त साहेब आपण तेथे पाहणी क रावी त्याठिकाणी महापालिकेचा एसटीपी कॉलमचे त्या नाल्यामध्ये चालू आहेत.त्याची मंजूरी नसताना सुध्दा तेथे काम चालू करण्यांत आलेले आहे.तसेच त्या नाल्याच्या बाजुला २० ते २५ वर्षापुर्वीची झोपडपट्टी वसलेली आहे.त्यांची पर्यायी व्यवस्था म्हणून त्यांना बीएसयुपीमध्ये सामावून घ्या म्हणून प्रत्येकवेळी महासभेमध्ये सदस्य चर्चा करतात की त्यांना पर्यायी जागा दया नाहीतर कधीनाकधी होणार आहे हे माहित असतानासुध्दा बिल्डींगचे काम पुर्ण झाले तरीसुध्दा देण्यांत आले नाही आणि आता शिफ्टींगचे काम जोरात चालू आहे. ही दुर्घटना घडल्यानंतर महापालिका चार चार ट्रक,पाच पांच गाडया त्याठिकाणी जात आहे परंतू हे आधीच केले असते तर ही दुर्घटना घडली नसती परंतू प्रशासन हे का गप्प बसते,कशासाठी गप्प बसते,हे नक्की माहित नाही. या शहरामध्ये अनेक ठिकाणी भरावाचे काम चालू आहे.खाडीकिनारी मोठमोठे कंपाऊंडवॉलचे काम व त्यावर भरणी टाकायचे काम चालू आहे व याबाबतची माहिती शहरविकास विभागाला पुर्णपणे माहित आहे.आज नाले वळविले असल्यामुळे पावसाचे पाणी कसे जाणार यासाठी मार्ग ठेवण्यांत आलेला नाही, व अशामुळे ठाणे शहर बुडेल अशी परिस्थिती होईल,तरी आयुक्त महोदय आपण स्वतः या शहरामध्ये फिरा व कांय परिस्थिती आहे त्याची पाहणी करावी कारण अनेक घटना अशा होतील तरी त्या टाळण्यात याव्यात अशी आयुक्त महोदयांना विनंती करीत आहे. कधीकधी शहरविकास विभागाला कोर्टातून ऑर्डर येते,मग उत्तर

येते की कोर्टाच्या ऑर्डरप्रमाणे आम्ही काम बंद करु शकत नाही,असे असेल तर डीसीरुल हा पाण्यामध्ये बुडवून टाका.त्याप्रमाणे तुम्ही चालणार नसाल तर कोर्टाच्या निर्णयाप्रमाणेच चाला. तरी याची जबाबदारी जशी दोस्ती बिल्डरवर आहे तशी प्रशासनवर सुध्दा आहे. त्याला प्रशासन सुध्दा जबाबदार आहे,प्रशासनाने सुध्दा त्या दुर्घटनेमध्ये मृत झाले त्यांच्या कुटुंबियांना मदत केली पाहिजे. या शहरामध्ये अनेक ठिकाणी भरणीचे काम चालू असताना नाले डायव्हर्ट करण्यांत आलेले आहे, आम्ही चारशे ते पाचशे कोटी रुपये खर्च करुन आम्ही नाले बनविले आहेत परंतू त्या नाल्यांमधून पाणी जात नाही.आम्ही नऊ प्रभाग समितीचा दौरा केला अनेक नाल्यांच्या बाजुला झोपडपट्टी वसलेली आहे.कांही इमारतींची कामे आपल्या शहरविकास विभागतर्फे मंजूर करण्यांत आलेली आहेत.जेथे दहा दहा मजली इमारत उभी राहत आहे त्याचे जर अंतर पाहिले तर नाल्यापासून डीसी रुलच्या नियमाप्रमाणे नाल्यापासून किती फुट इमारतीचे प्लॅन मंजूर केले पाहिजेत,त्याचे पालन कोठेच करण्यांत आलेले नाही. कारण जे पाहिले ते फक्त दोन किंवा तीन मिटर अंतरावर नविन इमारतींचे बांधकाम चालू आहे.भविष्यात जर ती इमारत कोसळली तर मोठया प्रमाणात जिवितहानी होण्याची शक्यता आहे. तरी याबाबत आयुक्त महोदय आपण पाहणी दौरा करावा आणि येणारी पुढील घटना टाळावी. आज त्या दुर्घटनेमध्ये जे मृत झाले आहेत त्यांच्या कुटुंबियांना दुःख सावरण्यासाठी शक्ती देवो तसेच तसेच याबाबत दुखवटा ठराव करुन त्यांचेकडे पाठविण्यांत यावा,आणि ही सभा पुर्ण तहकूब करावी अशी मी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.जयहिंद.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय,बुधवारी पहाटे साडेचारच्या सुमारास ज्ञानेश्वर नगर येथील दोस्ती विहार संकुलाची सात फुटाची भिंत पडून त्यामध्ये आठ जणांचे प्राण गेले, त्या आठ जणांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहून मी ख-याअर्थाने विरोधी पक्ष नेता श्री.नजिब मुल्ला आणि नारायण पवार यांनी जी याठिकाणी सभा तहकूबी मांडलेली आहे,त्या सभा तहकूबीच्या माध्यमातून आपल्या या महापालिकेने भविष्यात अशा प्रकारचा घात पुन्हा आपल्या शहरामध्ये होऊ नये यासाठी सभा तहकूबीवर दोन शब्द बोलणार आहे.

महापौर महोदय,ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प आज कोटींच्या घरात गेल्यानंतर आपण अशा अपघातांना नेहमी नेहमी संधी कां देतो याचा थोडाफार अभ्यास आयुक्त महोदय याठिकाणी करणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे माझे मित्र विरोधी पक्षनेता श्री.नजिब मुल्ला याठिकाणी बोलले,या ठाणे शहरामध्ये अशाप्रकारचे अपघात होणे हे नविन नाही. कारण यापुर्वी महापालिका हद्दीतील अनेक इमारती ठाणे पडल्या आहेत. अनेक लोकं मृत्युमुखी पडलेले आहे परंतू प्रशासन नाही तर याठिकाणी असलेले सर्व प्रतिनिधी या सर्वांचीच जबाबदारी आहे की,आपल्याला माहित आहे की,महाराष्ट्रामध्ये ठाण्यामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडतो आणि हा पाऊस प्रत्येकवेळी जीवघेणा पाऊस म्हणून याठिकाणी एक उदाहरण सोडून जातो. साईराज इमारतीतील अनेक लोकांचा मृत्यु आज देखिल आपण विसरलेलो नाही आहोत. आणि मग त्यामध्ये अशाप्रकारची भिंत पडून आठ जणांचा त्यामध्ये मृत्यु झालेला आहे,त्यातून महापालिका कोठेतरी विचार करणार आहे किंवा नाही.यावेळी हया पावसाची ही एक झलक होती ,अशाप्रकारे लहानशा सरीमध्ये अशाप्रकारचा एक घात जर होत असेल तर या सभागृहामध्ये अभ्यासू नगरसेवक अशाप्रकारची चर्चा पावसाळयापुर्वी करीत असतात. मग त्यामध्ये नाले सफाईची चर्चा केली जाते,मग त्यासंदर्भामध्ये धोकादायक इमारतींना त्वरीत रिकामी करुन त्याठिकाणी निर्णय घेण्याबाबत याठिकाणी चर्चा केली जाते. आपण देखिल अभ्यासू महापौर आहात आपण देखिल सदस्य असताना याबाबत चर्चा करुन प्रशासनाच्या

निदर्शनास आणुन दिलेल्या आहेत.आपण हे सर्व करीत असताना आपण पुन्हा महापालिका षंड म्हणून लोकांसमोर दर्शवितो,या चिंतेचे कारण अदयाप मला समजलेले नाही. आपण पहाता की,या ठाणे महापालिकेमध्ये ज्याप्रमाणे नेहमीच पावसाळा येणारा आहे आणि मग नेहमीच याठिकाणी सदस्य बोलणार परंतू याचा अर्थ नेहमीच माणसे मरावीत,आणि आपण त्याबाबतीत कोणतीच काळजी याठिकाणी करणार नसाल तर ते चुकीचे होईल. नाल्यासंदर्भात साफसफाईच्या माध्यमातून आज किती साफसफाई झालेली आहे ?महापौर महोदय आपण स्वत: दौरा केला,विरोधी पक्षनेते यांनी स्वत:नाल्यामध्ये उतरुन पाहणी केली,किती नाल्यावर अनधिकृत बांधकामे आहेत,आयएनडीपीच्या माध्यमातून किती नाले पुर्ण झालेले आहेत याचा याठिकाणी अभ्यास झाला आहे कां? अदयाप मुसळधार पाऊस या ठाणे शहरात पडला नाही. २६ जुलैची आठवण झाली तर अशाप्रकारचा पाऊस जर पडला तर ठाणे शहरामध्ये अशा किती घटना घडतील याचा अंदाज आपण कधी वर्तविला आहे का,त्यावर कधी अभ्यास केला आहे कां? प्रभागनिहाय याठिकाणी संबंधित अधिकारी यांनी प्रशासनातील मोठया अधिका-यांना त्याची माहिती दिली आहे कां की अमुक अमुक नाल्याच्या बाजुला इमारत आहे ती धोकादायक इमारत आहे,ती पडणार आहे. आयुक्त महोदय, मी गेले वीस वर्ष याठिकाणी नगरसेवक आहे. धोकादायक इमारती दाखवायच्या असतील तर प्रथेप्रमाणे संगणक चालू करायचा एंटरचे बटन दाबायचे की २०वर्षापुर्वीची यादी बाहेर येते आणि तीच यादी पेपरमध्ये लावायची व सांगायचे की या इमारती धोकादायक आहेत.फक्त एवढाच धंदा ठाणे महापालिकेचा राहिला आहे कां?कांही कांही प्रभाग समितीच्या अधिका-यांना सुध्दा माहित नाही की,कांही इमारती तुटून बरखास्त झाल्या आहेत व त्यांची नावे पुन्हा पुन्हा त्या भागामध्ये येत असतात.फक्त कंप्युटरचे बटन दाबून पुर्वीचा २५ वर्षापुर्वीचा रेकार्ड फक्त दाखवायचा. त्या इमारती पुन्हा दुरस्त झाल्या आहेत कां,ती तोडली गेली आहे कां,त्यांना नोटीस बजाविल्यानंतर कांय निर्णय घेणार आहोत,याबाबतीतील कोठलाही अभ्यास आपल्या प्रशासनाच्या माध्यमातून होत नाही. ज्ञानेश्वर नगर येथील झोपडपट्टी नाल्यात होती त्यांना कोणत्या नोटीसा संबंधित अधिका-यांनी दिल्या होत्या कां?त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणता संकल्प दिला होता कां?अशाप्रकारचा कोणताही अभ्यास याठिकाणी केला गेला नाही.डोंगराळ भागामध्ये बाजुला खाडीकिनारा,समुद्रकिनारा असलेल्या या ठाणे शहरामध्ये मुसळधार पाऊस हा पडणारच,व तो पडत असताना दुर्घटना होणार नाहीत आणि दुर्घटनेवर प्रबंध घालायचा असेल तर याठिकाणी प्रभागनिहाय ख-याअर्थाने ए.सी.चेंबर सोडून त्या प्रभागात फिरुन तशाप्रकारचा संपूर्ण अभ्यास करुन त्यावर निर्णय घेणे फार गरजेचे आहे. फक्त नाले सफाई झाली का हे पाहण्यापेक्षा त्या नाल्यात होणारी जी गटारे आहेत,ज्यांना आम्ही गटारे साफ करण्यासाठी वेतन देतो,त्याठिकाणी असणारा निरिक्षक हा ती गटारे साफ करुन घेत आहे कां,यासंबंधी प्रत्येक नगरसेवक आपल्या प्रभागाबाबत बोलत असतात की माझ्याा भागातील गटारे साफ केली जात नाही,आणि मग अशावेळेला एखादया ठिकाणी पाणी तुंबून कोणाचा तरी मृत्यु होऊन तो वाहून गेल्याचे सुध्दा उदाहरण या ठाणे महापालिकेमध्ये आहे. आणि म्हणून आपण दिलेली ही श्रध्दांजली वरच्यावर नसावी तर ख-याअर्थाने पुढे येणा-या महिन्याभराच्या पावसाळयाला आपण कसे तोंड देणार आहोत.समुद्राला जर भरती आली तर ते पाणी शिरल्यानंतर त्या प्रवाहाला आपण कसे सामोरे जाणार आहोत .धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत आपण कांय निर्णय घेणार आहोत. ज्या नाल्यावर ख-याअर्थाने झोपडया वसलेल्या आहेत किंवा धोकादायक स्ट्रक्चर आहे त्याबाबत कांय निर्णय घेणार आहोत. आयएनडीपीच्या माध्यमातून जे नाले बांधण्याचे प्रयोजन आहे त्याला पुर्णत्वास आणण्यासाठी आपण

कांय निर्णय घेणार आहात कारण आयुक्त महोदय मी आपल्याला सांगू इच्छितो की,यासभागृहाच्या माध्यमातून एकही सदस्य असा नाही की,डेव्हलपमेंटच्या माध्यमातून प्रशासनाला हातभार लावण्यासाठी मागे राहिलेला आहे.मग या सभागृहामध्ये आयएनडीपीच्या माध्यमातून जे मेजर स्केल दिलेले आहेत,अमुक अमुक मेजरचा नाला झाला पाहिजे.त्याठिकाणी असलेली अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी देखिल हे सभागृह प्रशासनाच्या पाठीमागे आहे. मग प्रशासनच कां अशाप्रकारची वागणुक करते हा एक संशयाचा भाग आहे आणि म्हणून प्रभागनिहाय जे अधिकारी नेमले आहेत त्यांच्यावर ही जबाबदारी ज्याबाबत मला शंका आहे की ती जबाबदारी ते पुर्णपणे घेत नाहीत. तरी त्यांना ती जबाबदारी घेणे फार गरजेचे आहे. याठिकाणी अनेक मुद्दे निर्माण झालेले आहेत. आज ज्याठिकाणी ही दुर्घटना घडली आहे तेथील सर्व्हेअरने हे कधी पाहिले आहे कां,एखादया बिल्डरचा प्लॅन आपण मंजूर केल्यानंतर आपली चौथ्या मजल्यावरील जबाबदारी संपली अशाप्रकारचा मानस कांही अधिका-यांचा आहे,त्यांना जाणिव करुन दिली पाहिजे की,फक्त चेंबरमध्ये त्याबाबत सही करुन त्याचा प्लॅन मंजूर केल्यानंतर आपली जबाबदारी संपत नसून त्याठिकाणी त्या साईटवर कोणत्या भिंती चाललेल्या आहेत त्या भिंती योग्य आहे का किंवा ती इमारत योग्य चालली आहे कां, त्याची क्वॉलिटी कशी आहे,त्याठिकाणी आपले नागरीक रहायला येणार आहेत,तरी याबाबतचा अभ्यास झाला पाहिजे,याची जाणिव त्या अधिका-याला दिली पाहिजे.यानुषंगाने नाल्यावरचे डायव्हर्शन.  आज या सभागृहामध्य वर्षभरामध्ये सर्व नगरसेवक आपापल्या भागातील नाला कशापध्दतीने डायव्हर्ट करण्याचा प्रयत्न प्रत्येक बिल्डरने कशापध्दतीने केला आहे त्यासंदर्भामध्ये चर्चा केलेली असेल. आयुक्त साहेब आपण जर घोडबंदर साईडला गेलात तर याठिकाणी खाडी बुजविण्याचे काम मोठया प्रमाणांत चालू आहे. खारपुटीचे झाडे तोडून त्याठिकाणी प्रस्ताव टाकण्यांत आलेला आहे. त्याठिकाणी पाईपलाईनवरुन धोकादायक ब्रिज देऊन संकुलाला प्रवेश देण्याचा प्रयत्न चालत आहे,तरी याबाबतीत आपण महापालिकेचे ऑफीसेस सोडून रस्त्यावर येऊन कामाला लागले पाहिजे,ज्याप्रमाणे महापौर महोदय आपण नाल्याबाबत स्वत: सर्व्हे करुन पाहणी केली त्याप्रमाणे अधिका-यांना सुध्दा बरोबर घेऊन जाणे फार गरजेचे आहे. फक्त एक नाला पाहून नाले सफाई होत असेल असे आपल्याला वाटत असेल तर ते चुकीचे आहे.ख-याअर्थाने डोंगराळ भागातून आलेला जो प्रवाह आहे  आणि त्या प्रवाहाला येणारे अडथळे आहेत,कांही ठिकाणी गाळे बांधले आहेत कांही ठिकाणी कदाचित झोपडया असतील,त्यांचे विस्थापन करुन तो नाला क्लिअर करणे फार गरजेचे आहे.कांही इमारती या  ख-याअर्थाने अनधिकृत आढळत आहे त्यांची यादी जाहिर करा असे यापुर्वीच  माझे मित्र श्री.नारायण पवार व श्री.नरेश म्हस्के यांनी सांगितले होते परंतू ती यादी अदयाप या सभागृहाला दिली गेली नाही,आणि म्हणून या जीवघेण्या पावसाची पूढची कहानी ही घटनात्मक नसावी,पावसामध्ये माणसाला आनंद मिळविता आला पाहिजे,अशाप्रकारचाअसा पुढील पावसाळा हा आनंददायी पावसाळा आपण कसा घेऊ याचा प्रयत्न आपण याठिकाणी करणे फार गरजेचे आहे.

महापौर महोदय, यासंदर्भात संबंधित ठेकेदारावर कांय कारवाई केली, याबाबतचा अहवाल या सभा तहकूबीच्या माध्यमातून आमची चर्चा संपल्यानंतर प्रशासनाकडून मला अपेक्षित आहे आणि आयुक्त महोदय,ख-याअर्थाने आपत्कालीन कक्षासंदर्भामध्ये फक्त पुस्तिका नगरसेवकांपर्यंत पोहचून चालणार नाही. मुंबई महापालिकेमध्ये आपण होता.माझे बरेच मित्र मुंबई महापालिकेत नगरसेवक आहेत.त्याठिकाणी अगोदरच महापालिका एक सभा घेऊन स्पेशली आपत्कालीन सेवा म्हणजे कांय व याबाबत कोणाशी संपर्क साधायचा यासंदर्भात माहिती दिली जाते.  कारण येणारा पावसाळा फार मोठा पावसाळा आहे. आज प्रत्येक

नगरसेवकांना पुस्तके मिळाली नाहीत.माझ्या प्रभागामध्ये एखादे झाड जर पडले तर मी कोणाशी संपर्क करु तसेच एखादी इमारत कोसळली तर कोणाशी संपर्क करु तसेच त्यांची राहण्याची व्यवस्था कोठे करु,याबाबतीतला अभ्यास आज आमच्याकडे शुन्य आहे. ज्याप्रमाणे महापौर महोदय,एक महासभा महिन्याभराने तुमच्यासमोर येतो त्याप्रमाणे आपत्कालीन सेवा म्हणून त्याठिकाणी चांगली सभा आणि त्या सभेचे आयोजन ज्या संबंधित अधिका-याला त्याची जबाबदारी कळली पाहिजे.याठिकाणी शनिवार,रविवार मिळाला म्हणून आपण पावसाळयांत कोठेतरी जाऊन पावसाचा आनंद घ्यायचा आणि एखादी दुर्घटना घडली की त्यादिवशी फक्त सभागृह नेते,विरोधी पक्षनेते आणि बाकी सदस्य असायचे,अधिका-यांचा त्याठिकाणी पत्ता नाही,अशाप्रकारचे चित्र दिसता कामा नये. आणि म्हणून यासंदर्भामध्ये सर्वसामान्य नागरीकांना देखिल आज मेसेजच्या माध्यमातून कांही दूरध्वनीचे क्रमांक, तसेच जबाबदार अधिका-यांची नावे त्यांना कळली पाहिजे. अधिका-यांना मेसेज गेले पाहिजेत की अमुक अमुक ठिकाणी कांही झाले तर आपत्कालीन सेवेचे अमुक अधिका-यांनी या नंबरवर संपर्क साधावा.व अशाप्रकारचे मेसेजेस कांही महापालिकेकडून आयोजत केले आहेत परंतू आपल्याकडून त्यांची कोणतीही दक्षता घेतली गेली नाही ,त्यामुळे येणारा पावसाळा हा साधासुधा पावसाळा नाही. एका साध्या पावसाने आठ बळी घेतले,येणारा पावसाळा किती बळी घेईल,याची एक मानसिकता जरी आपण केली तर आपल्यापुढे फार मोठे संकट येणार आहे,याची दक्षता आपल्याला याठिकाणी घेतली गेली पाहिजे. कारण धोकादायक इमारतीची जी यादी तयार करण्यांत आलेली आहे,ती यादी आपण आयुक्त महोदय आपण पडताळून पाहीली तर नविन यादी व ॲडीशनल यादी ज्याचा अंतर्भावच या कँप्युटर यादीमध्ये नाही. मुंब्रा कौसा भागामध्ये तसेच किसननगर रायलादेवी भागामध्ये अशा अनेक इमारती आहेत व त्याबाबत निर्णय घेणे गरजेचे आहे.त्याठिकाणी जर पाणी भरले तर ती इमारत पडणार अशा परिस्थितीमध्ये त्या इमारती आज उभ्या आहेत. म्हणून त्याठिकाणी आजच संबंधित ठिकाणी जाऊन त्याबाबत निर्णय घेणे फार गरजेचे आहे. महापौर महोदय, या सभागृहामध्य आज सुध्दा बरेच सदस्य बोलणार आहेत.परंतू मला जी भिती आहे त्या भितीबद्दल मी आपल्याकडे वाच्यता केली,कारण शेवटी प्रत्येक नगरसेवकाचे एक कर्तव्य असते की,ज्या ज्याठिकाणी जी जी दुर्घटना होते त्यावेळेला माझे असे मत आहे की,प्रशासन दोन पावले मागे असते त्या नगरसेवकाला संबंधित पदाधिक-याला त्या नागरीकाची व्यवस्था करावी लागते,त्या नागरीकांची हॉस्पीटलमध्ये सेवा करावी लागते,त्यांना त्यांचे जीवन स्थिरस्थावर होईपर्यत त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागते, या सर्व गोष्टीची जबाबदारी जर ठाणे महापालिकेने घेतली नाही तर पूढील काळामध्ये आपल्याला याबाबत विचार करणे गरजेचे आहे. आणि म्हणून मी माझा मित्र विरोधी पक्षनेता व गटनेता यांनी याठिकाणी जी सभा तहकूबी मांडलेली आहे,ती सभा तहकूबी आपण मंजूर करावी आणि ही सभा तहकूब करुन प्रशासन आणि प्रतिनिधी यांनी देखिल याची तत्परता ओळखून या तहकूबीला अनुमोदन देतो.धन्यवाद जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.मिलिंद पाटणकर :

महापौर महोदय, पावसाळयाची सुरुवात एखादया दु:खद घटनेने व्हावी ,पावसाचा आनंद पेपरमधून साजरा केला जात होता की,पाऊस आला व वेळेवर आला चांगल्याप्रकारे सुरुवात झाली, पाणीकपात जी आहे ती संपते की काय अशाप्रकारच्या बातम्या पेपरमधून यायला लागल्या परंतू ,ठाणे शहरावर मात्र एक दु:खद घटनेचा एक आघात त्यादिवशी पहाटे साडेचार वाजता,ज्ञानेश्वरनगर येथे जेथे वर्तकनगर प्रभाग समितीचे आपले ऑफीस आहे त्याच्यापासून दोनशे मीटर अंतरावर ही एक घटना घडली आणि ती सहा फुटी वरची भिंत आहे ती बाजुच्या झोपडयांवर कोसळुन आठ जण मृत्युमुखी पडले आणि सहा

जण गंभीररित्या जखमी झाले आहेत आणि त्यातील एकजण कौशल्या हॉस्पीटलमध्ये अजूनही आयसीयुमध्ये आहे, आणि बाकीचे पाच जाण सामान्य वॉर्डात आहेत. परंतू या एका घटनेकडे न पाहता,की हा एक अपघात आहे आणि त्यामुळे आठ जण मृत्युमुखी पडले आहेत त्यांना आपण दिलासा कसा देऊ शकतो किंवा त्यांच्यावर फक्त उपचार कसे करु शकतो एवढयापुरत्या या घटनेकडे न बघता ,आपण जर ही घटना घडली का?कशामुळे अशाप्रकारच्या घटना घडतात,याकडे ठाणे महापालिका प्रशासन म्हणून आणि ठाणे महापालिका म्हणून आपण पाहिले तर आपल्याला त्याचे गंभीर स्वरुप जास्त चांगल्यारितीने लक्षांत येईल. मुळात ती जी भिंत बांधली गेली आधी नाल्याची जुनी भिंत होती ती चार फुट होती ,युसीआर दगडाने बांधलेली होती ती अजूनही तशीच आहे त्या भिंतीला कांही झालेले नाही. ती भिंत तशीच आहे परंतू त्याच्यावर बांधलेली जी पाच ते सहा फुट भिंत होती ती पुर्णपणे बाजुच्या झोपडयांवर कोसळले,त्या झोपडया तेथे गेल्या पंधरा वर्षापासुन आहेत. तेथे जी भरणी करण्यात आली ती भरणी तेथे खरोखर आवश्यक होती किंवा नाही ,आणि ती भरणी करायची आहे तर ती कशाप्रकारे करायला पाहिजे हे पाहिले गेले नाही आणि त्यामुळे हा जो दोष जातो तो महापालिकेने परवानगी कशाप्रकारे दिली याच्याबरोबरच तिथल्या बिल्डरच्या सुपरव्हिजनवर तेथील बिल्डरच्या आरसीसी कंसलटंट,आर्कीटेक्ट आणि तेथे काम करणा-या त्यांच्या साईट सुपरवायझरवरसुध्दा जाते आणि त्यामुळे या सगळयांनाच त्याबाबत गुन्हेगार म्हणून ठरविले गेले पाहिजे आणि तसा रिपोर्ट शहरविकास विभागाने आणि आपल्या बांधकाम विभागाने तसा रिपोर्ट आयुक्तांकडे सादर केला गेला असल्यास या रिपोर्टमध्ये हे पॉईंट आहेत किंवा नाही.या दुर्घटनेच्या अनुषंगाने अनेक मुद्दे ठाणे महापालिकेच्या एकंदर कामकाजावर आणि ठाणे महापालिकेत ज्याप्रकारे विकास प्रस्ताव मंजूर केले जातात त्या एकंदर कारभारावर आपण प्रकाश टाकू शकतो. तुम्ही जर त्या जागेची प्रत्यक्ष पाहणी केली तर त्यातील दोन मुद्दे प्रामुख्याने लक्षांत येतात की नाल्याच्या बाजुला इमारतीसाठी म्हणून आपल्याला नियम आहेत की नाल्याची रुंदी आणि इमारतीची हाईट याप्रमाणे जो नाल्यापासुनचे अंतर इमारतीसाठीचे ते सोडले गेले पाहिजे मग ते सहा मीटर,बारा मीटर अशी त्याची जी नियमावली आहे त्याप्रमाणे बिल्डींगचे अंतर बरोबर आहे परंतू हा नियम शहरविकास विभाग मात्र सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन किंवा पोडियमला लावताना दिसला नाही,पोडीयमचा कॉलम चार फुट अंतरावर आहे आणि साहजिक आहे जेव्हा पोडियमचे फुटींग केले गेले तेव्हा ती भिंत साहजिकपणे कमकुवत झालेली आहे कारण ती नाल्याच्या बाजुची भिंत होती. वर जे वाढीव भिंतीचे बांधकाम केलेले आहे ते नुसते आपण लहान मुले पत्त्याची इमारत उभी करतात तशाप्रकारे ती भिंत बांधकाम केले गेलेले आहे त्याला कुठेही खालच्या भिंतीशी बाँडींग नाही,खालच्या युसीआर भिंतीचे प्लॅस्टींग कोठेही त्याला पिचिंग न करता त्यावर नुसती वीट ठेऊन बाजुला प्लॅस्टरींग केलेले आहे, त्यामुळे मुळातच ही भिंत अतिशय कमकुवत स्वरुपाची आहे आणि एवढया मोठया स्वरुपात पाऊस पडल्यानंतर ती भिंत पडणे अतिशय साहजिक असे होते,आणि याकडे कोणीही लक्ष दिलेले नाही.त्या बांधकाम व्यावसायिकाने तसेच विकासकानेसुध्दा दिले नाही आणि आपल्या खात्यातर्फे सुध्दा लक्ष दिले गेले नाही. खरे म्हणजे विकास प्रस्तावाला मंजुरी देताना आपल्या नाले विभागातर्फे आणि ड्रेनेज विभागातर्फे विकासकाने स्ट्रॉम वॉटर प्लॅन सबमिट करणे जरुरीचे आहे,वगैरे वगैरे अटी घातल्या जातात.आणि आपला नाले बांधणी विकास सरसकट त्याला एनओसी देत असतो.या पर्टीक्युलर भागात एवढा मोठा नाला असताना तो नाला जवळजवळ १० ते १२ मिटर रुंदी आहे व एवढया मोठया रुंदीच्या नाल्यावर भिंत न बांधता किंवा भिंत ही प्लिंथच्याआधी बांधावी किंवा पुर्ण करावी अशी अट न घालता आपल्या आयएनडीपी विभागाने सुध्दा परमिशन कशी दिली आणि शहरविकास विभागाने सुध्दा ही अट कां घातली नाही हे एक

मोठे प्रश्नचिन्ह आहे याकडे आयुक्त महोदय,आपण अतिशय गांभिर्याने पाहिले पाहिजे. अशा कित्येक ठिकाणी आपल्या नाले बांधणी विभागाने सरसकट एनओसी दिलेल्या आहेत. आणि कुठेही नाल्याची भिंत बांधली न जाता सगळया विकास प्रस्तावाचे काम चालू आहे,ही अतिशय गंभीर बाब कोणाच्याही लक्षांत येत नाही. आता मृत्युमुखी पडले आहेत म्हणून परंतू जो खाडीकिनारीजवळचा भाग आहे तेथे अशाचप्रकारे नाले न बांधल्यामुळे लोकांच्या घरात पाणी जाऊन त्यांचे अतोनात नुकसान होत आहे व त्यांना जो मन:स्ताप होतो ही माणसे चार महिने अक्षरक्ष: तेथे मेल्यासारखीच रहात असतात,इतके त्यांचे दर पावसाळयात नुकसान होते परंतू याकडे कोणताही आपला नाले बांधणीचा कार्यकारी अभियंता किंवा इतर लक्ष देत नाही,ते तसेच वर्षानुवर्षे चालू आहे.त्या अटींकडे कोणी बघत नाही की प्लिंथपुर्वी त्या विकासकाला नाले बांधणी करायला सांगितली आहे. सध्या आपण आयएनडीपी प्रोजेक्ट मोठया प्रमाणावर राबवितो,एवढी मोठी बाजुला तेवीस मजली इमारत उभी राहत असताना त्या नाल्याची भिंत मात्र आरसीसी कंस्ट्रक्शन त्याचे केले गेले नाही,त्याला तशीच मुभा दिली गेली,त्याला तसेच प्लिंथ सर्टीफिकेट दिले गेले,हे कसे झाले याची चौकशी अहवाल सादर होणे व तो या महासभेसमोर येणे खरे म्हणजे अपेक्षित होते.दोन दिवसांत टेक्निकल रिपोर्ट देऊ शकत नसाल आणि तो महासभेसमोर एवढया मोठया गंभीर घटनेचा सादर करु शकत नसाल तर मग प्रशासन नेमके कांय करते?महापौर महोदय, या दोन दिवसांत त्यांनी हा रिपोर्ट सादर करणे अतिशय आवश्यक होते, रिपोर्ट सादर केला गेला नाही या चार्जनुसार सुध्दा आपण सभा तहकूब करायला हरकत नाही,एवढा हा गंभीर विषय आहे.आणि हे कां केले गेले नाही? त्या नाल्यात हया झोपडया गेल्या पंधरा वर्षापासुन आहेत त्यांचे प्रोजेक्ट अफेक्टेड पिपलखाली त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे,हे समाजविकास खाते आपले बीएसयुपी खात्यातर्फे जी घरे बीएसयुपी योजनेत आपल्याला मिळालेली आहेत त्या अधिका-यांना हे सगळे माहित आहे. त्या इमारतीचे एवढे स्लॅब तयार होईपर्यंत म्हणजे गेले दिडवर्ष जवळजवळ तेथे काम चालू असले पाहिजे.कोणालाही असे वाटले नाही की नाल्यात ही लोकं विस्थापित आहेत त्याचे पुनर्वसन योग्यठिकाणी केले गेले पाहिजे. आपण बीएसयुपी योजनेत जी घरे मिळाली ती या लोकांना दिली गेली पाहिजेत हे कोणाच्या लक्षांतच आले नाही की,जाणिवपुर्वक लक्ष दिले गेले नाही, हा खरा त्या रिपोर्टचा महत्वाचा भाग आहे. त्यामुळे हे जे मुद्दे आहेत त्याकडे आपण गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे. ठाणे महापालिकेतील प्रत्येकविभाग शहरविकास विभाग,ड्रेनेज विभाग,नाले बांधणी,आयएनडीपी प्रोजेक्टचा विभाग,समाजविकास विभाग हया सगळया विभागांचे कामकाज कशाप्रकारे चालते की कोणीतरी हलविल्याशिवाय कोणीतरी त्यांना धरुन त्यांच्या कानात ओरडल्याशिवाय हे विभाग कोठे कांही लक्षच देणार नाहीत. आपणहुन कांही काम करणारच नाहीत, अशी जर काम करण्याची पध्दत असेल तर मग असे हे अपघात होतच राहणार. आणि त्यामुळे आपला हा जो तांत्रिक अहवाल येणार आहे तो आजच्या महासभेपुढे मांडून आपण ही सभा तहकूब करावी,जेणेकरुन या महासभेला कळेल की, नक्की यामागची कारणे, प्रशासन खरी कारणं सभागृहासमोर आणत आहेत किंवा नाही आणि त्यानुसार मग आणखी आपले विचार मांडणे खरे म्हणजे सोपे गेले असते आणि म्हणून महापौर महोदय मी आपल्याला विनंती करीत आहे की,कांही महत्वाच्या सदस्यांची बोलणी झाल्यानंतर तुम्ही हा तांत्रिक अहवाल जो दिला गेलेला आहे,दिला गेला नसेल तरी या प्रत्येक डिपार्टमेंटच्या अधिका-यांनी येथे येऊन हे सांगितले पाहिजे की,अशा स्टेप्स यापुर्वीच ज्या घ्यायला पाहिजे होत्या त्या कां घेतल्या गेल्या नाहीत,आणि हे सांगितल्यानंतरच आपण निर्णय घेऊन ही सभा तहकूब करावी अशी मी विनंती करतो.

महापौर महोदय, या दुर्घटनेमध्ये जे मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या आत्म्यांना ईश्वरचरणी शांती लाभो आणि जे कुटुंबिय वाचलेले आहेत त्यांना हे सहन करण्याची परमेश्वर आणखी शक्ती देवो हिच मी प्रार्थना करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

श्री.जनार्दन खेतले :

महापौर महोदय, ज्ञानेश्वरनगर येथे जी दुर्घटना घडली ती अत्यंत वाईट आहे. याबाबत चौकशी करावे असे सन्मा.जेष्ठ सन्मा.सदस्य श्री.पाटणकर साहेबांनी सांगितले. तरी पुन्हा त्यावर बोलणे उचित होणार नाही. परंतू या अशा घटना घडल्यानंतर त्या ठेकेदारावर तसेच संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा आपण दाखल केला म्हणजे आपली जबाबदारी संपते कां? हा मोठा प्रश्न आहे. याअगोदर २६ जुलैला मुंब्रा येथे ॲटलांटीका कंपनीतर्फे रस्त्याचे काम चालू असताना महापुर आला, त्यांनी टाकलेला भराव पुर्णपणे खाली वस्तीवर आला आणि अनेक लोकांचे प्राण गेले, त्यावेळी सुध्दा त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला ,त्याचे पुढे कांय झाले? आज २०१० चालू आहे,आज पांच वर्ष झाली तरी आजसुध्दा तेथे दगड कोसळत आहेत,तरी यावर आपण कांही कारवाई करणार आहात किंवा नाही? सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला की आपले काम संपले? आपण या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कांय उपाययोजना करणार आहोत, याबाबत आपण कधी विचार करतो आहोत कां? आज मुंब्रा येथे गेलात तर नाल्यालगत तसेच नाला बुजवुन सुध्दा अनेक इमारती उभ्या राहत आहेत.तेथे महापालिका लक्ष देत आहे कां,आपण तेथे वाट पाहत आहोत कां,की तेथे इमारत खचावी तेथे इमारत पडावी १०० लोकांचा जीव गेल्यानंतर आपण जागे व्हावे, असे आपल्या अधिका-यांचे म्हणणे आहे कां?आपण या गोष्टींकडे लक्षच देत नाही,या गोष्टी घडतात कां,यावर आपण कसा आळा आणु शकतो ? या घडू नयेत म्हणून आपण कांय उपाययोजना करु शकतो, याचा आपण कधी विचारच करत नाही.घटना घडण्याची वाट पाहतो, घटना घडली की, मग सगळे खडबडून जागा होतात,दोन दिवस पेपरमध्ये बातमी येणार, चर्चा होणार, सभा तहकूबी झाली,श्रध्दांजली वाहिली की विषय संपला, असे किती दिवस चालणार आहे? महापौर महोदय,आपल्याला विनंती आहे, मी जास्त बोलणार नाही परंतू यापुढे असे घडू नये यासाठी कांहीतरी उपाययोजना करावी आणि प्रशासनाने याबाबत गंभीर दखल घ्यावी, ही विनंती. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.जयहिंद जयमहाराष्ट्र.

सुधीर भगत :

महापौर महोदय,सन्मा.विरोधी पक्षनेता श्री.नजिब मुल्ला यांनी जी तहकुबी मांडली ती परवा दुपारी ज्ञानेश्वरनगर भागामध्ये दोस्ती ग्रुप या विकासकाने त्याठिकाणी असलेल्या नाल्याच्या कडेला वॉल कंपाऊंडवर पाच ते सहा वॉल कंपाऊंड अनधिकृत बांधून ती वॉल कंपाऊंड नाल्यालगत असलेल्या झोपडपट्टीवर पडून तेथील आठ नागरीक मृत्युमुखी पडले त्याबद्दल प्रथम मी याठिकाणी दु:ख व्यक्त करतो. जी भिंत सदर विकासकाने बांधली होती त्याठिकाणी पुर्वी बिर्ला कंपनीची जुनी भिंत होती व तिची उंची आठ फुट पर्यंत होती. ती भिंत बांधताना शहरविकासची परवानगी घेण्यांत आली होती कां?परवानगी घेतली असल्यास कोणत्या तारखेला ती परवानगी घेण्यांत आली होती?महापालिकेने त्या विकासकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे,गुन्हा दाखल केल्यानंतर सदर विकासक हा मुंबईमध्ये ऐषआरामामध्ये फिरत आहे,कोणत्या पोलिसस्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला,यापुर्वी चार वर्षात ठाणे शहरामध्ये तीन घटना घडलेल्या आहे. आत्ताच आमचे जेष्ठ नगरसेवक श्री.जनार्दन खेतले यांनी मुंब्रामधील घटना सांगितली. दोन वर्षापुर्वी वागळे इस्टेट परिसरामध्ये आशर बिल्डर या विकासकाचा स्लॅब पडून त्याठिकाणी अठरा माणसे

मृत्युमुखी पडली होती त्यावेळी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा त्या विकासकावर दाखल केला होता का?आता पेपरमध्ये दोस्ती ग्रुप या विकासकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला अशी जाहिरात झळकली परंतू जे विकासक हे ठाणे शहरामध्ये विकास करीत असताना त्याठिकाणी ज्या दुर्घटना घडत आहे त्यामध्ये मनुष्यहानी होत आहे,जोपर्यंत या विकासकामधील एकाला सजा किंवा बेडया ठोकल्या जात नाहीत तोपर्यंत या घटना ठाणे शहरात घडतच राहणार आहेत. त्यामुळे आपल्याला विनंती आहे की,जो दोस्ती ग्रुपवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे आणि जर सभागृहाला आणि प्रशासनाला याबद्दल दु:ख व्यक्त करायचे असेल तर या विकासकावर गुन्हा दाखल केल्यानंतर तो विकासक आत्ता कोणत्या ठिकाणी आहे मुंबईमध्ये की ठाण्यामध्ये की कोठे बाहेर फिरत आहे जोपर्यंत याला बेडया ठोकत नाही तोपर्यंत या आठ मृत्युमुखी पडलेल्या ज्या व्यक्ती आहेत त्यांना शांती लाभणार नाही अशी मी आपल्याला विनंती करतो,आणि सदर विकासकावर लवकरांत लवकर कारवाई करावी,अशी याठिकाणी सभागृहाला विनंती करतो.

श्री.दशरथ पालांडे :

महापौर महोदय,दि.१६.६.२०१० रोजी माझ्या प्रभागामध्ये जी दु:खद घटना घडली त्याबद्दल विरोधी पक्षनेते यांनी सभा तहकूबी सूचना मांडली.या सभा तहकूबीवर बरीचशी चर्चा चालू असताना या घडलेल्या घटनेबद्दल याठिकाणी बोलणे गरजेचे आहे. ही घटना सकाळी साडेचार वाजता घडली असताना माझ्या बाजुच्या प्रभागातील नगरसेवक श्री.संतोष वडवले,सभागृह नेते आणि आपल्या फायरब्रिगेडच्या जवानांनी तांतडीने धाव घेऊन तेथे कांही लोकं जी भिंतीखाली गाडली गेली होती त्यांना बाहेर काढण्यासाठी जे अथक प्रयत्न केले,कांहीजण त्यामध्ये वाचले होते त्यांना हॉस्पीटलमध्ये पोहचविण्यासाठी मी सुध्दा त्यांचेबरोबर होतो व त्यानंतर महापालिकेचे बांधकाम विभागाचे कांही अधिकारी तांतडीने त्याठिकाणी पोहचले त्याबद्दल प्रथम मी महापौर आपले आणि प्रशासन म्हणून आयुक्त साहेब आपले धन्यवाद मानतो. माझ्या नागरीकांतर्फे आपण जे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो,विशेषत: सभागृह नेते श्री.पांडुरंग पाटील व श्री.वडवले यांनी तत्परतेने जी कार्यवाही केली त्याबद्दल त्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो.

या घटनेबद्दल सभागृहामध्ये चर्चा चालू आहे. घटना कशी घडली,कां घडली. याठिकाणी श्री.नारायण पवार यांनी सांगितले की,नाला वळविण्यांत आला होता, तरी त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा नाला डायव्हर्ट झालेला नाही.कारण नाला आणि ती भिंत यामध्ये जवळजवळ २५ ते ३० फुटाचे अंतर आहे. वस्तुस्थिती पाहील्यानंतर वस्तुस्थितीप्रमाणे आपण बोललो पाहिजे. मी जवळजवळ त्याठिकाणी ३० वर्ष त्या परिसरामध्ये रहात आहे आणि याठिकाणची जी झोपडपट्टी होती त्यामध्ये ५० कुटुंबं ही गेल्या २२ वर्षापासुन तेथे रहात आहे. परिस्थिती अशी आहे की,ज्या विकासकाने डेव्हलपमेंट करायला घेतले त्यावेळी कंपनीची जी पुर्वीची भिंत होती त्या भिंतीच्या बाजुला ही झोपडपट्टी व त्यानंतर २५ फुटावर हा नाला आहे. आयएनडीपीमध्ये जे प्रोजेक्ट चालू आहे आणि या घटनेशी कांही संबंध नाही,असे माझे वैयक्तिक मत आहे. वस्तुस्थितीची पाहणी केल्यानंतर आपल्या लक्षांत येईल. त्याठिकाणी जी भिंत कोसळली त्याची चौकशी शहरविकास विभागामार्फत करणारच आहोत,विकासकावर कारवाई करा,आपण पोलिस स्टेशनला त्याबाबत तक्रार दाखल केली आहे,याबाबत बरीच चर्चा झाली आहे व त्या चर्चेबाबत मी बोलणार नाही,याबाबत जी कारवाई होईल आणि खरी परिस्थिती बाहेर पडेल. परंतू आज जे नागरीक त्याठिकाणी रहात आहेत ते आज रस्त्यावर आहेत. सन्मा.पाटणकर साहेब तेथील नागरीकांच्या पुनर्वसनेबाबत बोलले मी त्यांना याबाबत धन्यवाद देईन की,आपण याबाबत आवाज उठविलात,परंतू महापौर महोदय,आपण या दोन

दिवसापासून त्यांच्या पुनर्वसनाबाबत बोलत आहोत याबद्दल सन्मा.जिल्हाप्रमुख श्री.एकनाथ शिंदे साहेब,महापौर महोदय आपण आयुक्त दालनामध्ये एक मिटींग झाली आणि मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे त्याठिकाणी असलेल्या ४६ कुटुंबाचे पुनर्वसन करावे,आयुक्त साहेब आपण त्याबाबत तत्वत: मान्यता दिली आणि कोणत्याप्रकारे पुनर्वसन झाले पाहिजे,याबाबत आपण कांही दोन भाग केले व त्याप्रमाणे एका भागामध्ये २५ कुटुंब साकेत याठिकाणी हलविणार आहोत व एका भागामध्ये १९ कुटुंबं ही ट्रान्झिस्ट कँप तुळशीधाम येथे हलविणार आहोत,व याप्रमाणे आम्ही त्या नागरीकांना एक दिलासा दिला की,महापौर साहेब व आयुक्त साहेब यांनी निर्णय घेऊन आपले व्यवस्थित पुनर्वसन केले जाईल,आपल्या याठिकाणच्या झोपडया हटविणे गरजेचे आहे,त्यामुळे एकतर नाला रुंद होईल आणि ज्या झोपडपट्टयातील नागरीक हा जो हादसा झालेला आहे त्यामुळे हादरले आहेत त्यांचे त्याठिकाणी राहणे योग्य नाही,हे आपणसुध्दा पाहिल्यानंतर आपल्या लक्षांत आले असेल. आम्ही सुध्दा आपणाला विनंती केली,त्यांनी आपल्याला कबुली दिली परंतू काल जी कांही घटना घडली त्यानंतर असे कळले की,त्यातील फक्त १९ कुटुंब आपण साकेत येथे हलविणार आहोत व बाकीचे कुटुंबे तिकडे राहणार आहे. आज ते नागरीक गेले २२ वर्ष त्याठिकाणी रहात आहेत याबाबचे पुरावे माझ्याकडे आहेत,आपणाकडे आहेत,सगळयांकडे आहेत. आज या पात्र व अपात्र घोटाळयामुळे ते नागरीक तेथेच राहत आहेत आज संध्याकाळी जर पाऊस पडला व उदया कांही दुर्घटना घडली तर यास जबाबदार कोण? आपण सकाळी १६ तारखेच्या दुपारपर्यंत आपण चांगले काम केले ,त्यांना चांगले सहकार्य केले,परंतु पुनर्वसन आल्यानंतर प्रशासनाची जी चालढकल चालत आहे ते महापौर महोदय योग्य नाही. आयुक्त साहेब आपण या ठाण्यामध्ये आलात,ठाण्याची व मुंबईची परिस्थिती वेगळी आहे,आपण या सगळया गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे. नागरीकांचे पुनर्वसन झालेले नाही,नागरीक अजून हटले नाहीत. आज सुध्दा ते नागरीक सभागृह नेते किंवा महापौरांच्या चेंबरमध्ये बसले आहेत. आणि ही नैतिक जबाबदारी ज्याप्रमाणे प्रशासनाची आहे त्याप्रमाणे आमचीसुध्दा पडते.स्थानिक नगरसेवकांना त्याठिकाणी शिव्या खाव्या लागतात. आत्ताच एका सदस्यांनी सांगितले की यामध्ये दोषी प्रशासनाबरोबर स्थानिक नगरसेवक असतो. स्थानिक नागरीक हे नगरसेवकाने आमच्यासाठी कांय केले म्हणून नगरसेवकाला दोष देतात. आज दिवसभर आम्ही त्यांच्यासाठी राहण्याची व जेवणाची सोय केली आहे,परंतू हे ते सर्व विसरुन जातात कारण त्यांचे जर पुनर्वसन झाले नाही व ती जर रस्त्यावर आली तर तेवढीच जबाबदारी आपली आहे तेवढीच आमचीसुध्दा आहे.आज तेथील आजुबाजूच्या नागरीकांना दिलासा देणे गरजेचे आहे,आणि त्याबद्दल सभा तहकूबी मांडली या दु:खद घटनेमध्ये मी सुध्दा सहभागी आहे.आपण सर्वांनी माझ्या प्रभागातील नागरीकांकरीता जे कांही केले त्याबद्दल मी धन्यवाद मानतो परंतू या नागरीकांचे पुनर्वसन होणे,त्यांची चांगल्याठिकाणी राहण्याची व्यवस्था करणे, एवढी प्रशासनाची जबाबदारी आहे. महापौर महोदय,याबाबत आपण तांतडीने निर्णय घ्यावा, आज ते नागरीक खाली आपली वाट पहात आहेत,तरी त्यांना निर्णय दयावा एवढीच माझी विनंती आहे. तसेच या घटनेमध्ये जे मृत्युमुखी पडले,त्याबाबत मी व श्री.वडवले यांनी पत्रसुध्दा दिले आहे. तरी या घटनेमध्ये जे मृत्युमुखी पडले, त्यांना श्रध्दांजली वाहून मी माझे दोन शब्द संपवितो.जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.उमेश पाटील :

महापौर महोदय,ज्ञानेश्वरनगरमध्ये भिंत कोसळुन जी दुर्घटना घडली व त्यामध्ये आठ जणांचा मृत्यु झाला आहे.अशाप्रकारच्या घटना हया प्रत्येक पावसाळयामध्ये होत असतात. महापौर महोदय,आपल्या एकुण ९ प्रभाग समित्या आहेत, या नऊ प्रभाग समित्यांमध्ये नाले गटारे व त्याच्या बाजुला

झोपडपट्टया आहेत,या सर्व प्रभागांचा आपण सर्व्हे करुन त्याबाबत आत्ताच जर आपण दक्षता घेतली तर अशाप्रकारच्या घटना यापुढे होणार नाहीत. आपल्या नऊ प्रभाग समितीतील कार्यकारी अभियंता तसेव शहरविकास विभागाचे अधिकारी असतील त्यांनी याबाबत दक्षता घेतली पाहिजे. दोस्ती बिल्डरने ती भिंत बांधताना त्याबाबत दक्षता घेतली नाही.त्याने तेथे बाजुला असलेल्या झोपडपट्टीमध्ये रहिवाशी राहतात याचा त्याने विचार केला नाही. तरी याबाबत माझे एकच म्हणणे आहे की यांना श्रध्दांजली देऊन हा प्रश्न सुटणार आहे कां?आपले अधिकारी सक्षम काम करणार आहेत किंवा नाही? अशी दुर्घटना घडली की आपण सभागृहात तहकूबी घेतो श्रध्दांजली वाहतो,परंतू सभागृहाबाहेर आपण त्याबाबत दक्षता घेणार आहेत किंवा नाही? परवा जो पाऊस पडला त्यामध्ये माझ्या विभागातील दोनशे झाडे पडली,आपत्कालीन विभागाला फोन केला असता एकही अधिकारी फोन उचलत नाही,ही वस्तुस्थिती आहे,त्यानंतर फायरब्रिगेडला फोन करुन सांगितले त्यानंतर दुस-या दिवशी फायरब्रिगेडच्या कर्मचा-यांनी ती झाडे काढली.सर्वांची कामे झाली पाहिजेत अशी सन्मा.सदस्यांच्या भावना आहेत.आयुक्त साहेब आपण आयुक्त म्हणून या ठाणे महापालिकेमध्ये आला आहात तरी आपण या सर्व नऊ प्रभाग समितींचा सर्व्हे करा व ज्याठिकाणी नाले व गटारे असतील त्याच्या बाजुला जे रहिवाशी रहात असतील त्यांना कोठे स्थलांतरीत करण्यांत यावे हे पहावे. महापौर महोदय, या दुर्घटनेमध्ये ज्या आठ जणांचा मृत्यु झालेला आहे त्यांच्या कुटुंबियांना ईश्वर शक्ती देवो एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

श्री.देवराम भोईर :

महापौर महोदय,सन्मा.विरोधी पक्षनेते श्री.नजिब मुल्ला व कॉंग्रेसचे गटनेते श्री.नारायण पवार यांनी परवा ज्ञानेश्वरनगर मध्ये जी दुर्घटना झाली त्याबाबत सभा तहकूबी मांडली आहे त्यास पाठींबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. महापौर महोदय, मला या सभागृहामध्ये २५ वर्ष झाली आहेत. या २५ वर्षाच्या कालखंडामध्ये वर्षाचे १२ महिनेपैकी नऊ महिने असेच निघून जातात आणि पावसाळा आल्यानंतर अशाप्रकारच्या इमारती पडल्यानंतर लक्षवेधी सूचना व सभा तहकूबी या सभागृहात येत असतात. ज्याठिकाणी ही भिंत बांधली गेली,ज्या बिल्डरने ही जागा विकसित करण्यासाठी घेतली होती,त्यावेळी ही कंपनीची भिंत किती फुटावर होती आणि सदरची भिंत ही ज्यावेळेस कंपनी चालू होती त्यावेळेस त्यांच्यादृष्टीकोनातून ती भिंत योग्य होती,ज्यावेळी दोस्ती ग्रुपने ही जागा विकसित करण्यासाठी घेतली ज्यावेळी त्या विकासकाने ती जागा पोडीयम खोदण्याकरीता घेतली त्या पोडीयममधील जी माती काढली गेली ती माती उचलण्याची रॉयल्टी काढली आहे किंवा नाही,याची चौकशी आपण करायला पाहिजे.त्यांनी त्याबाबतची रॉयल्टी घेतली नसेल तर आपण त्याबाबत काय कारवाई करणार आहात,याचा सुध्दा सभागृहाने खुलासा करावा. वास्तविक पाहता त्याठिकाणी त्यांनी जुन्या भिंतीवर त्यांनी नविन भिंत बांधली त्यावेळेस त्या भिंतीची उंची किती असली पाहिजे याची सुध्दा शहरविकास अधिका-यांनी मोजमाप करणे आवश्यक होते. महापालिकेमध्य ज्यावेळेस प्लॅन सबमिट करतात त्यावेळी त्यांचा प्लॅन मंजूर करत असताना ज्यापध्दतीने आपण त्यांना आपण प्लिंथची परवानगी देतो त्यावेळी अटी शर्ती असतात एखादया बिल्डरने एखादी इमारत बांधण्यास घेतली तर आपल्या असिस्टंट कमिशानमार्फत त्याठिकाणची पाहणी केली जात असते. आज या ठाणे शहरामध्ये हजारो इमारत बांधल्या गेल्या,शहरविकास विभागामार्फत त्यांना परवानगी दिली जाते परंतू त्यानंतर त्याठिकाणी पुन्हा पाहणी करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी जात नाहीत,आणि मग अशाप्रकारच्या दुर्घटना होतात व त्यामध्ये निष्पाप माणसे मेली जातात. ठाणे शहर हे भूकंपाच्या तिस-या झोनमध्ये आहे तरी याबाबत महापालिकेने जागरुक राहिले पाहिजे,केव्हाही कोणालाही परवानगी देत

रहायचे अशी जर परिस्थिती होत असेल तर माझ्या मते जेवढी त्या बिल्डरने चुकी केली नाही तेवढी चूक ही महापालिकेच्या शहरविकास विभागाकडून झालेली आहे,असे बोलल्यास ते चुकीचे होणार नाही.आज ठाणे शहर डेव्हलप होत असताना खाडीकिनारी जो भाग आहे मग त्याठिकाणी लोढा बिल्डर असेल रुस्तम बिल्डर असेल किंवा दोस्ती समुहाचा बिल्डर असेल आज एकुण स्थिती पाहता खाडीचा सोर्स पुर्णपणे बंद करण्याचा हयांनी प्रयत्न केलेला आहे. लोढाच्या जागेतून जो मूळ नाला जातो तो नाला ५० ते ६० फुटाचा आहे त्या नाल्यातून येऊर येथील पाणी जात असते,व तो नाला वळविण्याचा प्रयत्न केला होता ,परंतू आम्ही जागरुकता दाखवून तो नाला डायव्हर्ट करुन दिला नाही.डीपीअंतर्गत जे नाले बांधण्याचे कार्यक्रम होता त्याअंतर्गत कित्येक नाल्यांचा सोर्स बदलण्यात गेला आहे.त्यामुळे ज्या नाल्याचे मुळ पाणी येत होते ते नाले बंद केले असल्यामुळे नविन नाल्यामध्ये पाणी जात नाही व ते पाणी थांबल्यामुळे तेथील वस्तीला हा धोका होत असतो. मी मध्यंतरी या सभागृहात बोललो होतो की,दादलानी पार्कच्या मागे जी पीडब्ल्युडीची राज्य शासनाची जागा आहे तेथे मूळ खाडीचे नाले आहेत ते नाले आपल्याच एका कामगाराने तो नाला पुर्णपणे बुजविला व तेथे चाळी बांधण्यात आल्या,त्याठिकाणी गोडाऊन्स बांधले गेले परंतू त्याबाबत आमचा कोणताच अधिकारी त्याची पाहणी करण्याकरीता गेले नाही. वारंवार याबाबत तक्रार करुनसुध्दा कांहीच उपयोग झाला नाही, उलट आमचेच अधिकारी त्याठिकाणी त्या लोकांना सांगतात की तुमच्याबाबत अशा प्रकारची तक्रार करण्यांत आलेली आहे. आम्ही याबाबत तक्रार करीत असताना ज्यापध्दतीने अधिका-यांनी लक्ष दयायला पाहिजे त्याप्रमाणात ते अधिकारी लक्ष देत नाहीत,व यामुळेच अशाप्रकारच्या दुर्घटना होतात व त्यामध्ये निष्पाप माणसे मेली जातात व त्यांचा आम्ही याठिकाणी दुखवटा ठराव करतो व त्यांना श्रध्दांजली वाहतो. आयुक्त महोदय, आज ज्या नाल्यामुळे ही भिंत कोसळली आहे, तरी ज्यांनी ज्यांनी नाले बुजविले आहेत,व तेथे घरे बांधली आहेत त्यांच्यावरसुध्दा कारवाई होणे आवश्यक आहे कारण त्यांच्यामुळे अशाप्रकारच्या घटना होत असतात. आयुक्त महोदय,माझ्या प्रभागामध्ये दहा फुटाची खाडी बुजवून तेथे मातीची भरणी करण्यांत आलेली आहे,समुद्राकडे जाण्याचा पाण्याचा जो सोर्स आहे तो आता आमच्या गावामध्ये जाऊ शकतो. व हा प्रकार संबंधित अधिकारी यांना सांगण्याचा प्रयत्न केला असता मग ते शहरविकास विभाग असुदे किंवा बांधकाम विभाग असुदे कोणीही याबाबतची दखल घेत नाही. तरी हा प्रकार कोठेतरी थांबला पाहिजे. प्लॅन मंजूर करीत असताना जेवढी जबाबदारी बिल्डरची आहे तेवढीच जबाबदारी महापालिकेच्या शहरविकास विभागाची सुध्दा आहे, कारण आपण जे नॉर्म्स देतो त्याप्रमाणे ते काम करीत आहेत किंवा नाही ही जबाबदारी या खात्यांची आहे, तरी या सगळया गोष्टी थांबवायच्या असतील तर आपल्याला या सगळया गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. परवा झालेल्या दुर्घटनेमध्ये एकुण आठ माणसे मेली आहेत,उदया तुमच्या आमच्या दुलर्क्षपणामुळे हजारो माणसे मरतील आणि तसे होऊ नये म्हणून आपण याबाबत दखल घेणे आवश्यक आहे. या दुर्घटनेमध्ये जे मृत झाले आहेत त्यांना मी माझ्या वतीने श्रध्दांजली वाहतो. धन्यवाद.

श्री.संजय मोरे :

महापौर महोदय,सन्मा.विरोधी पक्षनेता श्री.नजिब मुल्ला यांनी जी सभा तहकूबी मांडलेली आहे,त्यास मी अनुमोदन देण्याकरीता उभा आहे. महापौर महोदय,असे अनेक प्रकार या ठाणे शहराने पाहिले.आणि त्याप्रमाणे आपली जी प्रोसिजर असते त्याप्रमाणे आपण या सभागृहात तहकूबी मांडतो, श्रध्दांजली वाहतो आणि पुन्हा ये रे माझ्या मागल्या. महापौर महोदय, हा जो प्रसंग घडला,भिंत कोसळली त्या विकासकाने भिंत बांधली ती कोसळून माणसे मेली परंतू या आधी आपण सर्व मंडळीने ठाणे शहरामध्ये

भविष्यामध्ये घडणा-या घटना आहेत कारण आजची जी परिस्थिती ठाणे शहराची आहे ती एका बाजुला डोंगर व दुस-या बाजुला खाडी आणि येणारा पाऊस आणि त्या पावसाचे पाणी जाण्यासाठी असणारे जे नैसर्गिक नाले त्याची रुंदी आणि सगळयाचा विचार करुन आपण नाल्याचे रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे व कामे चालू झालेली आहेत व त्यालगत असलेली जी कांही वस्ती व वस्तीतील जी काही माणसे आहेत त्यांना कोठेतरी पुनर्वसन करण्याबाबत आपण बीएसयुपीच्या अंतर्गत प्रोजेक्ट तयार केले आहेत. याबाबत मला विचारावेसे वाटते की,प्रशासनाने कोठल्यातरी एका कुटुंबाचे पुनर्वसन केले आहे कां?तर नाही,मग नुसते आम्ही सभागृहामध्ये चर्चा करायची,प्रस्ताव मंजूर करायचा परंतू त्याची अंमलबजावणी ही होत नाही. आणि त्यामुळे या घटना घडतात,त्याबाबत कोणीतरी निमित्त असतो.परंतू याला सगळी सिस्टीम जबाबदार आहे,हा महत्वाचा विषय आहे. महापौर महोदय,ज्यावेळेस नाले बांधले गेले व त्याच्याबाजुला जी काही वस्ती होती त्याचा सर्व्हे झालेला आहे अशी माझी माहिती आहे.आणि ती सविस्तर माहिती समाजकल्याण अधिकारी यांचेकडे गेलेली आहे,परंतू त्यांनी याबाबत पुढील जी काही प्रोसिजर करायला पाहिजे त्याचे रिपोर्टींग करुन ज्या खात्याकडे बीएसयुपीचे प्रोजेक्टची घरे आहेत त्यांच्याकडे रिपोर्ट पाठविला आहे कां?घटना घडली की आपण धावतो.मगाशी सन्मा.मनोज शिंदे यांनी धोकादायक इमारतींबाबत सांगितले,साईराजची घटना घडली त्यामध्ये २५ माणसे मेली,त्याबाबत सुध्दा कांहीच झाले नाही तेवढयापुरता आपण धावतो परंतू पुढे कांही नाही. आज ही मोठी घटना घडली याबाबत आपण तहकूबी मांडणार,एक दोन तास तहकुब करु,त्याच्यापुढे काय?याबाबत जे कोऑर्डीनेशन पाहिजे आहे की जी कांही योजना आपण आंखली तसेच जे जे फॅक्टर आहेत त्या फॅक्टरने काम केले पाहिजे त्या सिस्टीमने काम व्हायला पाहिजे ते होत नाही. एखादया अधिका-याच्या आडमुठेपणामुळे पुर्ण ती सिस्टिम बंद पडते.मग जो कोणी तो अधिकारी आहे ज्याच्यामुळे हे थांबलेले आहे,जर हया नागरीकांचे पुनर्वसन झाले असते,आणि मग ही भिंत कोसळली असती तर ही दुर्घटना टळली असती. निमित्त झालेले आहे माणसे मेली.मग याला जो खरा जबाबदार आहे त्याच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. एखादी सिस्टीम जर कार्यक्षम नसेल त्यांच्याकडे पुरेशी यंत्रणा नसेल तर ती पुरेशी यंत्रणा देण्याची ज्याची जबाबदारी आहे तो सुध्दा जबाबदार आहे तरी याचा विचार करणे गरजेचे आहे. यापुर्वी अनेक घटना घडल्या त्या यापुढे होऊ नयेत आणि पुन्हा अशाप्रकारची तहकूबी मांडण्याची आपल्यावर वेळ येऊ नये,यासाठी महापौर महोदय,आयुक्त साहेब आपण कार्यक्षम व क्विक डिसिजन घेणारे आहात. योजना,प्रस्ताव या अनेक गोष्टी डोक्यात असतात परंतू त्यांची अंमलबजावणी होणे व त्याबाबत तात्काळ निर्णय घेणे हा सर्वात महत्वाचा फॅक्टर असतो. मा.आयुक्त साहेब आपल्याकडून आमची अपेक्षा आहे की,याबाबत आधीच्या आयुक्तांनी ,तसेच या सभागृहाने ज्या कांही योजना आखलेल्या आहेत त्याच्याबाबतचा निर्णय कारण एकदा आज आम्ही म्हटले की ही घटना घडली त्याबाबत निर्णय घेतलेला आहे तर याबाबत जो कांही निकष असतो तो विषय सोडून त्यावर झटकन निर्णय व्हावा व त्याची लगेल अंमलबजावणी झाली तर यापुढच्या घटना घडणार नाहीत. आयुक्त साहेब तुम्ही आदेश दया की जे कांही नाल्यालगतची वस्ती आहे त्याचा सर्व्हे झाला असेल तर त्यांना त्याप्रमाणे पुनर्वसन होण्याची तसेच बीएसयुपीचे जे कोणी आपले अधिकारी यांचेकडे ताब्यात असलेली घरे आहेत ती ताबडतोब देण्यासाठी कार्यवाही करावी म्हणजे पूढची जी कांही नाल्यांबाबत ओरड होते. कांही ठिकाणी नाल्यांच्या ठिकाणी जी कांही भरणी चालली आहे रुस्तमजीने ती भरणी केलेली आहे, नाशिकला जो रोड जातो तो नाला तुंबलेला आहे,पुर्ण ओव्हरफ्लो होत आहे,त्यामुळे तेथील लोकांच्या घरामध्ये पाणी जाणार आहे,परंतू याचा कोणी विचार करीत नाही.या नाल्यालगतच्या असणा-या झोपडयांमुळे पूढे ज्या कांही घटना

घडणार असतील तर त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा आणि त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. महापौर महोदय,या मृत लोकांना खरी जर श्रध्दांजली दयायची असेल तर यापुढे होणा-या घटना टाळणे हीच खरी श्रध्दांजली असेल,असे माझे मत आहे. तरी मृतात्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबियांवर जे कांही संकट कोसळलेले आहे त्यातून त्यांना सावरण्याची ताकद देवो,अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन माझे दोन शब्द संपवितो.जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.संतोष वडवले :

महापौर महोदय,बुधवारी पहाटे चार वाजता जी घटना घडली ती संत ज्ञानेश्वरनगर येथील ही घटना आहे, सकाळी चार वाजता ही घटना घडली आणि चार वाजून दहा मिनिटांनी मला फोन आला की अशी दुर्घटना घडलेली आहे, त्याठिकाणी मी पोहचल्यानंतर पाहिले असता तेथील परिस्थिती ही अतिशय भयानक अशी होती . ही परिस्थिती मी पाहिल्यानंतर महापौर साहेब,उपमहापौर व सभागृह नेते या सर्वांना फोन केले, तांतडीने सर्व तेथे हजर झाले,आणि फायर ब्रिगेडला फोन करुन त्यांची यंत्रणा सुध्दा हजर झाली . दु:ख एवढयाच गोष्टीचे वाटते की,आपत्कालीन यांना फोन केला परंतू तेथील मुख्यालयातील जो फोन आहे तो कोणीही उचलला नाही. माझ्या माहितीप्रमाणे तेथे आपत्कालीन कक्षाचे जे प्रमुख नेमले आहेत ते उल्हासनगर येथे राहतात अशी माझी माहिती आहे. आपल्या अग्निशमन दलातील जवानांनी तेथे जाऊन ताबडतोब कामाला सुरुवात करुन आठ मृतदेह बाहेर काढले,परंतू आपत्कालीन सेवेतील कोणीही कर्मचारी तेथे पोहचले नाहीत. या दुर्घटनेमध्ये जे जखमी झाले होते त्यांना मा.महापौर साहेबांनी ताबडतोबीने कौशल्या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले. आज तेथील रहिवाशी बेघर झालेले आहेत तरी त्यांचे पुनर्वसन झाले पाहिजे. आयुक्त महोदय यांचेकडे याबाबत मिटींग झाली व त्या मिटींगमध्ये असे ठरले की,२५ पात्र व २१ अपात्र आणि नंतर सांगण्यात आले की,१९ पात्र आहेत म्हणून.तेथील जो सर्व्हे करण्यांत आला त्यामध्ये फक्त इलेक्ट्रिक बिलेच दाखविण्यात आलेली आहेत,परंतू आम्ही जेव्हा त्यांचे प्रुफ चेक केले तेव्हा त्यांच्याकडे ८४ -८५ सालाच्या टॅक्स आकारण्यात आलेल्या पावत्या आहेत. आणि आपल्या सर्व्हेमध्ये फक्त इलेक्ट्रिकची बिले दाखविण्यांत आलेली आहेत. तरी ही बिले ग्राहय धरण्यात येऊ नये कारण पुर्वी तेथे असे होते की,एकाकडे मिटर होते आणि त्या एका इलेक्ट्रिक मिटरवर बाकीच्या सगळयांनी लाईट घेतली होती, आज त्यांच्याकडे फोटोपास,इलेक्शन कार्डसुध्दा आहेत. या विषयावर बरेच सन्मा.सदस्यांनी चर्चा केलेली आहे त्यामुळे मी जास्त वेळ घेत नाही,माझी एकच मागणी आहे की,हयांचे पुनर्वसन हे झालेच पाहिजे. तसेच आपत्कालीन नियंत्रण कक्षाची चांगल्याप्रकारे सुधारणा झाली पाहिजे,एवढी मागणी करतो,जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.शैलेश शिंदे :

महापौर महोदय, दि.१६ रोजी वर्तकनगर प्रभाग समितीमध्ये दोस्ती समुहातर्फे विकासकाने नाल्याची सात फुट उंच भिंत होती त्यावर १४ फुटापर्यंत बांधकाम केले आणि त्यावर मातीचा भराव टाकला आणि त्याचा दाब येऊन ती भिंत कोसळुन आठ जण मृत्युमुखी पडले,त्याबाबत मा.विरोधी पक्षनेते व सन्मा.नारायण पवार यांनी जी सभा तहकूबी मांडलेली आहे त्यास पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.

महापौर महोदय, फार दु:खाची गोष्ट आहे की आजपर्यंत प्रत्येक पावसाळा जर आपण पाहिला असेल तर या महापालिकेचा एक इतिहास आहे की प्रत्येक पावसाळयामध्ये ठाणे महापालिकेची कांहीतरी हानी होते. तीन वर्षापुर्वी माझ्या वॉर्डामध्ये नाल्याची भिंत खचून इमारत पडली होती, अशाप्रकारच्या ब-याचशा घडनांना आपण तोंड देत आहोत.परंतू यामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा होत

नाही. किसननगर सारख्या अनधिकृत भागामध्ये एखादी अनधिकृत इमारत पडणे आणि तेथे अशाप्रकारची घटना होणे ही गोष्ट वेगळी आहे परंतू दोस्ती समुह ज्याला महापालिकेने परवानगी दिलेली आहे. नाल्याला परवानगी दिलेली आहे किंवा नाही याबाबत शहरविकास विभागाचा अभिप्राय आल्यावरच कळेल.जर हा अभिप्राय आला असता तर याठिकाणी आम्हाला व प्रशासनाला एक भूमिका घेता आली असती व याबाबत कारवाईची मागणी करुन यामध्ये जे मृत्युमुखी झाले त्या कुटुंबाना न्याय देता आला असता.ही अधिकृत इमारत ज्या दोस्ती समुहातर्फे चालली आहे,त्याचा जर आपण अभ्यास केला तर ही भिंत आणि त्या भिंतीच्या बाजुच्या झोपडया या बीएसयुपीतर्फे या झोपडया हलविल्या गेल्या पाहिजे होत्या. हया नाल्याचे आपण आयएनडीपीमध्ध्ये काम केले आहे जेव्हा बीएसयुपीची आपण मंजुरी दिली तेव्हा मंजुरी देताना आपण म्हटले आहे की,बीएसयुपीमध्ये जेवढे कांही नाल्यामध्ये जी घरे बाधित होतील त्या बाधित लोकांना आपण बीएसयुपीमध्ये घरे देण्यांत येतील,परंतू आयएनडीपीच्या नाल्याचे काम होऊनही तेथील लोकांना यामध्येसमाविष्ट केले नाही असे असेल तर ही योजना आपण कोणासाठी राबवितो,हा महत्वाचा प्रश्न आहे. महापौर महोदय, किसननगरसारख्या भागामध्ये इमारतीमध्ये व नाल्याचे अंतर हे दिडफुट एवढेच आहे व अशीच घटना जर या भागामध्ये घडली तर त्याठिकाणी आपण कोणती योजना राबविणार आहात?आणि आपली याबाबत कांय भूमिका असणार आहे याबाबत आपण याठिकाणी विचार केला पाहिजे.जेणेकरुन अशा प्रकारच्या घडना यापुढे घडणार नाहीत. मगाशी सन्मा.सदस्य सुधीर बर्गे यांचा याचबाबत प्रश्न होता की,तरी शहरविकास विभागाचा अशाप्रकारे कारभार चालला असेल आणि शहरविकास विभागाने यास परवानगी दिली असेल तर अशा अधिका-यांवर चौकशी कां होऊ नये?जर शहरविकास विभागाने या बांधकामाला प्लिंथची परवानगी दिलेले असेल त्यावेळी आपल्या अधिका-याचे त्याठिकाणी लक्ष गेले नाही कां?मग जेव्हा अशाप्रकारचे अपघात होतात त्यावेळी आपण म्हणतो की तो चोर आहे,त्याच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याने जर अनधिकृत बांधकाम केले असेल तर तो गुन्हेगार आहे,आणि त्याच्यावर गुन्हा हा दाखल केलाच पाहिजे.परंतू त्याचबरोबर त्या अधिका-याची चुकी असेल तर त्या अधिका-यावर आपण कां नाही गुन्हा दाखल करावा?हा माझा प्रश्न आहे. कोठेतरी हया अधिका-यांना आपण लगाम दिला पाहिजे. आज नागरीकांचे असे म्हणणे असते की,नगरसेवक नाले डायव्हर्ट करतात,अशाप्रकारचे आरोप आमच्यावर होतात आणि जे चांगले अधिकारी आहेत त्यांचेवर होतात. महापौर महोदय, तसेच आयुक्त महोदय मी आपल्याला विनंती करेन की,सदर बाबतीत एक चौकशी समिती नेमण्यांत यावी,व त्या समितीचे अध्यक्ष मा.महापौर व आपण रहाल,आणि त्याबाबतचा पुर्ण अहवाल हा सभागृहासमोर लेखी अहवाल आला पाहिजे आणि हा अहवाल आल्यानंतर त्यांचेवर कांय चौकशी करणार याची भूमिका या सभागृहात आपल्या होणा-या भाषणामध्ये आपण सांगावे. आज त्या दुर्घटनेमध्ये जे आठजण मृत्युमुखी पडले आहेत व जे जखमी झाले आहेत त्यांना या सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहिली गेली पाहिजे आणि याबाबत विरोधी पक्षनेते श्री.नजिब मुल्ला यांनी जी सभा तहकूबी मांडलेली आहे, तरी सदरची सभा पुर्णपणे तहकूब करावी अशी मी आपल्याकडे मागणी करतो . धन्यवाद जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री.शैलेश सावंत :

महापौर महोदय, दोन दिवसापुर्वी ज्ञानेश्वरनगर येथे जी दुर्घटना घडली त्यासंदर्भात सन्मा.विरोधी पक्षनेते श्री.नजिब मुल्ला आणि आमचे गटनेते सन्मा.नारायण पवार यांनी सभा तहकूबीची सूचना मांडली. खरोखरच या गंभीर विषयासंदर्भात कांही बोलायचे म्हटले तर जे गांभिर्य आपल्याला

असायला पाहिजे,हया पावसाळा सिझनमध्ये ज्या दुर्घटना घडत असतात ज्याप्रमाणे आमचे सन्मा.मनोज शिंदे म्हणाले की ही गटारे साफ न झाल्यामुळे मोठया प्रमाणात पाणी तुंबते.तसेच कांही मोठी गटारे असतात त्यामध्ये छोटी मुले वाहून जाण्याची शक्यता प्रत्येक ठिकाणी जाणवते. तरी याबाबत गांभिर्याने लक्ष दिले गेले पाहिजे. आता लक्षवेधीच्या माध्यमातून नाले किंवा गटारे यासंदर्भात चर्चा होणार आहे तरी त्याबाबत मी कांही आता बोलू इच्छित नाही.तरी मी एवढे सांगू शकतो की,मुळात आज या ठाणे शहरामध्ये परवा जी दुर्घटना झालेली आहे तेथे हे दिसून येते की,१४ फुटाचे बांधकाम असलेली भिंत कोसळली,अर्थात विटाची भिंत बांधताना एक नऊ इंची बांधकाम असेल तर त्याची उंची कांय असावी,यालासुध्दा ताळतंत्र असणे गरजेचे आहे.ते कोणत्या पध्दतीने बांधले जाते आहे,कोणत्या नियमावलीखाली बांधतो याबाबत सर्व्हेक्षण केले जात नाही तसेच अशापध्दतीचे बांधकाम करणा-यास भितीसुध्दा वाटत नाही. संपूर्ण वागळे परिसरामध्ये जर आपण पहाल तर ठिकठिकाणी जे औदयोगिक कारखाने आहेत,तेथे बिट युनिट जास्त प्रमाणात आहेत त्यांच्या ज्या कंपाऊंड वॉल आहेत त्या एवढया खिळखिळया झालेल्या आहेत,दगडी बांधकाम असलेतरी झाडे उगवल्यामुळे त्या कोसळलेल्या आहेत,अशाच बांधकामालगत प्रत्येक ठिकाणी झोपडपट्टी ही वसलेली आहे.आणि तेथील भिंतीची उंची एवढी अफाट आहे कारण बाजुला झोपडपट्टी असल्यामुळे त्याने अनधिकृतरित्या त्याची उंची वाढवलेली आहे त्या कधीही पडू शकतात. तरी ही जी घटना घडलेली आहे या घटनेपासून आपण कांहीतरी एक बोध घ्यायला पाहिजे की अशावेळेला अशाठिकाणी ज्या ज्या धोकादायक इमारतींच्या कंपाऊंड वॉल्स आहेत मग त्या कारखान्यांच्या असतील, आज गौतमनगर परिसरामध्ये जर पाहिले तर तेथे इंडस्ट्रीज लाईन आहे त्याच्याच बाजुला सगळा झोपडपट्टी भाग आहे आणि त्यांच्या झोपडपट्टीमध्ये सुध्दा वन प्लस वन बांधकामे आहेत त्या वन प्लस वन बांधकामामधून सुध्दा अंतरराहू नये म्हणून त्या कारखानदारांनी त्या भिंती उचललेल्या आहेत. अशावेळी विटेचे बांधकाम असेल तर ते टिकू शकेल कां,याबाबत आपण गांभिर्यपुर्वक तेथे सर्व्हेक्षण करुन पाहणे गरजेचे आहे. आज माझ्या परिसरामध्ये मेंटल हॉस्पीटल आहे. तेथे आजुबाजुला सगळा झोपडपट्टी भाग आहे,आज त्या हॉस्पीटलचे बांधकाम ढासळलेले आहे.तेथे जर अशाप्रकारे मोठया प्रमाणात पाणी साचले तर त्या कधीही कोलॅब्स होऊ शकतात.अशाप्रकारच्या ज्या अवाढव्य भिंतीची उंची गाठलेली आहे असे विटांचे बांधकाम किती फुटापर्यंत असावे याला सुध्दा कांही मर्यादा घालून देणे किंवा त्यांचेवर कारवाई करणे किंवा त्यांचेवर गुन्हे नोंदविणे फार गरजेचे आहे असे मला वाटते,जेणेकरुन भविष्यामध्ये अशी कोणतीही दुर्घटना अशा या दाट लोकवस्तीमध्ये उदा-वागळे सारख्या दाट वस्तीमध्ये तरी होता कामा नये.तरी याबाबत सर्व्हेक्षण करुन अशा कांही धोकादायक भिंती असतील त्याकडे जातीने लक्ष देणे व धोकादायक स्थिती दूर करणे हे फार गरजेचे आहे असे मला वाटते. निश्चितच ज्या कुटुंबाना हा आघात झालेला आहे,हा कधीही भरुन न येणारा असा आहे,तरी या सभागृहामध्ये याबाबतचे गांभिर्य ओळखून आपण त्यांना जी कांही मदत असेल किंवा ज्या कांही कारवाया असतील त्या आपण निश्चितच कराल,तरी मी माझ्यावतीने जे मृत झालेले आहेत त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि निश्चितच सभागृहाला विनंती करेन खरोखरच असे गंभीर विषय आहेत की जेणेकरुन भविष्यामध्ये अशी मनुष्यहानी होता कामा नये,कुटुंब रस्त्यावर येता कामा नयेत,म्हणून वेळच्यावेळी त्यावर कशी ॲक्शन घेता येईल,आणि अशा लोकांना जे प्राधान्य देणारे किंवा अशांना उदयुक्त करणारे किंवा अशी बांधकामे करणारे तसेच अतिक्रमण करणा-यास कशाप्रकारे चाप लावता येईल यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावा अशी मी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

श्री.मधुकर होडावडेकर :

महापौर महोदय,विरोधी पक्ष नेते श्री.नजिब मुल्ला व श्री.नारायण पवार यानी याठिकाणी सभा तहकूबी मांडली आहे. ज्ञानेश्वर नगरमधील जी आठ माणसे मृत्युमुखी पडले,त्याबाबत शोक व्यक्त करत असतानाच संपूर्ण सभागृहामध्ये जी चर्चा होत आहे,या चर्चेमधून एकच विषय निघतो की,या सर्व अपघाताला महापालिकेचे प्रशासन कारणीभूत आहे. या घटनेनंतर अशाप्रकारची घटना होऊ नये,म्हणून मी माझ्या प्रभागातील ज्या पडवळनगरमध्ये ज्या कंपन्या आहेत,ज्या कंपनीची भिंत जवळजवळ १२ फुट उंच सध्यपरिस्थितीमध्ये आहे आणि ही भिंत गेल्या अनेक वर्षापासुन त्याठिकाणी बांधलेली आहे.सदर जागेवर जी मिल आहे ती सध्या बंद असुन तेथे ही १२ फुटाची भिंत पुर्णपणे कलंडलेली आहे.आणि त्या भिंतीच्या बाजुला चाळ असुन याठिकाणी वस्ती आहे. भविष्यात ही जर भिंत कोसळली तर पुन्हा जिवितहानी होऊ शकते.प्रशासनाने याकडे जर लक्ष दिले तर ही जी भिंत आहे ती ताबडतोब या कंपनीला सांगून ती डिमॉलीश करु शकता ,त्याचप्रमाणे याठिकाणहून वाहणारा जो नाला आहे या नाल्यावर अतिक्रमण करुन तेथे जे बांधकाम केलेले आहे आणि हे बांधकाम दगडी असुन ते कांही ठिकाणी कोसळलेले आहे. याठिकाणी डोंगरमाथ्यावरुन पाण्याचा प्रवाह येतो या प्रवाहाबरोबर हे जे बांधकाम आहे ते नाल्यावर अतिक्रमण करुन बांधलेले आहे हे जर कोसळले तर मोठया प्रमाणात जिवितहानी होऊ शकते,तरी भविष्यात अशाप्रकारची घटना होऊ नये याकरीता प्रशासनाने लक्ष देऊन योग्यवेळी योग्य कारवाई करावी.याठिकाणी विरोधी पक्ष नेते यांनी जी सभा तहकूबी मांडली आहे तरी सदरची सभा पुर्णपणे तहकूब व्हावी अशी मी मागणी करतो.

श्री.पांडुरंग पाटील:

महापौर महोदय,ज्ञानेश्वर नगर येथील दोस्ती संकुलाची संरक्षक भिंत कोसळुन जे आठ नागरीक मृत्युमुखी पडले आहेत त्याबाबत सन्मा.विरोधी पक्ष नेते व गटनेते यांनी जी सभा तहकूबी मांडलेली आहे. या सभागृहात जवळजवळ तेरा सदस्यांनी या तहकूबीवर चर्चा करीत असताना विविध विषयाला हात घातला आहे की प्रत्येक वर्षी पावसाळयापुर्वी नाले सफाई,धोकादायक इमारती हया लक्षवेधी अपेक्षित असतात,परंतू मध्यंतरीच्याकाळामध्ये महासभा झाली नाही आचारसंहिता होती म्हणून नाल्याची तहकूबी आणि अतिधोकादायक इमारतींची तहकूबी राहून गेली,दुर्देवाने हे आठ नागरीक मृत्युमुखी पडत असताना पावसाळा सुरु झालेला आहे त्यानुषंगाने ब-याचशा सदस्यांनी प्रशासनाने कशाप्रकारे सुधारणा करणे आवश्यकआहे,कशाप्रकारे उपाययोजना करणे अपेक्षित आहे अशी अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त केलेली आहे, ती व्यक्त करीत असतानाच ज्यादिवशी पहाटे दुर्घटना घडली,मी प्रत्यक्ष त्याठिकाणी हजर होतो,आठही मृतदेह माझ्यासमोर काढले आहेत,ती ठाकूर महिला जिवंत होती ,सन्मा.नारायण पवार यांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे जो सनी नावाचा मुलगा बेघर झालेला आहे त्याचा हात आपल्या हातामध्ये पकडलेला होता,परंतू हॉस्पीटलमध्ये नेण्यापुर्वीच त्या महिलेचा मृत्यु झाला. हे आठ मृतदेह काढत असताना ज्यावेळेला पहाटे चार वाजून सात मिनिटानी श्री.संतोष वडवले यांचा मला फोन आला की,भिंत कोसळून दुर्घटना घडली आहे,मी अग्निशमन दलाला फोन करुन लगेच बाहेर पडलो,खरोखरच त्याठिकाणी आपल्या अग्निशमन जवानांनी चांगले काम केले,त्यांना धन्यवाद दयावे तेवढे कमीच आहे. हे सर्व करीत असताना दरवर्षी पावसाळयामध्ये आपण आपत्कालीन योजना राबविण्याचा प्रयत्न करतो,निरनिराळया पुस्तिका छापतो,त्या पुस्तिका कागदावरच राहता कामा नयेत, मी स्वत: आपत्कालीनला फोन केला परंतू तो फोन कोणीच उचलला नाही. वागळे येथे फोन केला तर असे सांगण्यांत आले की फक्त दोनच कर्मचारी आहेत,परंतू आमच्याकडे कोणत्याही प्रकारची साधनसामुग्री नाही. श्री.संतोष वडवले यांच्या प्रभागातील

नागरीक हयांनी बरीचशी त्याठिकाणी मदत केली म्हणून लवकरांत लवकर ते मृतदेह काढणे शक्य झाले. कारण नसताना कांही सदस्यांनी ती भिंत अनधिकृत होती,प्रशासनाने दुर्लक्ष केले,कांही सदस्यांनी त्याहीपुढे जाऊन म्हटले की ती नाल्याची भिंत होती,कांही वृत्तपत्रामध्ये सुध्दा बातम्या आल्या की नाल्याची भिंत पडून हे नागरीक मृत्युमुखी पडले परंतू या भिंतीमध्ये आणि नाल्याच्या भिंतीमध्ये जवळजवळ २५ फुटाचे अंतर आहे.आयएनडीपी नाल्याचा आणि या भिंतीचा कांही संबंध नाही. गेले सहा महिन्यापासून प्रशासन नेहमी नाल्यामध्ये असलेल्या ज्या आयएनडीपी प्रोजेक्टला अफेक्टिव्ह असलेल्या झोपडया या पावसाळयापुर्वी कोठेतरी स्थलांतरीत करणे अपेक्षित आहे. निरनिराळया यादया तुमच्या स्तरावर प्रसिध्द झालेल्या आहेत,त्यामुळे या झोपडयांमुळे आयएनडीपीचे प्रोजेक्ट थांबलेले आहेत आणि त्याच तोंडावर असताना ही दुर्घटना घडलेली आहे. कांही सदस्यांनी सांगितले की या घटना घडू नयेत म्हणून प्रशासन कांय जागरुकता दाखविणार आहे. भविष्यामध्ये कांय उपाययोजना करणार आहे,निरनिराळया घटना या शहरामध्ये घडलेल्या आहेत याचे आपण सर्व साक्षीदार आहोत,प्रशासन व आपण सदस्य आहोत,या शहरातील नागरीक आहेत,परंतू ज्यावेळी घटना घडते त्यावेळी या सभागृहामध्ये किंवा विविध ठिकाणी त्या घडू नयेत म्हणून चर्चा होते,दोन दिवस चर्चा होते नंतर पुन्हा जैसे थे होते,ते भविष्यांत होऊ नये म्हणून कांही सदस्यांनी खरोखर चांगल्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांची अंमलबजावणीची अपेक्षा निश्चित याठिकाणी प्रशासनाकडून करणे अपेक्षित आहे. त्या कंपनीच्या भिंतीवर भिंत कां बांधली गेली ,त्याठिकाणी एवढी माती का टाकण्यांत आली,मला आठवते की,संतोष वडवले यांनी स्थायी समितीमध्ये ही भिंत वाढवलेली आहे,शेजारच्या झोपडपट्टीला धोका आहे,ही चर्चा केलेली आहे. तेव्हाच जर शहरविकास विभागाने प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी केली असती तर मला वाटते ही दुर्घटना घडली गेली नसती असे समजायला कोठल्या प्रकारची हरकत नाही. ज्यादिवशी दुर्घटना घडली त्यादिवशी या शहरामध्ये ४० झाडे पडलेली आहे,परंतू सुर्देवाने मनुष्यहानी किंवा वित्तहानी झाली नाही,ही चर्चा फक्त कांही वर्तमानपत्रामध्ये आली ,त्या विभागाने झाडे तोडली,रस्ते साफ केले,परंतू या शहरामध्ये ज्या अतिधोकादायक इमारती आहेत,प्रशासन पावसाळयापुर्वी फक्त त्यांना २६०ची नोटीस पाठविते.फक्त नोटीस पाठवून तेथील नागरीक किंवा मालक व भाडोत्री यामध्ये कांय वाद आहेत,ती इमारती रिकामी करुन घेणे आवश्यक आहे किंवा नाही,नोटीस पाठविली म्हणजे माझी जबाबदारी संपली परंतू पावसाळयामध्ये अतिवृष्टीमुळे किंवा वादळामुळे ती इमारत पडली की प्रत्येकजण महापालिकेला दोष देते,तेथील मालकाला दोष देत नाही किंवा अट्टाहासाने तेथे राहणा-या भाडेकरुला दोष देत नाही फक्त आरोपीच्या पिंज-यामध्ये महापालिका उभी राहते,त्यामध्ये तेथील नगरसेवक असेल व सभागृह असेल.पावसाळयामध्ये अमुक अमुक इमारती या अतिधोकादायक आहेत हे प्रसिध्द कां करीत नाही.मालक व भाडोत्री यांच्यात वाद असतील तर आयुक्त महोदय ते आपल्या स्तरावर मिटविणे अपेक्षित आहे. कारण भाडोत्रीला शंका व भिती असते की,ही इमारत तोडल्यावर हा मालक मला घर देईल किंवा नाही.याकरीता दोघांनाही बोलवा समन्वय साधा,त्यांचे करारनामे करुन दया,आणि इमारत रिकामी करा असे केल्यास भाडोत्री स्वत:हून बाजुला होईल, परंतू हे कोणी करायचे,प्रशासनाने नोटीस दिली म्हणजे माझी जबाबदारी संपली इथपर्यंत तो भाग राहू नये,कारण याच वर्षामध्ये जवळजवळ ४.८ मीटरच्या दहा ते बारा वेळा भरती रेषा येणार आहेत.आणि ठाण्याचा जो भौगोलिक इतिहास आहे हा डोंगरापासुन खाडीकडे जाणारा आहे आणि कांही भाग सखल आहे. खाडीकिनारी अमाप भरणी झालेली आहे, पाण्याच गुणधर्म समपातळीत राहणे,ज्या जुन्या वस्त्या आहेत,जुनी गावठाणं आहेत,ज्यावेळी खाडीकिनारी दहा दहा फुटाचा भराव करीत असताना ते पाणी मुळ ठाण्यामध्ये घुसणार आहे,ते पाणी शहराच्या बाहेर जाणार नाही.ज्यावेळी भरणी करत

असताना शहराला कोठे कंपाऊंड वॉल टाकलेले नाही,हा विचार कोणी करायचा. फक्त प्लिंथपुरती भरणी आपण समजु शकतो परंतू संपूर्ण प्लॉट ज्याप्रमाणे भरणी केला जातो,पाणी पसरायला कोठल्याही प्रकारची जागाच ठेवली जात नाही हा विचार कोणी करायचा? हा विचार सर्वसामान्य नागरीकांनी करायचा की हा विचार शहरविकास विभागाने करायचा आहे,हा विचार प्रशासनाने करायचा आहे परंतू तो होताना दिसून येत नाही,तो विचार भविष्यामध्ये व्हावा अशी त्यामागची अपेक्षा आहे. याठिकाणी ज्या झोपडया पडल्या,ज्या झोपडया शिल्लक आहेत त्याबाबत पात्र आणि अपात्रबाबत वाद चालू आहे. माझ्या माहितीप्रमाणे बीएसयुपीमध्ये पात्र आणि अपात्रचा काहीच संबंध नाही. आणि या ज्या झोपडया आहेत त्याबाबत आज सकाळीच माझ्या दालनात कांही नागरीक आले होते त्यांच्यातील कांही जणांकडे ८७ व ८६व ८२ च्या टॅक्स पावत्या आहेत.मग महापालिका त्यांची टॅक्स पावती गृहीत धरणार नाही कां? निवडणुक आयोगाने ९४ साली दिलेले ओळखपत्र त्यांच्याकडे आहे तरी त्यांना तुम्ही अपात्र गणनार आहात कां?तुम्ही कांही जणांना नोटीस दिलेली आहे की,२०००पर्यंतचे तुम्ही आम्हाला पुरावे दया,त्यांच्याकडे ८६,८७ चे पुरावे उपलब्ध असताना तुम्ही त्यांना अपात्र कसे धरता? तरी याबाबत प्रशासन कांही निर्णय घेणार आहे किंवा नाही,की फक्त कागदी घोडे नाचविणार आहे.महापौर महोदय,माझ्याकडे सुध्दा बीएसयुपी योजना सुरु आहे,प्रशासनाने बांधकामे सुरु केली आणि त्या वस्तीतील जो सखल भाग आहे तेथे कोठल्याही प्रकारचे बांधकाम करण्याचा प्रयत्न केला नाही,पावसाळी पाणी जे आहे ते त्या वस्तीमध्ये दोन्हीबाजुने उतरणार आहे. परवा पडलेल्या पावसाने त्याठिकाणी दोन फुट पाणी जमा झाले. मी एक महिना झाला सांगत आहे की त्यांचे कोठेतरी स्थलांतर करा,आयुक्त महोदय आपण नसताना अतिरिक्त आयुक्तांनी मागच्या पाच दिवसांपुर्वीची डेडलाईन दिली होती की त्या पाच दिवसांमध्ये तुम्ही त्यांचा सर्व्हे करा की निश्चित पात्र अपात्र कोण आहेत म्हणून,अदयाप ती पात्रता यादी फायनल होऊ शकत नाही. मग ही जबाबदारी कोणाची आहे,नागरीकांची आहे,नगरसेवकांची आहे का की पात्र ठरविण्याची पध्दत प्रशासनाची आहे व नागरीकांना विश्वासात घेण्याची नाही ? तरी याबाबत नक्की भूमिका कांय आहे?बीएसयुपी योजना या शहरामध्ये याव्यात व त्या प्रांजलपणे या शहरात राबविल्या जाव्यात हीच आमची मानसिकता आहे व तुमचीसुध्दा तीच आहे,मग असे असताना त्यास विलंब कां लावत आहात?या पात्र व अपात्रबाबत प्रशासन नक्की कोणते साल निश्चित करणार आहे याबाबत आयुक्त महोदय निर्णय घेणे अपेक्षित आहे. कोणी म्हणतो ९४-९५,तर दुसरे म्हणतात २०००चे पाहिजे,आज मी पहिल्यांदा पाहिले २००० चे पत्र तेथील झोपडीधारकांना दिलेले आहे.आतापर्यंत या सभागृहात ज्याज्यावेळेला चर्चा झाली त्यात्यावेळी ९५ सालच गृहीत धरले होते. त्या लोकांच्या मनामध्ये जी दहशत निर्माण झाली,प्रशासनाने त्यानंतर ती भिंत पाडली आहे,परंतू आज तेथील नागरीक एवढे घाबरलेले आहेत ते प्रत्यक्ष मी डोळयाने पाहिलेले आहे,त्यांच्या चर्चा ऐकलेल्या आहेत म्हणून त्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून लवकरात लवकर ती यादी फायनल होणे अपेक्षित आहे.

महापौर महोदय, या घटना घडत असताना यावर्षी पावसाळा हा वेधशाळने अंदाज वर्तविल्याप्रमाणे जोरदार होणार आहे.सभागृहामध्ये तळघरामध्ये वाणिज्य वापर नसावा म्हणून ब-याचवेळा चर्चा झालेली आहे. आजशहरामध्ये ब-याचशा ठिकाणी तळघरामध्ये वाणिज्य वापर होत आहे.या शहरामध्ये विदयार्थ्यांचे क्लासेस तळघरामध्ये आहेत. आठ ते दहा महिन्यापुर्वी एका तळघरामध्ये आग लागली होती व १२० विदयार्थी हे तळघरामध्ये होते,फायरमन वेळेवर गेले नसते तर त्या १२० विदयार्थ्यांचे काय पाप डोक्यावर घेऊन तुम्ही जगला असता याचे सुध्दा कोठेतरी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. राजकीय हस्तक्षेप बाजुला ठेवावा.तेथील उपायुक्तांशी जेव्हा मी चर्चा केली त्यावेळेला आम्हाला अमुक यांचे फोन येतात

त्यावेळी ते फोन बाजुला ठेवा ,आज आपण या शहरातील नागरीकांचे कांही देणे लागतो आहोत की नाही,याचा कोठेतरी विचार होणे अपेक्षित आहे. ज्या योजनांना ही महासभा मंजुरी देते,आज आम्ही विविध पक्षाचे जरी असलो तरी प्रशासनाने कोणत्याही आणलेल्या प्रस्तावाला सर्व पक्षाने त्यास मान्यता दिलेली आहे. प्रशासन मान्यता घेण्यासाठी धडपड करते परंतू मान्य झाल्यानंतर त्यामध्ये बरीचशी दिरंगाई आढळुन येते. मी सर्वच अधिका-यांना दोषी धरत नाही. दोन दिवसापुर्वीच डीसीरुलमध्ये रेनवॉटर हार्वेस्टींग योजनेची तरतुद केलेली आहे. आणि बरेचसे विकासक श्री.भसे यांचेजवळ तक्रार करीत होते की,श्री.भसे आम्हाला पाणी खात्याची  एनओसी देत नाही म्हणून. मी श्री.भसे यांना बोलावून विचारले की नक्की कांय प्रकार आहे,तेव्हा श्री.भसे यानी उत्तर दिले की, हे जे विकासक आहेत हे बोअरींग मारत नाही,कोठेतरी जेसीबी मारुन २०-२५ फुटाचा खड्डा मारतात एक पाईप टाकतात आणि गटाराचे पाणी कोणत्याही प्रकारचा ८x८चा खड्डा न घेता रेनवॉटर हार्वेस्टींग योजनेप्रमाणे गटाराचे पाणी त्या बोअरींगमध्ये आणुन सोडतात,महापालिकेचे फसवणुक करतात,तेथे येणा-या टेनंटची सुध्दा फसवणुक करतात,हे मी एका ठिकाणी गेल्यानंतर प्रत्यक्ष दृष्टीस आले,व ही वस्तुस्थिती खरी होती,म्हणजे विकासक याप्रमाणे महापालिकेला बदनाम करत असताना तेथे जाणारा जो नागरीक आहे त्याचीही फसवणुक करत आहे,तरी याबाबत श्री.भसे यांनी जी जागरुकता दाखविली.त्यांनी सांगितले की पुर्ण यंत्रणा दाखवा तरच मी एनओसी देईन,परंतू आज श्री.भसे यांचा या शहरातील विकासकानां त्रास होत आहे. जर श्री.भसे यांनी एनओसी दिली असती तर श्री.भसे चांगले झाले असते,परंतू भविष्यामध्ये येथे येणारा जो नागरीक आहे त्याला बारा महिने पाणी बोअरींगचे मिळू शकले नसते,एक महिनासुध्दा पाणी मिळाले नसते,त्यांनी महापालिकेला दोष दिला असता की तुम्ही एनओसी कशी दिली म्हणून.ही जागरुकता सर्व अधिका-यांकडून निश्चित अपेक्षित आहे.  आयुक्त महोदय,सर्व अधिका-यांना आपण अलर्ट करा की या पावसाळयामध्ये सर्वांचे मोबाईल हे २४ तास चालू राहतील,मी त्यावेळी कांही अधिका-यांना फोन केले परंतू त्यांचे फोन स्विचऑफ होते,मी त्यांची नांवे घेऊ इच्छित नाही,परंतू आज या सभागृहामध्ये मी वॉर्निंगदेत आहे की,भविष्यात अशाप्रकारच्या घटना या शहरामध्ये जरी घडणा-या नसल्या तरी महापालिकेने दिलेला मोबाईल या शहरातील सेवेसाठी दिलेला आहे तो २४ तास कशाप्रकारे चालू राहील याची दक्षता संबंधित अधिका-यांनी घ्यावी.

महापौर महोदय,ही घटना घडली ती निश्चित दुर्देवी आहे. आपण त्यादिवशी तात्काळ त्या पाच नागरीकांना स्वतः निर्णय घेऊन कौशल्यामध्ये ॲडमिट केले,तसेच आपण त्याठिकाणी घोषणासुध्दा केली की,शासनाने या दुर्घटनेतील मृत व्यक्तीसाठी एक लाख घोषित केले आहे परंतू आपण  बिल्डरने जे मृत झाले आहेत त्यांना दोन लाख नुकसानभरपाई देणे गरजेचे आहे,या घोषणेचा सुध्दा पाठपुरावा होणे अपेक्षित आहे. तसेच जे दवाखान्यात ॲडमिट आहेत त्यांचाही खर्च संबंधित विकासकाने करणे गरजेचे आहे. तरी या सर्व बाबींचा विचार करीत असताना  आज  रामचंद्रनगर येथे सात ते आठ नागरीक नाल्याच्या शेजारी आहेत,ते सुध्दा याठिकाणी चकरा मारीत आहेत,त्यावेळी प्रशासन ठरवित होते की नक्की यांना कोठे जागा दयायची याबाबत ठराव करावा,त्याप्रमाणे आपण ठराव केला की त्यांना बीएसयुपीमध्ये किंवा एसआरडीच्या पीएपीमध्ये त्यांचे पुनर्वसन करण्यांत यावे. गेले दोन वर्ष या नाल्याचे काम सुरु असताना तुमच्या यादया फायनल होत असताना जागा उपलब्ध झाल्यानंतर तुम्हाला सूचना आली की यांचे पुनर्वसन कोठे करावे हे आम्हाला सभागृहाने सांगावे,आयुक्त महोदय ही खरोखरच खेदाची बाब आहे. वेळीच उपाययोजना होणे अपेक्षित आहे. वास्तविक ते आपल्याकडून होणे गरजेचे आहे,अशी या सभागृहातील ब-याचशा सदस्यांची मागणी आहे. भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत म्हणून प्रशासनातील प्रत्येक अधिका-याने आपापली

जबाबदारी निकराने पार पाडावी अशी या सभागृहाची अपेक्षा आहे. जे नागरीक या दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभण्यासाठी तसेच जे सुर्देवाने या अपघातामध्ये बचावले आहेत त्यांना सुध्दा हे दुःख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो आणि जे नागरीक घाबरलेले आहेत त्यांचे सुध्दा लवकरच स्थलांतर करण्यासाठी आणि यादी फायनल करण्यासाठी प्रशासनातील अधिका-यांना ईश्वर सुबुध्दी देवो,कारण गेले दोन दिवस हा प्रकार चालू आहे,आणि याठिकाणी ब-याचशा सदस्यांनी आजची महासभा मृतात्म्यास श्रध्दांजली वाहून पुर्ण दिवस तहकूब करावी,अशी सूचना केलेली आहे,त्या सूचनेला मी अनुमोदन देत आहे.

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय,संपूर्ण सभा तहकूबीमध्ये प्रशासनावर बरेचसे सदस्य बोलल्यामुळे आयुक्तांचे निवेदन हे झाले पाहिजे व त्यानंतर आपण बोला आणि नंतर सभा तहकूब करा. प्रशासनावर जे आरोप झाले आहेत त्याचे सुध्दा खंडन याठिकाणी झाले पाहिजे.

मा.आयुक्त सो:

मा.महापौर महोदय,दिनांक १६ रोजी ज्ञानेश्वरनगर येथे जी दुर्घटना झाली त्याबद्दल प्रशासनाला सुध्दा दुःख आहे. सभागृहामध्ये सर्व सन्मा.सदस्यांनी सुध्दा त्यांच्या भावना याठिकाणी व्यक्त केली आहे त्यामध्ये प्रशासन सुध्दा सहभागी आहे. ही दुर्घटना पहाटे साधारण चारच्या सुमारास घडल्यानंतर लगेच मा.सभागृह नेते व स्थानिक नगरसेवक यांचेबरोबरच फायरबिग्रेडचे जवान सुध्दा ताबडतोब सदर ठिकाणी पोहचले व त्यांनी चांगली कामगिरी केली त्याबद्दल कांही सदस्यांनी तसेच सभागृह नेते यांनी सुध्दा त्याची दखल घेतलेली आहे. आरोग्य विभागाचे कर्मचारीसुध्दा थोडया उशिराने का होईना म्हणजेच पहाटे पाच ते सव्वापाच वाजेपर्यंत सदर ठिकाणी पोहचले होते.याबाबत मी चौकशी केली असता असे समजले की,दुर्घटनास्थळी अँब्युलन्स जाण्यासाठी रस्ता नव्हता म्हणून त्यांना थोडे फिरुन यावे लागले परंतू डॉक्टर्स व इतर स्टाफ हा लवकरात लवकर घटनास्थळी पोहचले, तेथे ज्या सात रहिवाशांचा मृत्यु झाला आहे व एका महिलेचा हॉस्पीटलमध्ये नेत असताना रस्त्यामध्येच मृत्यु झालेला आहे. मी घटनास्थळी भेट दिली तसेच कौशल्या हॉस्पीटलमध्येसुध्दा गेलो, जे जखमी होते त्यांची विचारपुस केली. सन्मा.सदस्यांनी सांगितले की तेथे राहणारे नागरीक हे फार वर्षापासुन तेथे वास्तव्य करीत आहेत,१९८५ सालापासून राहणारे तेथे रहिवाशी आहेत, परंतू तेथील एका कुटुंबाशी मी चर्चा करत असताना माझ्या असे लक्षांत आले की, ते कुटुंब दोन ते तीन वर्षापासुन त्याठिकाणी भाडोत्री म्हणून राहण्यासाठी आले होते,व हे मी फक्त आपल्या माहितीसाठी याठिकाणी मी सांगत आहे. तरी अशाप्रकारचे सुध्दा रहिवाशी तेथे रहात होते. तसेच ओरीजनल ओनरसुध्दा त्याठिकाणी रहात आहेत. तरी आता त्यांच्या पुनर्वसनाचा जो प्रश्न आहे जे कांही पात्र त्यामध्ये ठरतील त्यांचे पुनर्वसन हे लवकरात लवकर करण्याचे आम्ही योजले आहे. ज्यांच्याकडे पुरावे आहेत त्यांनी अदयापही पुरावे सादर केलेले नाहीत, कारण याबाबत आम्ही कांही एलीजिबिलीटी ठरवतो त्यावेळी जे कागदपत्र सादर करतात त्या आधारावर एलीजिबिलीटी ठरविली जाते ,याबाबतचे त्यांनी जर कागदपत्र सादर केले नसतील तर त्यांनी सादर करावेत आणि हे सर्व तपासून त्यांची एलीजिबिलीटी ठरविली जाईल. आणि २००० पर्यंतचे रहिवाशांना आपण साकेत येथे त्यांचे पुनर्वसन पीपीपी अंतर्गत टेनामेंट मध्ये_देण्यांत येतील. तसेच जे २०००नंतरचे जे रहिवाशी आहेत त्यांचेबद्दल असा प्रश्न आहे की, बीएसयुपीचा प्रकल्प राबवित असताना रिव्हीजनसाठी आपण केंद्र शासनाकडे गेलो,सुरुवातीला जेव्हा बीएसयुपीचा प्रकल्प मंजुर झाला होता तेव्हा तशी अट नव्हती परंतू जेव्हा रिव्हीजनसाठी आपण गेलो तेव्हा प्रशासनाच्यावतीने त्यांनी एक अंडरटेकींग घेतलेली आहे की, नाला रुंदीकरणामध्ये जे बाधित प्रकल्पचे जे लोक असतील त्यांचे पुनर्वसन

बीएसयुपीमध्ये करण्यात येणार नाही,असे एक अंडरटेकींग प्रशासनाच्या वतीने केंद्र शासनाने मागितले त्यावेळी आपल्याला रिव्हीजन पाहिजे होते म्हणून तशी अंडरटेकींग देण्यांत आलेली आहे. त्याचा अर्थ असा झाला आहे की, आज नाला वाईडींगमधील लोकांना बीएसयुपीच्या प्रकल्पामध्ये आपण पुनर्वसन करु शकत नाही,त्यासाठी म्हणून ट्रांझिटेकमॉडेशन त्यांना तुळशीधाम येथे हलविण्यात येतील आणि केंद्र शासनासोबत याबाबत पाठपुरावा करुन मंजुरीसाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल,कारण ओरीजनली जेव्हा बीएसयुपीची योजना मंजूर झालेली होती तेव्हा तशी अट नव्हती . घटनास्थळी जी भिंत धोकादायक ठरली होती त्यानंतर सुध्दा ती तोडण्यांत आलेली आहे. आणि तिकडीची मातीसुध्दा जेसीबीच्या सहाय्याने आपण काढण्याचे प्रयत्न केले आहेत. त्या भिंतीपैकी किती अनधिकृत होती किंवा त्याला परवानगी मिळालेली नव्हती किंवा परवानगी मिळाल्यानंतर त्याची उंची अपेक्षेपेक्षा जास्त होती किंवा जाणुनबुजुन कमजोर भिंत बांधण्यात आली होती याबाबत मा.सर्व सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्याबाबत सहा.संचालक नगररचना यांना एक आठवडयात माहिती देण्यासाठी चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी सांगण्यात आले आहेत. कांही सदस्यांनी सांगितले की दोन दिवसांत अहवाल अपेक्षित होता, दोन दिवस सुध्दा अदयाप झालेले नाहीत हे मी मा.सदस्यांच्या नजरेस आणुन देऊ इच्छितो. दि.१६ रोजी पुर्ण दिवस आपल्याला दुर्घटनेशी सामना करण्यात गेलेला आहे. काल मध्ये एक दिवस होता व आज सकाळपासून आपण सर्वसाधारण सभेमध्ये बसलो आहोत, याकरीता एक आठवडाकमीतकमी लागतो कारण की,अगोदर जर दोस्ती ग्रुपला परवानगी दिलेली होती तर ती परवानगी कशी देण्यांत आली वगैरे तसेच तेथील मेजरमेंट घेण्यास वेळ लागणार आहे,म्हणून माझ्या मते एक आठवडा बरोबर आहे. अहवाल आल्यानंतर त्याप्रमाणे प्रशासन काय कारवाई करेल याबाबतची सर्व माहिती महासभेपुढे सादर करण्यांत येईल. त्या विकासकाविरुध्द त्याच दिवशी आणि त्वरीत फोनवर मला विचारले होते सकाळी साडेसात वाजता डीएमसीने मला विचारले होते व त्याचवेळेस मी सांगितले की तुम्ही त्या विकासकाविरुध्द गुन्हा दाखल करा आणि गुन्हा नंबर आहे २१७/२०१०असा विकासकाविरुध्द दाखल करण्यांत आलेला आहे.सेक्शन ३०४ अन्वये ३३६,३३८,आणि ४२७खाली असा गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. शेवटचा एक मुद्दा आहे तो म्हणजे तेथे जे मृत्युमुखी पडले त्यांना भरपाई देणेबाबत तर आजच सकाळी कलेक्टरसोबत माझी भेट झाली आहे त्यांनी सांगितले पांच जणांचे चेक इश्यु झालेले आहेत आणि जे लोकं पात्र ठरत नाही तेथे त्यांचे पंधरा वर्षापेक्षा कमी वास्तव्य आहे त्यामुळे ते शासनाच्या नियमाप्रमाणे पात्र ठरत नाही,तरी त्यांना सुध्दा नुकसान भरपाई देण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या मदतनिधी आहे त्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडून पाठविण्यांत आलेला आहे. आणि जे जखमी झाले होते त्यांना शासनाने २५ हजार रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. तर याप्रमाणे यादुर्घटनेबाबतची सध्याचीपरिस्थिती आहे. बीएसयुपीचा जो प्रश्न आहे त्याबाबत मी सांगितले होते की आजच्यादिवशी मी बोलणार नाही कारण तो थोडा मोठा प्रश्न आहे.यामध्ये जवळपास दहा हजार घरे आपण बांधत आहोत आणि तेथे जे झोपडीधारक आहेत,जवळपास शासकीय जमिनीवर झोपडीधारक ९२ हजार आहेत तर त्यापैकी कोणाला आपण बीएसयुपीमध्ये समाविष्ट करायचे कारण तेथे फक्त बीएसयुपीचे प्रकल्प करतो तिकडच्या लोकांसाठी कोणताही नियम कोणताही निकष न लावता त्यांना समाविष्ट करायचे,त्यांचे पुनर्वसन करायचे किंवा बाहेरचे जे जुने ९५ चे आधीचे आहेत त्यांना करायचे हा एक गहन प्रश्न आहे.त्याबाबत आपण नंतर चर्चा करु,महासभेपुढे सर्व विषय आणू.आणि कोणाचे त्याठिकाणी पुनर्वसन करायचे किंवा कोणाचे नाही,याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. कारण फक्त १० हजार आपण घरे बांधण्याचे योजलेले आहे.आणि ९२हजार शासकीय जमिनीवर

झोपडीधारक आहेत,त्यामध्ये ९५पुर्वीचे जवळपास ७१ हजार आहेत तर तो एक मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे.आणि त्याबाबत आपण नंतर निर्णय घेणे जास्त उचित होईल. नाला वायडींगमधील लोकांचे आपण पुनर्वसन का करु शकलो नाही ,हा आता पोस्टमार्टमचा मुद्दा झालेला आहे. आपत्कालीन कक्षामधून वेळेवर उत्तर कां मिळाले नाही, आज शहरामध्ये ज्या दुर्घटना होत आहे हे पाहता,त्यांना ट्रेनिंग देण्याची गरज आहे,त्यांना डिझास्टर मॅनेजमेंट कार्यरत होण्याची गरज आहे त्याबद्दल नक्कीच कार्यवाही करण्यात येईल व याबाबतची प्रशासनाच्यावतीने मी हमी देतो आणि आपले भाषण संपवितो. धन्यवाद.

मा.सभागृह नेते :

मा.आयुक्त साहेबआपण सांगितल्याप्रमाणे मुळात आपण झोपडीचे पुनर्वसन करीत आहोत तेथील नागरीकाचे नाही,ब-याचवेळेला सभागृहामध्ये सुध्दा अशाप्रकारची चर्चा झालेली आहे. या झोपडया ज्या आहेत त्या जुन्या आहेत तेथे राहणारा जो ठाकुर आहे तो पांच वर्ष झाली तेथे रहावयास आलेला आहे,व त्या घरातील मृत्युमुखी पडले आहेत. त्याने विकत घेतलेली झोपडी ही १९८० सालापुर्वीची आहे,तरी याबाबत प्रशासनाकडून ठोस उत्तर आम्हाला अदयाप मिळालेले नाही. पुनर्वसन करताना आपण नागरीकाचे करतो की झोपडीचे करतो?

मा.आयुक्त सो :

त्यादिवशी आपण माझ्या कार्यालयात होता आपण हे सुध्दा सांगितले होते की मुंबई वेगळी आहे ठाणे वेगळे आहे. त्यावेळी मी स्पष्ट केले होते शासनाचे नियम दोन्हीकडे समान आहे.

श्री.दशरथ पालांडे :

महापौर महोदय, हा प्रश्न माझ्या वॉर्डाचाआहे,माझे हे नागरीक आज या कार्यायांत पहिल्या मजल्यावर बसले आहेत व ते जीव मुठीत धरुन बसले आहेत.

मा.महापौर :

ही सभा संपल्यानंतर तुमचे जे कांही प्रश्न असतील त्याबाबत आपण आयुक्तांशी बोलुया. आज जी सभा तहकूबी मांडली त्यावरच आपण जास्तीतजास्त चर्चा घडविली आहे. याठिकाणी दि.१६ रोजी भिंत कोसळुन जे मृत्युमुखी पडले त्यासंदर्भात सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना अतिशय तिव्र आहेत. दोषींवर कारवाई करावी अशा सर्वांच्या भावना आहेत व मी सुध्दा पहिल्या दिवशी ज्यावेळी त्या स्पॉटवर पहाटे ५ वाजता पोहोचलो त्यावेळी मला सुध्दा तेथे पाहिल्यानंतर असे आढळले की,अतिशय दुर्देवी घटना आहे. जो दुर्देवी मुलगा वाचलेला आहे त्याच्या आईने त्याचा हात पकडलेला होता आणि त्याच्या आईला हॉस्पीटलमध्ये घेऊन जात असताना ती जिवंतहोती परंतू हॉस्पीटलमध्ये पोहचण्यापुर्वीच त्यांचा मृत्यु झाला आहे. तो मुलगा म्हणत होता की,माझ्या आईने माझा हात पकडला होता ,माझी आई कोठे आहे? अशाप्रकारे तिकडचे वातावरण अतिशय भावनावश झाले होते. मा.आयुक्तांशी सुध्दा माझे फोनवरुन चर्चा झालेली आहे. घटनास्थळी श्री.नजिब मुल्ला साहेब सुध्दा त्याठिकाणी हजर होते. सर्वांच्या भावना आहेत की

यामध्ये जे दोषी असतील त्यांचेवर कठोर कारवाई झाली पाहिजे,व तशाप्रकारे आदेश सुध्दा आपण दिलेले आहेत.याबाबत प्रशासनाने आठ दिवसात कारवाई करण्यांत येईल असे म्हटले आहे परंतू ती लवकरात लवकर झाली तर योग्य होईल. लवकरात लवकर हा रिपोर्ट येऊन त्याबाबतीत कारवाईचे आदेश देण्यासंदर्भात प्रशासनाला आदेश देण्यांत आलेले आहेत. पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे की,जे जखमी झालेले आहेत,तसेच जे मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत मिळावी,याबाबत आपण मिडीयाच्या माध्यमातून मागणी केली की, प्राथमिक जी मदत असेल ती मृत्युमुखी पडलेल्या नातेवाईकांना दोन लाख पर्यंत देण्यांत यावी व जखमी झाले असतील त्यांना २५ हजारापर्यंत प्राथमिक मदत करावी आणि जे दोषी असतील त्यांचेवर नक्कीच कारवाई केली जावी व यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होऊ नये.

आजची सभा ही श्रध्दांजली वाहून पुर्ण वेळ तहकूब करण्यांत येत आहे.

मा. सचिव :सन्मा.सभागृह नेते श्री.पांडुरंग पाटील यांनी स्वातंत्र्यसेनानी,माजी मंत्री व काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नरेंद्र तिडके यांचे दुखवटयाबाबत दिलेले पत्र वाचून दाखवितात.

त्याचप्रमाणे ठाण्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते व विधानपरिषदेचे उपसभापती वसंत डावखरे यांच्या पत्नी सौ.शकुंतला डावखरे यांच्या दुखवटयाचे पत्र वाचून दाखवितात.

तसेच बुधवार दि.१७.०६ २०१० रोजी ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समितीअंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र.३९ मधील संत ज्ञानेश्वर येथील नाल्याची सरंक्षक भिंत नाल्याजवळच्या चाळींवर पडून झालेल्या दुर्घटनेमध्ये ८ व्यक्ती मृत्युमुखी पडले त्यांच्या दुखवटयाचे पत्र वाचून दाखवितात.

मा.महापौर :

दि.२३.६.२०१० रोजी आजची तहकूब सभा कंटीन्यु करण्यात येईल.

तद्नंतर सायंकाळी ठिक ४.१० वाजता सभा तहकूब करण्यांत येते.

# दुखवटा ठराव

<u>ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ४२ दिनांक १८.०६.२०१०</u>

ठराव :

बुधवार दि.१७.०६.२०१० रोजी पहाटे ४.३० वा. ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र.३९ मधील संत ज्ञानेश्वरनगर येथील कंपनीची संरक्षण भिंत नाल्याजवळच्या चाळींवर पडून या दुर्घटनेमध्ये ८ व्यक्ती मृत्युमुखी पडले तर अंदाजे ६ जण जखमी झाले.

यामध्ये शिवाकांत जयमुरत गिरी (४५), इंद्रावती इंदरसिंग (४०), मिरा विश्वनाथ ठाकूर (२६), पिंकी रघुनाथ भगत (१५), सुनैया दुधनाथ भगत (१६), अशी या दुर्घटनेत मरण पावलेल्यांची नांवे आहेत, तर सनी विश्वनाथ ठाकूर (८०), सिमा भगत (३५), दुधनाथ शिवशंकर भगत (३०), रोहित भगत (१०) गुड्डान सिंग, (१८) अशी जखमींची नांवे आहेत.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ही सर्वसाधारण सभा परमेश्वर चरणी प्रार्थना करीत असुन, त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील.

अनुमोदक : श्री.नजीब मुल्ला.

सही/- श्री.अशोक बारकू वैती.<br>
महापौर,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

# दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ४३ दिनांक १८.०६.२०१०

ठराव :

स्वातंत्र्यसेनानी,माजी मंत्री व काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नरेंद्र तिडके यांचे बुधवारी त्यांच्या निवासस्थानी वृध्दापकाळाने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ९१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पुत्र व कन्या असा परिवार आहे.

नागपूर जिल्हयातील साहुली येथे २ नोव्हेंबर १९२० साली शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या तिडके यांची मंत्रीपदाची आणि राजकारणातील कारकीर्द निष्कलंक राहिली. विद्यार्थीदशेपासून काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी राजकारणात स्वत:ला झोकून दिले. स्व.दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली युवक चळवळीत भाग घेणारे तिडके १९५२ साली मध्यप्रदेश विधान परिषदेवर निवडून गेले. त्यापाठोपाठ ते १९५७ मध्ये राज्य विधानसभेवरही निवडून गेले. त्यानंतर ते पुन्हा १९५७ मध्ये राज्य विधानसभेवरही निवडून गेले. १९६० साली त्यांना ग्रामीण विकास खात्याचे उपमंत्री म्हणून कार्यभार देण्यांत आला. त्यांच्या मंत्रिपदाचा कार्यकाळ तब्बल २३ वर्षाचा होता, त्यामुळे त्यांनी कामगार,नियोजन,उदयोग,ऊर्जा,सहकार, विधान कार्य आदी खात्यांचा कारभार पाहिला. १९७६ मध्ये राज्याचे कार्यकारी मुख्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले.

ऑक्सफर्ड येथे राष्ट्रकुल देशांच्या हयुपमन रिलेशन इन इंडस्ट्रीज परिषदेत भाग घेऊन त्यांनी आपली एक वेगळीच छाप पाडली. ते राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष होते. ग्रामिण रोजगार हमी योजना आणि कापुस एकाधिकार योजनेला गती देण्यचे काम त्यांनी पार पाडले होते.

श्री.नरेंद्र तिडके यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. हे दु:ख त्यांचे कुटुंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.नरेंद्र तिडके यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा परमेश्वर चरणी प्रार्थना करीत असुन, त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील.

अनुमोदक : श्री.नजीब मुल्ला.

सही/- श्री.अशोक बारकू वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

# दुखवटा ठराव

<u>ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ४४ दिनांक १८.०६.२०१०</u>

ठराव :

ठाण्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते व विधानपरिषदेचे उपसभापती वसंत डावखरे यांच्या पत्नील सौ.शकुंतला डावखरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ५५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले,सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

श्रीमती शकुंतला डावखरे यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे दुःख त्यांचे कुटुंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.शकुंतला डावखरे यांच्या आत्म्यास चिरशांती चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा परमेश्वर चरणी प्रार्थना करीत असुन, त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील.

अनुमोदक : श्री.नजीब मुल्ला.

सही/- श्री.अशोक बारकू वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

(तद्नंतर मृतात्म्यास श्रध्दांजली अर्पण करुन मा.महापौर सभा तहकूब केल्याचे जाहिर करतात.)

सही/- श्री.अशोक बारकू वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा तहकूब केल्याची वेळ -सायंकाळी ४.१० वा.
दिनांक : १८.०६.२०१०.
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

( सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे.